चेतक पुस्तक

# भारत भ्रमण

## भाग पहिला

पूर्व भारत

लेखक

**श्रीपाद जोशी**

…त अडीच रुपये

…क पुस्तकें

चिराबाजार, मुंबई २

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ…
अनुक्रम… दि:… नों. दि…
REFBK-0017696
REFBK-0017696

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ... दि:
क्रमांक ... नों दि
REFBK-0017696
REFBK-0017696

गुजरातीचे
ख्यातनाम
नाटककार
व
कादंबरीकार
मित्रवर्य
श्रीयुत
शिवकुमार
जोशी
ह्यांना
स्नेहपूर्वक ....

© श्रीपाद जोशी

पहिली
आवृत्ति
२२
मे
१९६९

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाव वाडी
मुंबई ४

प्रकाशक
बा. ग. ढवळे
चेतक पुस्तकें
चिराबाजार
मुंबई २

एकमेव विक्रेते
साहित्य सहकार संघ लि.
नायगांव क्रॉस रोड
दादर, मुंबई १४

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम ... दि:
क्रमांक ... नोंद दि:

REFBK-0017696
REFBK-0017696

गुजरातीचे
ख्यातनाम
नाटककार
व
कादंबरीकार
मित्रवर्य
श्रीयुत
शिवकुमार
जोशी
ह्यांना
स्नेहपूर्वक ....

# भ्रमणाची संधि

सन १९४९ पासून १९६० पर्यंत सतत बारा वर्षें दरसाल सर्वोदय संमेलनाच्या निमित्तानें भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशांत भ्रमण करण्याची संधि मला मिळाली. तत्पूर्वीही सन १९३८ पासून ह्या-ना-त्या कारणानें मी भारतांत भटकलों. अशा प्रकारें गेल्या दोन-अडीच तपांतील भारत-भ्रमणाचा हा अहवाल वाचकांसमोर ठेवतांना मला आनंद हात आहे. ह्यांतील बहुतेक लेख त्या-त्या वेळीं वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. कांहीं लेख 'माझा देश माझे लोक' ह्या पुस्तकाच्या दोन खंडांत प्रसिद्ध झाले होते. आतां त्या सर्व लेखांचें नीट वर्गीकरण करून नेटक्या स्वरूपांत वाचकांसमोर ठेवण्याचें स्वप्न साकार होत आहे.

माझीं प्रवास-वर्णनें मुख्यतः माहिती देण्याच्या हेतूनें लिहिलेलीं असतात. आजकालचीं प्रवास-वर्णनें ही लघुनिबंधाच्या स्वरूपाचीं असतात. त्यामुळें कांहीं टीकाकार माझ्या प्रवास-वर्णनांना नाकें मुरडतात. परंतु सर्वसामान्य वाचकांनीं माझ्या प्रवासलेखांचें नेहमींच स्वागत केलें आहे. त्यांच्या ह्या आत्मीयतेमुळेंच मी हे लेख पुस्तकरूपानें प्रकाशित करण्यास तयार झालों.

ह्यांतील कांहीं लेखांत तत्कालीन व्यक्तींचे व घटनांचे उल्लेख आलेले आहेत. त्यामुळें ते कालबाह्य वाटण्याची शक्यता आहे. परंतु त्या संदर्भांत जी माहिती देण्यांत आली आहे व जी चर्चा करण्यांत आली आहे, तिचें ऐतिहासिक महत्त्व लक्षांत घेऊन ते लेख तसेच ठेवले आहेत.

कांहीं स्थळांना मीं एकाहून अधिक वेळां भेटी दिल्या आणि त्या-त्या वेळीं यांच्यासंबंधीं लिहिलें. ह्यामुळें एकाच स्थानासंबंधीं अधिक लेखही ह्या संग्रहांतून

आढळतील. त्यांत क्वचित् कोठें पुनरुक्ति झाली असली, तरी प्रत्येक लेखाची भूमिका व त्यांतील माहिती ह्यांत खूपच फरक आहे. म्हणून ते तसेच राहूं दिले आहेत.

भारताच्या भावनात्मक ऐक्याला हातभार लावावा हाही हे लेख लिहिण्यांतील एक हेतु. सारा भारत एक असल्याचें आपण बोलतों खरें, परंतु ह्या भारतांतील विभिन्न प्रदेश व तेथील रहिवासी ह्यांच्याविषयीं आपल्याला किती थोडी माहिती असते! ही माहिती नसेल, तर आपण आपल्या देशबांधवांवर प्रेम तरी कसें करणार? तेव्हां अशी माहिती आपल्या वाचकांना मिळवून द्यावी, ह्या हेतूनें मीं देशभर हिंडतांना जें निरीक्षण केलें, त्याचें चित्र ह्या लेखांतून पाहायला मिळेल. क्वचित् एखाद्या ठिकाणीं स्थानिक लोकांचे दोषही मीं दाखविले आहेत; परंतु ते तिरस्काराच्या, हेटाळणीच्या भावनेनें नसून वाचकांसमोर सत्यचित्र मांडलें जावें, एवढ्याच हेतूनें. त्यावरून कोणी गैरसमज करून घेणार नाहीं, अशी आशा आहे.

साऱ्या भारतांतील महत्त्वाचीं स्थळें व लोकांच्या रीतीभाती ह्यांसंबंधींची ही माहिती संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडावी. ह्या मालेच्या वाचनानें भारताची व भारतीय लोकसमूहांची थोडीबहुत ओळख वाचकांना होऊं शकली, तर माझें उद्दिष्ट साध्य झालें, असें मी समजेन.

श्रीपाद जोशी

'श्रीरघुवंश', पुणें ४
स्वातंत्र्यदिन, १५ ऑगस्ट, १९६५

# अनुक्रमणिका


बंगालच्या राजधानींत १

तीन स्मारकें ८

शांतिनिकेतन १५

जगन्नाथपुरी २२

कोणार्कचें सूर्यमंदिर ३४

मंदिरांचें आगर : भुवनेश्वर ४५

साक्षीगोपाल ५७

उत्कलची जुनी राजधानी : कटक ६१

भारताच्या पूर्वकिनाऱ्यावर ६७

अनुगुलच्या सूर्योदय संमेलनांत ७४

सवरा नृत्य ८१



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर

# बंगालच्या राजधानींत

## भल्या पहाटे उजाडलें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २७६९५

कलकत्याला माझ्या ओळखीचें कोणी नव्हतें आणि पटना, राजगृह, नालंदा, पावापुरी, गया, बुद्धगया, वगैरे ठिकाणीं हिंडण्यांत पुष्कळ पैसे खर्च होऊन गेलें होते. शिवाय घरून निघाल्यालाही खूप दिवस झाल्यानें घरीं परतण्याची ओढ लागलेली होती. ह्यामुळें कलकत्याच्या इतका जवळ गेलों असूनही मी रॉंचीहून सरळ चॉंडिल-टाटानगर मार्गानें पुण्यास परत फिरण्याचें ठरविलें होतें; परंतु ऐनवेळीं बरोबरच्या मित्रांनीं कलकत्यास जाण्याचा निर्णय केल्यामुळें, मीही लहानपणापासून ज्या कलकत्याचें वर्णन वाचीत आलों होतों, जेथील कालीचीं भीषण वर्णनें ऐकत आलों होतों व भेसूर चित्रें पाहात आलों होतों, त्या कलकत्यावर आपण जणूं उपकारच करीत आहोंत अशा थाटांत, नाइलाजानें, कुरकुरत त्यांच्याबरोबर जाण्याचें ठरविलें.

रॉंचीहून कलकत्ता फक्त १५१ मैल आहे. परंतु रॉंची हें आडमार्गावरील शहर असल्यामुळें कलकत्याला जायला फार वेळ लागतो. शिवाय वाटेंत मुरी जंक्शनवर गाडीही बदलावी लागते. ह्यामुळें प्रवास त्रासदायक होणार अशीच कल्पना होती; परंतु मुरीला मुळींच गर्दी झाली नाहीं आणि आम्ही मोठ्या आरामांत बारा तास आगगाडींत काढून पहाटे साडेपांचला कलकत्याच्या हावडा (हावडा – हावरा – हौरा) स्टेशनांत उतरलों. मला वाटलें होतें, कीं इतक्या पहाटे आम्हांला नेण्यासाठीं कोणी येणार नाहीं व आम्हांला बराच वेळ ताटकळत बसावें लागेल. परंतु हावडा स्टेशनांत गाडी शिरण्यापूर्वीं खिडकींतून बाहेर तोंड काढून पाहिलें तों चांगलें फटफटीत उजाडल्याचें दिसून आलें. माझें घड्याळ मागें आहे

कीं गाडी लेट झाली आहे ह्याचा क्षणभर मला उलगडा होईना, पण दुसऱ्याच क्षणीं लक्षांत आलें, कीं आपण मुंबईपासून सुमारें सव्वा हजार मैल पूर्वेस आलों आहोंत आणि येथें मुंबईपेक्षां सुमारें सव्वा ते दीड तास आधीं सूर्योदय–सूर्यास्त होत असतो.

## उतारूंपेक्षां हमालांची संख्या जास्त

गाडी स्टेशनांत शिरल्याबरोबर हिंदी पद्धतीप्रमाणें हमालांनीं एकदम गाडीवर, म्हणजेच उतारूंवर हल्ला चढविला. बिचारे उतारू! आमच्या गाडींत इतके कमी उतारू होते, कीं त्यांच्यापेक्षां हमालांचीच संख्या जास्त दिसत होती! गेल्या कित्येक वर्षांत असें दृश्य पाहावयास न मिळाल्यामुळें ही गोष्ट मनांत राहून गेली. अर्थात् हें दृश्य आमच्या सुस्थितीचें द्योतक आहे, कीं हलाखीची नांदी आहे, ह्याचा उलगडा करून घेण्याच्या भानगडींत मी पडलों नाहीं; परंतु येथील हमालांचे फाटके कपडे आणि रोडकीं शरीरें पाहून मात्र मनाला फार वाईट वाटलें. त्या मानानें मुंबईचा हमाल कितीतरी धष्टपुष्ट, तरतरीत व सुखी दिसतो. हमालांच्या ह्या हलाखीचें कारण शोधावयास मात्र फार दूर जावें लागलें नाहीं.

## तें भयंकर दृश्य

तिकिट-कलेक्टरच्या हातांत तिकिटें देऊन आम्ही बाहेर आलों तोंच तें भयंकर दृश्य दिसलें. निर्वासित! स्टेशनाचें सारें आवार पूर्व-बंगालमधून आलेल्या निर्वासितांनीं व्यापून टाकलेलें होतें. तेथें त्यांनीं राजरोस बिऱ्हाडेंच थाटलीं होतीं. प्रेतांप्रमाणें निस्तेज व सुकलेलीं शरीरें तेथें घाणीमध्यें लोळत होतीं. चुली पेटल्या होत्या, सकाळच्या न्याहारीची तयारी – भात, पेज – चालली होती आणि त्या चुलीजवळच लहान मुलें प्रातर्विधि उरकीत होतीं. तें बीभत्स दृश्य पाहून अंगावर शहारेच आले; आणि आमच्या स्वतःच्या व सरकारच्या असहायतेबद्दल चीड व तिटकारा आला. त्यांतच कांहीं निर्वासितांनीं दुकानेंही थाटलीं होतीं आणि अशा प्रकारें त्यांनीं आपलें स्वतंत्र गांवच तेथें वसविलें होतें. ते सर्व निर्वासित अगदीं

खालच्या वर्गांतील – आर्थिक व सामाजिक दृष्ट्या निकृष्ट वर्गांतील – दिसत होते. कारण त्यांच्यांत बंगालीपणाचा वारसा सांगू शकेल असा एकही तेजस्वी चेहेरा अथवा टपोरे पाणीदार डोळे दिसले नाहींत. कदाचित् त्यांना आपल्या घरांदारांना मुकून इकडे पळून यावें लागल्यामुळें त्यांची अशी स्थिति झाली असेल! परंतु अगदीं स्टेशनांतच हें किळसवाणें दृश्य दिसल्यामुळें बाहेरून येणाऱ्या व्यक्तीच्या मनांत बंगालचें सरकार आणि बंगाली लोक ह्यांच्याविषयीं आदराची अथवा कौतुकाची भावना निर्माण होत नाहीं एवढें मात्र खरें. अर्थात् कलकत्त्यांतीलही कांहीं लोकांना ह्या गोष्टीची जाणीव असावी असें दिसलें; कारण दुसऱ्याच दिवशीं तेथील 'अमृतबझार पत्रिके' मध्यें एका गृहस्थानें ह्या परिस्थितीकडे सरकार व कॉर्पोरेशन ह्यांचें लक्ष वेधण्यासाठीं लिहिलेलें एक पत्र प्रसिद्ध झालेलें मीं वाचलें.

## जुनाट व गलिच्छ शहर

कलकत्त्याचें हें मुख्य स्टेशन मुंबईच्या बोरीबंदर स्टेशनासारखेंच आहे. परंतु मुंबईच्या मानानें तें अगदीं जुनाट व कोंदट वाटलें. मुंबईच्या स्टेशनची शान व भपका ह्यांचा अर्धा हिस्साही त्याच्या वांट्यास आलेला नाहीं. शहरांतून जातांनाही मनावर अशीच छाप पडली. इमारती जुनाट व रस्ते गलिच्छ. जेथें वस्ती आहे तेथें ती खूपच दाट आहे. त्यामुळें गलिच्छपणांत भर पडत जाते. एका बाबतींत मात्र कलकत्ता भाग्यवान् आहे आणि ती बाब म्हणजे त्याचीं मोठमोठीं मैदानें. शहराच्या वेगवेगळ्या भागांमध्यें ऐसपैस व विस्तृत अशीं मैदानें, क्रीडांगणें, वगैरे असल्यामुळें मुंबईप्रमाणें येथें अष्टौप्रहर अवघडल्यासारखें वाटत नाहीं. परंतु एवढ्या मोठ्या शहरांत लोकल गाड्या नसल्यामुळें ट्राम व बस ह्यांच्यावर खूपच ताण पडत असावा असें दिसतें. आमची उतरण्याची व राहाण्या-जेवण्याची सोय हावडा स्टेशनपासून पांच-सहा मैल दूर असलेल्या बालीगंज भागांत एका लक्षाधीश मारवाडी गृहस्थांकडे करण्यांत आलेली होती आणि आम्ही कलकत्त्यांत असेपर्यंत आमच्या दिमतीस त्यांच्या मोटारगाड्या होत्या; ह्यामुळें आम्हांला ट्रॅम, बस, वगैरे वाहनांचा उपयोग करावा लागला नाहीं व थोड्या अवधीमध्यें पुष्कळच स्थळांना भेटी देतां आल्या.

उपरोल्लेखित बालीगंज भागामध्यें मोठमोठ्या श्रीमंत लोकांचे बंगले आहेत. परंतु मुंबईप्रमाणें येथें श्रीमंत, मध्यम व गरीब असा स्पष्ट भेद आढळला नाहीं. मुंबईस मलबार हिल अथवा मरीन ड्राइव्हसारख्या भागांत एखादा साधा मास्तर अथवा कारकून राहात असल्याचें कोणीं सांगितल्यास आपला त्यावर विश्वासही बसणार नाहीं. परंतु येथें मात्र बालीगंज भागांत मध्यमवर्गीय लोकही राहात असलेले आढळतात. ह्याचें कारण असें, कीं येथील सर्व व्यापार मारवाडी लोकांच्या हातांत आहे आणि मुंबईवर प्रभुत्व गुजराती धनिकांचें आहे. मारवाडी व गुजराती श्रीमंतांच्या मनोवृत्तींत कांहीं बाबतींत फरक आहे. गुजराती मनुष्य श्रीमंत बनला, कीं तो आपण स्वतंत्र श्रेष्ठ वर्गाचे आहोंत असें समजूं लागतो. तो जास्तींत जास्त 'ॲरिस्टोक्रॅट' बनण्याचा प्रयत्न करूं लागतो; परंतु मारवाडी धनिकांमध्यें – विशेषतः अल्पशिक्षित मारवाड्यांमध्यें – खालच्या वर्गांत मिसळून राहाण्याची प्रवृत्ति अधिक असते. आपल्याजवळील संपत्ति वाढली, कीं आपला वर्ग बदलतो, इतकी तीव्र वर्गभावना (Class Consciousness) त्याच्या ठिकाणीं नसते. ह्यामुळें त्याच्या शेजारीं त्याच्यापेक्षां गरीब माणूसही राहूं शकतो. गेल्या कांहीं वर्षांत कलकत्त्यांतील मारवाड्यांमध्येंही ही वर्गभावना वाढूं लागली आहे आणि मुंबईच्या मरीन ड्राइव्हप्रमाणें बड्या भांडवलवाल्यांची स्वतंत्र वसाहत असली पाहिजे, असें त्यांना वाटूं लागलें आहे आणि त्या दृष्टीनें बालीगंज भागांत बंगल्यांची आंखणीही सुरू असल्याचें समजलें. कलकत्ता शहराच्या मानानें बालीगंज भाग पुष्कळच स्वच्छ, शांत व सुंदर आहे; परंतु येथील बंगलेही फार दाटीनें एकमेकांना लागून बांधलेले असल्यामुळें श्रीमंतीचा तोरा त्यांच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं.

## आशियांतील एक आश्चर्य : हावडा ब्रिज

कलकत्त्यांतील कोणत्या एका गोष्टीनें माझें लक्ष सर्वांत जास्त आकर्षित करून घेतलें असेल तर ती गोष्ट म्हणजे हुगळी नदीवरील पूल होय. हावडा स्टेशनपासून हा पूल फार जवळ आहे; म्हणून ह्याला 'हावडा ब्रिज' असें म्हणतात. सुप्रसिद्ध गंगा नदीलाच ह्या ठिकाणीं हुगळी असें नांव प्राप्त झालेलें आहे. येथें ही

नदी खूप खोल आहे. इतकी, कीं लहान लहान बोटी हिच्यांतून संचार करूं शकतात. ह्या बोटींना स्वैरपणें हिंडतां येईल, अशी ह्या पुलाची रचना आहे. नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर ह्या पुलानें आपले पाय रोवलेले आहेत आणि जणूं त्याच्या टांगांमधून बोटी जात-येत असतात. नदीच्या पात्रामध्यें ह्या पुलाला खांबाचा अथवा अन्य कसलाच आधार नाहीं. लक्ष्मणझूल्यासारखा हा पूल अधांतरीं आहे. ह्यामुळें लक्ष्मणझूल्याप्रमाणें तो हालत असेल असें प्रथम वाटलें, परंतु तसें कांहीं दिसलें नाहीं. दोन-अडीच फर्लांग लांबीचा व एका वेळीं पांच-सहा लॉऱ्या जाऊं शकतील एवढ्या रुंदीचा हा अजस्र पूल म्हणजे आशियांतील एक आश्चर्य समजलें जातें. पुलाच्या डोक्यावर तार-खांबांसारख्या खूप उंच व अवाढव्य अशा खांबांचें जणूं जाळेंच आहे. ह्या वरच्या खांबांतील लोहचुंबक शक्तीनें हा पूल अधांतरी लोंबत असतो असें म्हणतात. त्याच्या एकूण स्वरूपावरून असें वाटतें, कीं साध्या प्रकारचा पूल उलटा करून तेथें ठेवला आहे. म्हणजे त्याचे खांब वर आहेत आणि कठडा खालीं आहे. ह्या पुलावरून ट्रॅम जाऊं लागली, कीं खालील बाजूस असणाऱ्यांना विजेचा गडगडाट झाल्याचा भास होतो, इतका जोराचा खडखडाट तिच्यामुळें होतो. ह्या पुलाच्या मुळाशीं असलेलें शास्त्रीय तत्त्व मात्र आम्हांला नीट आकलन झालें नाहीं. कांहीं लोकांनीं असें सांगितलें, कीं स्प्रिंगप्रमाणें हा पूल ताणलेला आहे. ह्यामुळें तो वाटेल तितकें ओझें सहन करूं शकतो. परंतु मग आम्हांला असें वाटलें, कीं जर इतक्या साध्या उपायानें इतका प्रचंड पूल तयार करतां येत असेल तर अन्यत्र एवढा आटापिटा कां केला जात असेल? ह्याचा अर्थच हा, कीं अशा प्रकारच्या पुलाच्या उभारणीला खूपच खर्च येत असला पाहिजे. आम्ही ह्या पुलावरून अनेक वेळां आलों गेलों, परंतु त्याची ती भव्यता व शान पाहाण्याची आमची हौस कांहीं पुरी झाली नाहीं.

## कालीमंदिर कीं कसाईखाना ?

कलकत्याला जाऊन कालीमातेचें दर्शन घ्यायचें नाहीं म्हणजे काशीला जाऊन विश्वेश्वराचें दर्शन न घेण्यासारखेंच आहे. परंतु कालीसमोर बकऱ्यांचा बळी

दिला जातो व तें किळसवाणें दृश्य आपल्यानें पाहवणार नाहीं म्हणून त्या देवळांत जावें कीं नाहीं, ह्याविषयीं आमच्यांत चर्चा चालली होती. इतक्यांत कोणींतरी सांगितलें, कीं कालीपुढें फक्त मंगळवारीं व शुक्रवारींच बकरीं कापलीं जातात. म्हणून आम्ही ते दोन दिवस वगळून सोमवारीं त्या देवळांत गेलों. फक्त उत्तर-भारतांतील देवळेंच कोंदट व गलिच्छ असतात, असा माझा आतांपर्यंत ( गैर ) समज होता, परंतु कालीचें देऊळ पाहून पूर्व-भारतही उत्तरेच्या फार मागें नाहीं असा अनुभव आला ! देवळाच्या सभोवतीं लहान लहान होम पेटलेले होते आणि भक्तगण व भटजीमहाराज मिळून स्वर्गाची शिदोरी बांधीत होते. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आम्ही मंदिरांत शिरलों तों तेथेंही तोबा गर्दी ! त्यांतच पुन्हा त्या एवढ्याशा मंदिराचें आवार पोथ्या वाचीत बसलेल्या भटजींनीं अडवून टाकलें होतें. ह्यामुळें मोठ्या मुष्किलीनें माणसाला इकडून तिकडे जातां येत होतें. खेड्यांतील प्राथमिक शाळेंतील मुलें गणित अथवा शुद्धलेखन घेतांना जशीं तोंडें फिरवून ओळीनें बसतात तसे येथील भक्त लोक आपल्या पोथ्या घेऊन वाचीत बसलेले पाहून गंमत वाटली आणि आपल्या भक्तीचें जाहीर प्रदर्शन करण्याची त्यांची हौस व चिकाटी ह्यांचें कौतुक वाटलें.

## निरपराध कोकरांचे बळी

देवीच्या मूर्तीसमोर जाण्यापूर्वी नाण्यांचा खणखणाट कानीं पडला. जणूं पत्र्याच्या छपरावर गारांचा वर्षाव व्हावा त्याप्रमाणें देवीपुढील मोठ्या थाळीमध्यें लहानमोठ्या नाण्यांचा खणखण आवाज होत होता. जास्त पैसे देणाऱ्याला जास्त वेळ दर्शन मिळत असावें. कारण पैसे न देणाऱ्याला तेथून लवकरच हुसकून लावण्यांत येत होतें. अर्थात् देवीपुढें पैसे न टाकणारे बहुधा आम्हीच असूं. ह्यामुळें आम्ही चटकन् बाजूला झालों. इतक्यांत तेथें एक लहानसें करडूं आणण्यांत आलें आणि आमच्या डोळ्यांदेखत देवीसमोरच्या उंबऱ्यावर कचदिशीं त्याची मान तोडण्यांत आली. भक्तीचा तो बाजार पाहून मी आधींच विटलों होतों; त्यांत हें बीभत्स दृश्य पाहून जास्तच किळस आली. तेथील गर्दीनें

तर जीव गुदमरूं लागला होता. ह्यामुळें आम्ही पुन्हा एक्वार देवीचें दर्शन घेऊन तेथून आपली सुटका करून घेतली. येथें देवीची एखादी मूर्ति असेल अशी आमची कल्पना होती. परंतु प्रत्यक्ष पाहातां असें दिसलें, कीं एका मोठ्या शिळेवर देवीचा चांदीचा मुखवटा चढविला असून ती शिळा रक्तानें माखलेली आहे. एवढ्या मोठ्या सुशिक्षित व सुधारलेल्या शहरांत मध्ययुगांतील ही रानटी प्रथा इतक्या प्रचंड प्रमाणांत चालू असलेली पाहून मन आश्चर्यानें थक्क आणि उद्विग्नही झालें !

देवळांतून बाहेर पडतांच जणूं ह्या साऱ्या दृश्यांवर कळस चढविणारें असें दृश्य नजरेस पडलें. देवीपुढें जे बकरे मारले जात त्यांचीं मुंडकीं ओळीनें ठेवून व समोर विळी घेऊन एक बाई बसली होती आणि त्या मुंडक्यांचे बारीक बारीक तुकडे करून विकीत होती. भगत लोक प्रसाद म्हणून ते मांसाचे तुकडे मोठ्या आदरानें घेऊन जात होते. धर्मासंबंधीं उबग आणण्यास हें एकच दृश्य पुरेसें आहे असें मला वाटलें. धर्माच्या नांवावर मारल्या गेलेल्या त्या निरपराध कोकरांचे बाहेर आलेले निष्पाप डोळे जणूं जाब विचारीत होते, कीं 'आम्हीं तुमचं काय घोडं मारलं होतं म्हणून तुम्ही आमची अशी विटंबना करीत आहांत ?'

## १८३ वर्षांचा अक्षयवट

कलकत्ता पाहाण्यासाठीं आमच्याजवळ फार थोडा वेळ होता म्हणून अन्यत्र पाहावयास न मिळणाऱ्या गोष्टी तेवढ्या पाहून घेण्याचें आम्हीं ठरविलें. त्याप्रमाणें सायंकाळीं कलकत्त्यापासून दहा-बारा मैलांवर असलेल्या बोटॅनिकल गार्डनमधील अक्षयवट पाहाण्यास आम्ही गेलों. ह्यापूर्वीं मी मद्रासजवळील अड्यार येथील प्रचंड वटवृक्ष पाहिला होता, परंतु कलकत्त्याचा वृक्ष त्याच्यापेक्षांही मोठा आहे असें मला सांगण्यांत आल्यानें मनामध्यें विशेष अपेक्षा निर्माण झाली होती. प्रत्यक्ष तें वडाचें झाड पाहिल्यानंतर मात्र कांहींसा अपेक्षाभंगच झाला. कारण हा वड म्हणजे एखादें झाड नसून अनेक झाडांचा मांडवच आहे असा भास होतो. अड्यारचा वड खूप उंच, भरभक्कम, जाडजूड आणि शानदार वाटतो, तर येथील

वड म्हणजे मनुष्यनिर्मित लताकुंजासारखा वाटतो. ह्या झाडाचा मूळ बुंधा कुजून नाहींसा झालेला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मूळ खोडाचा जमिनीपासून साडेपांच फूट उंचीवर ५१ फूट घेर असून झाडाचा एकूण विस्तार सुमारें ११७५० चौरस फूट आहे. झाडाची जास्तींत जास्त उंची ९२ फूट असून जमिनीपर्यंत पोंचून एकजीव झालेल्या पारंब्यांची संख्या (१९५२ सालीं) ११५७ फूट होती. हें झाड सुमारें १८३ वर्षांचें असावें असें तेथें लिहिलेल्या पाटीवरून दिसतें.

झाडाला पारंबी फुटली, कीं तिच्या संरक्षणासाठीं मोठे गोल बांबू मधोमध चिरून तिच्या दोन्ही बाजूंस ठेवण्यांत येतात आणि तिनें जमिनीमध्यें पूर्णपणें मूळ धरलें कीं बांबू काढून टाकण्यांत येतात. अशा प्रकारें ह्या झाडाचा घेर वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालू आहे. माणसाची मेहनत व अक्कलहुशारी ह्यांचा नमुना म्हणून हें झाड अवश्य पाहाण्यासारखें आहे. परंतु गुजरातेंतील कबीरवड किंवा अल्लाहाबादचा अक्षयवट ह्यांची भव्यता व शान त्याच्या ठिकाणीं नाहीं एवढें मात्र खरें!

# ती न स्मा र कें

## आधुनिक बंगालचे तीन महापुरुष

गेल्या दोनशें वर्षांत बंगाल प्रांतानें भारताला व जगाला इतके महापुरुष दिले आहेत, कीं त्यांच्या कल्पनेनेंच मस्तक नत व्हावें. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत 'सुजला सुफला मलयजशीतला' व 'सस्यश्यामला' वंगभूमीनें आपल्या कुशींतून वीरांना व महात्म्यांना जन्म दिला आहे. त्यांच्यापैकीं तीन महापुरुषांच्या स्मारकांचें दर्शन घेऊन मी नुकताच परत आलों. ते महापुरुष म्हणजे स्वामी रामकृष्ण परमहंस,

स्वामी विवेकानंद आणि बाबू सुभाषचंद्र बोस. ह्यांपैकीं पहिले दोघे भारताच्या आध्यात्मिक आघाडीवरील सेनापति असून, तिसरे राजकीय आघाडीवरील शूर वीर आहेत. रामकृष्ण आणि विवेकानंद ह्यांच्या थोरपणाची कल्पना आजच्या पिढीला सहजासहजीं येणार नाहीं. परंतु पंचवीस वर्षांपूर्वीं ज्या पिढीनें भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामांत उडी घेतली होती, तिच्यांतील बहुतेक सर्व तरुणांवर ह्या दोन सत्पुरुषांच्या जीवनाची व उपदेशाची विलक्षण छाप पडलेली दिसून येते. अनेकांना त्यांच्यापासूनच राष्ट्रसेवेची स्फूर्ति मिळाली आहे. ह्या दृष्टीनें हे दोन महापुरुष आजच्या पिढीलाही पूज्य व आदरणीय वाटले पाहिजेत.

## दक्षिणेश्वराचें शांत व रम्य स्थान

स्वामी विवेकानंदांचे गुरु स्वामी रामकृष्ण परमहंस आयुष्यभर ज्या ठिकाणीं राहिले त्याला दक्षिणेश्वर असें नांव आहे. हा भाग तसा कलकत्त्यांतच मोडतो. परंतु हावडा रेल्वे स्टेशनपासून तो पांच-सहा मैल दूर आहे. आमच्याजवळ स्वतःची खाजगी मोटार असल्यामुळें आगगाडी किंवा बस ह्यांसाठीं आम्हांला खोळंबून राहावें लागलें नाहीं. आम्ही थोड्याच वेळांत दक्षिणेश्वरास जाऊन पोंचलों. ह्या ठिकाणीं कोळ्यांची राणी रासमणी हिनें बांधविलेलें कालीमातेचें छोटेंसें पण सुंदर मंदिर आहे. कोळ्यांच्या राणीचें देऊळ असल्यामुळें कालीची पूजा करण्यास कोणी ब्राह्मण मिळेना. अखेर अल्पवयस्क गदाधर कालीपूजेस तयार झाला आणि आजन्म तो तेथेंच राहिला. 'माते दर्शन दे' असा ध्यास घेऊन त्यानें ह्याच मंदिरांत कालीची उपासना केली आणि अखेर शेवटीं कालीमातेचें दर्शन मिळविलें. हा गदाधर म्हणजेच स्वामी रामकृष्ण परमहंस. येथील कालीची मूर्ति सुंदर आहे. तिच्या पायाखालीं एक पुरुष सापडलेला आहे. प्रथम माझी अशी समजूत होती, कीं तो पुरुष राक्षस असावा. परंतु नंतर असें उमजलें, कीं राक्षसांचा संहार केलेल्या कालीला संहाराचा मद चढला व ती तांडव करूं लागली. त्या भरांत खुद्द शंकराच्या छातीवरच तिचा पाय पडला आणि तें लक्षांत येतांच तिनें लाजेनें जीभ बाहेर काढली, अशी एक कथा आहे. ह्या

मंदिराच्या समोर सभामंडप आहे. सामान्यतः मंदिराच्या गाभाऱ्याला लागूनच सभामंडप असतो. परंतु येथें मंदिर व सभामंडप ह्यांमध्यें पंधरा-वीस फुटांचें अंतर आहे. ह्या सभामंडपांत रामकृष्ण कथाकीर्तन करीत असें म्हणतात.

## राधागोविंदजीचें मंदिर

ह्या देवळाला लागूनच राधा-गोविंदजीचें म्हणजे राधा-कृष्णाचें देऊळ आहे. रामकृष्णांच्या जीवनांतील कांहीं भाग स्वतःला राधा समजून कृष्णाची उपासना करण्याच्या भक्तिमार्गामध्यें व्यतीत झालेला होता. त्या वेळीं राणी रासमणीनें त्यांच्यासाठीं हें मंदिर बांधवून दिलें होतें. ह्या देवळांत विशेष असें कांहीं नाहीं. ह्या दोन्ही देवळांच्या समोर बारा ज्योतिर्लिंगांचीं बारा लहान लहान देवळें आहेत. त्यांतील काळ्याभोर दगडाचीं शिवलिंगें सुंदर आहेत. ह्या देवळाच्या आवारांतच स्वामी रामकृष्णांची खोली आहे. ते ज्या चौरंगांवर बसून ज्ञानोपदेश देत ते दोन्ही तेथें आहेत. त्यांचें अंथरूणपांघरूण व रोजचीं वापरण्याचीं भांडीं वगैरेही तेथें आहेत. येथील सर्व व्यवस्था व वातावरण थेट बंगाली व भारतीय आहे. स्वामीजींच्या धर्मपत्नी व शिष्या श्रीमती शारदामणिदेवी ऊर्फ श्रीमाता ह्यांची खोली येथून जवळच आहे. ही खोली इतकी लहान आहे, कीं जरा ऐसपैस माणसाला येथें सरळ झोपतांही येणार नाहीं. परंतु त्या साध्वीनें त्या एवढ्याशा खुराड्यांत सारा जन्म काढला इतकेंच नव्हे, तर स्वतः पतिपत्नी व अभ्यागत ह्यांच्याकरितां स्वयंपाकपाणी करण्यासाठींही त्यांनीं त्याच खोलीचा वापर केला हें ऐकून आश्चर्यानें थक्कच झालों.

स्वामीजींचे गुरु तोतापुरी ह्यांनीं स्वामीजींना ज्या खोलीमध्यें संन्यासधर्माची व योगाची दीक्षा दिली ती खोलीही तेथून जवळच आहे. त्या खोलीच्या बाहेर असलेल्या वडाच्या झाडाखालीं रामकृष्ण परमहंस व विवेकानंद ध्यानासाठीं बसत असत. येथून गंगेचें दृश्य फारच मनोहर दिसतें. येथील गंगाघाट सुंदर आहे. डाव्या बाजूला असलेला वेलिंग्टन ब्रिज फार छान आहे. घाटावरून समोरच्या कांठावरील बेलूर मठ दिसतो. तेथें होडीनें जातां येतें. परंतु आमच्याजवळ वेळ

फार थोडा होता, ह्यामुळें तो जलविहाराचा मोह टाळणें जरूर होतें. सर्व पाहून झाल्यानंतर आम्ही शहाळ्याचें पाणी प्यालों आणि अतृप्त अंतःकरणानें स्वामी रामकृष्ण परमहंसांची मूर्ति मनांत घोळवीत तेथून परतलों. शहरापासून जवळ असल्यामुळें आणि व्यवस्था नीट न राखल्यामुळें मंदिराबाहेरील पंचवटीला मुंबईच्या चौपाटीचें स्वरूप प्राप्त झालें आहे. उष्टीं-खरकटीं पानें व कागद इतस्ततः विखुरलेले होते. ते पाहून मनाला विषाद वाटला. अशा विशिष्ट ठिकाणीं लोकांनीं जास्त संयमानें व शिस्तीनें वागलें पाहिजे, असेंच मला नेहमीं वाटतें. त्यांत महात्म्यांचा मान-अपमान होत नसेलही कदाचित्, परंतु ह्या बेशिस्तपणामुळें आमच्या राष्ट्रीय आत्म्याचा मात्र ऱ्हास होत असतो.

## बेलूर मठाचें वैशिष्ट्य

दक्षिणेश्वराकडून बेलूरला जातांना वाटेंत कलकत्त्यांतील हावडा ब्रिजपेक्षां किंचित् लहान असा साधा वेलिंग्टन पूल लागतो. ह्या पुलावरून जाणाऱ्या-येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस २ पैसे, मोटारीला ८ आणे व लॉरीला १२ आणे कर भरावा लागतो. हावडा पुलावरून जाणाऱ्यांना जो कर भरावा लागत नाहीं, तो ह्या पुलावरून जाणाऱ्यांना कां भरावा लागत असावा, ह्याची कांहींच कल्पना आली नाहीं. कर वसूल करणाऱ्या नोकरांजवळ चौकशी केली, परंतु त्यांनाही कांहीं सांगतां आलें नाहीं.

बेलूर मठ ही विश्वविख्यात स्वामी विवेकानंदांची सृष्टि. येथील सारें वातावरण अगदीं आधुनिक, पाश्चात्य पद्धतीची छाप पडलेलें असें आहे. स्वच्छता, टापटीप व शिस्त ह्यांचें दर्शन येथें पदोपदीं घडतें. दक्षिणेश्वराप्रमाणें गलिच्छपणा व अस्ताव्यस्तपणा येथें नांवालाही नाहीं. साऱ्या जगभर रामकृष्ण मिशनचीं जीं केंद्रें चालतात त्यांचें संचालन येथून होतें. त्यामुळें येथील व्यवस्थापक अत्यंत हुशार व व्यवहारकुशल असतात. रामकृष्ण-विवेकानंदांच्या मार्गानें जनसेवा व आत्मोन्नति साधण्याची इच्छा बाळगणारे तरुण येथील मठांत भरती होतात. त्यांना धर्मवेदान्ताबरोबरच व्यावहारिक जीवनाचें व हस्तोद्योगांचेंही शिक्षण देण्यांत येतें

आणि मिशनऱ्यांच्या वृत्तीनें सेवाकार्यास योग्य बनविण्यांत येतें. हा मठही नदीकांठींच आहे आणि येथूनही गंगेचें दृश्य मोठें मनोहर दिसतें.

## रामकृष्णांची अप्रतिम प्रतिमा

येथील मुख्य प्रेक्षणीय गोष्ट म्हणजे स्वामी विवेकानंदांनीं १८९७ सालीं सोळा लाख रुपये खर्चून आपल्या गुरूंचें – स्वामी रामकृष्ण परमहंसांचें – बांधलेलें भव्य मंदिर होय. मंदिराचा सगळा खर्च विवेकानंदांच्या अमेरिकन शिष्यांनीं केला. मंदिराच्या उभारणीच्या कामींही परदेशी स्थापत्यविशारदांचा हात प्रामुख्यानें असला पाहिजे, हें चटकन् लक्षांत येतें. अत्याधुनिक पद्धतीनें बांधलेलीं अशीं मंदिरें क्वचितच पाहावयास मिळतात. ह्या मंदिराच्या बांधणींत भारतीय स्थापत्य आणि रोमन कॅथॉलिक स्थापत्य ह्यांचा मधुर संगम झालेला आहे. एखाद्या सुंदर युरोपियन युवतीनें नऊ वारी काळी चंद्रकळा नेसून ठसठशीत कुंकुमतिलक लावावा तसें हें मंदिर वाटतें.

मंदिरांतील पुरुषभर उंचीची गौरवर्णी संगमरवरी दगडाची स्वामी रामकृष्णांची मूर्ति म्हणजे शिल्पकलेचा एक अप्रतिम व अद्भुत नमुनाच आहे. इतकी सहज व स्वाभाविक मुद्रा फार थोड्या शिल्पांत पाहावयास मिळते. त्यांचें उघडें तोंड आणि किलकिले डोळे ह्यांमुळें समोर मूर्ति नसून जिवंत स्वामीच बसले आहेत व ते आपल्याशीं कांहींतरी बोलल्याशिवाय राहाणार नाहींत, असा क्षणभर भास होतो.

## विवेकानंदांची खोली आणि समाधि

येथून जवळच स्वामी विवेकानंदांची स्वतःची राहाण्याची खोली आहे. ह्या खोलींतील फर्निचर व इतर सामान ह्यांवर पाश्चात्यांची बरीच छाप पडलेली दिसते. स्वामीजींची बसण्याची जागा, कॉट, सोफासेट, ज्याच्या समोर उभे राहून ते व्यायाम करीत तो आरसा, वगैरे सर्व गोष्टी जेथल्या तेथें जपून ठेवलेल्या आहेत.

परंतु इतक्या अव्ययावत् पद्धतीनें राहाणाऱ्या स्वामीजींची समाधि मात्र अगदीं साधी आहे. किंबहुना साधेपणाचा अगदीं कडेलोट झाला आहे असें म्हणतां येईल. विवेकानंदांनीं आपल्या गुरूची भव्य व आलीशान प्रतिमा करून बसविली त्याबद्दल स्वामी रामकृष्णांचे अनेक शिष्य त्यांच्यावर रुष्ट झाले होते असें म्हणतात. परंतु त्यांनीं स्वतःच्या बाबतींत मात्र मूर्तिपूजेला वाव ठेवला नाहीं. आपण निवर्तल्यानंतर आपली समाधि कशी बांधावी त्याचा आराखडा विवेकानंदांनीं आधींच तयार करून ठेवला होता. त्याप्रमाणें त्यांच्या समाधीवर एक संगमरवरी रक्षाकुंभ व त्या कुंभावर सोनेरी रंगाचें ॐ हें अक्षर एवढ्या दोनच वस्तु आहेत. तेथें मूर्ति, वचन, वगैरे कांहींएक नाहीं. हा साधेपणा मला फारच आवडला.

## नेताजींचें निवासस्थान

राष्ट्रगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस जिवंत आहेत कीं नाहींत ह्याबद्दल राजकीय पुढाऱ्यांमध्यें जरी अद्यापि वादंग सुरू असलें, तरी माझ्यासारख्या सामान्य भारतीय माणसाला नेताजींच्या अस्तित्वाची फारशी शक्यता वाटत नाहीं हें मात्र खरें. ह्यामुळें भवानीपुर भागांतील नेताजींचें निवासस्थान पाहातांना आपण एका महान् वीर पुरुषाचें स्मारक पाहात आहोंत अशी भावना माझ्या ठिकाणीं विद्यमान होती. बोस कुटुंबाचें वंशपरंपरागत मालकीचें हें घर जुन्या पद्धतीच्या वाड्याप्रमाणें भासतें. कै. शरच्चंद्र बोस ह्यांनीं हें घर सुभाषबाबूंचें स्मारक म्हणून समाजाला अर्पण केलें आहे.

फाटकांतून आंत शिरतांच पोर्चमध्यें मुख्य दरवाजासमोर नेताजींचा लष्करी गणवेषांतील सुमारें दीड पुरुष उंचीचा सैनिकी सलामी घेत असलेला रुबाबदार पुतळा आहे. जिन्यांतून वर चढतांना १८५७ च्या बंडांतील पराक्रमी स्त्री-पुरुषांचीं आकर्षक चित्रें पाहावयास मिळतात. पहिल्याच मजल्यावर नेताजींची खोली आहे. ज्या वेळीं नेताजी ह्या घरांतून अखेरचे अंतर्धान पावले, त्या वेळीं ह्या खोलीची जशी स्थिति होती, तशीच ती आतांपर्यंत ठेवण्यांत आलेली आहे. त्यांचा झोपण्याचा पलंग, ज्यावर ते ध्यानधारणा करीत तें

व्याघ्रचर्म, त्यांचे कपडे, पादत्राणें, घड्याळ, वगैरे सर्व वस्तु जपून ठेवण्यांत आल्या आहेत. त्या पाहिल्यानंतर क्षणभर असा भास होतो, कीं नेताजी येथेंच राहात आहेत व कांहीं कामासाठीं नुकतेच बाहेर गेले आहेत.

## हिंदी दासबोध व गीतारहस्य

दुसऱ्या खोलीमध्यें नेताजींना मिळालेलीं वेगवेगळ्या भाषांतील मानपत्रें व तऱ्हतऱ्हेचे सोन्याचांदीचे करंडक ठेवलेले आहेत. तेथेंच त्यांच्या नित्य वाचनांतील पुस्तकें कांचेच्या कपाटांत ठेवलेलीं आहेत. त्यांत काँग्रेसचा इतिहास, रवींद्रांचें बंगाली साहित्य, वगैरे पुस्तकें तर आहेतच पण सर्पदंशावरील एक पुस्तकही तेथें दिसलें. हिंदी दासबोध व हिंदी गीतारहस्य पाहून महाराष्ट्रीय ह्या नात्यानें आणि पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा इतिहास पाहून पुणेंकर ह्या नात्यानें मला उगीचच अभिमान वाटला. दासबोध व गीतारहस्य ह्या दोन्ही ग्रंथांविषयींचें माझें ज्ञान, वाचन यथातथाच आहे व नूतन मराठी शाळेचा विद्यार्थी असल्यामुळें मला डेक्कन एज्युकेशन सोसायटीबद्दल आपलेपणा वाटण्याचें तसें कांहींच कारण नाहीं. परंतु परप्रांतांत गेल्यानंतर आपल्या प्रांतांतील प्रत्येक लहानसहान गोष्टीबद्दल आपल्याला विनाकारणच जिव्हाळा व अभिमान वाटूं लागतो. त्यांत पुन्हा गुलाम भारताचे लाडके नेताजी जीं पुस्तकें आपल्या नित्यवाचनाच्या संग्रहांत ठेवीत त्यांच्याशीं महाराष्ट्राचा संबंध असलेला पाहून कोणाला गर्व वाटणार नाहीं? नेताजींच्या खोलीशेजारींच त्यांचे थोरले बंधु कै. बाबू शरच्चंद्र बोस ह्यांची खोली असून तिच्यांत त्यांना मिळालेलीं मानपत्रें, वगैरे आहेत. सध्या ह्या इमारतींत आझाद हिंद फौजेच्या माजी सैनिकांची कचेरी आहे. तें यथायोग्यच वाटलें.

# शां ति नि के त न

## रवींद्रनाथांची कर्मभूमि

कलकत्याला गेल्यानंतर शांतिनिकेतनला भेट न देणें म्हणजे आग्र्याला जाऊन ताजमहाल न पाहाणें किंवा कन्याकुमारीला जाऊन सूर्योदय-सूर्यास्त-दर्शनाचा आनंद न लुटणेंच होय. तसें शांतिनिकेतन कलकत्त्यापासून कांहीं जवळ नाहीं. ज्या बोलपुर स्टेशनवर उतरून शांतिनिकेतनला जावयाचें असतें तें बोलपुर स्टेशन हावडा स्टेशनपासून वायव्य दिशेस एक्याण्णव मैल दूर आहे आणि तेथें पोंचण्यास किमान तीन-साडेतीन तास तरी लागतात.

हावडाकिऊल पॅसेंजरनें सकाळीं ७-२० ला कलकत्त्याहून निघून आम्ही १०-४६ ला बोलपुरला पोंचलों. आमच्याच डब्यांत अहमदाबादहून कलकत्त्यास कार्यक्रमासाठीं आलेल्या 'रंगमंडल' ह्या हौशी नाटक मंडळाचे कलावंत शांतिनिकेतनला जाण्यासाठीं बसले होते. त्यांना कलकत्त्यास बोलाविणारे श्री. नवनीतलाल दोशी पूर्वी पुण्यास व मुंबईस राहिले होते. १९३०-३२ च्या स्वातंत्र्य लढ्यामध्यें भाग घेऊन त्यांनीं येरवड्याची हवाही खाल्ली होती. ह्यामुळें मराठी भाषेशीं त्यांचा चांगला परिचय होता. आम्ही आपापसांत मराठी बोलत होतों तें ऐकून श्री. दोशींनीं मराठींत आमची चौकशी केली.

बोलपुरला उतरून स्टेशनच्या बाहेर पडलों तों समोरच शांतिनिकेतनची स्टेशनवाघीण उभी होती. रंगमंडलच्या लोकांनीं आधीं कळवून ठेवल्यामुळें त्यांच्यासाठीं ती आलेली होती. अर्थात् एव्हांना आमची त्यांच्याशीं इतकी दोस्ती झाली होती, कीं त्यांनीं आम्हांला आपल्यापैकींच समजून मोटारींत घेतलें. स्टेशनपासून दीड-दोन मैलांवर शांतिनिकेतनचें नवें गेस्ट-हाउस आहे. तेथें

जाऊन आम्ही उतरलों. तेथील गेस्ट हाउसमध्यें राहाण्याचें रोजचें भाडें एक रुपया असून जेवणाला दीड-दोन रुपये व दुपारच्या चहाला आठ आणे पडतात. बेचव भात आणि सालीसकट बटाट्याची भाजी नाइलाजानें पोटांत भरून आम्ही शांतिनिकेतन पाहावयास निघालों. दुपारीं अडीच ते साडेचारपर्यंतच शांतिनिकेतन उघडें असतें. त्यामुळें ह्या वेळांत सर्व पाहून घ्यावयाचें होतें. नव्या अतिथिगृहापासून शांतिनिकेतन सुमारें मैलभर दूर आहे आणि तेथून श्रीनिकेतन मैल दीड मैल लांब आहे. रंगमंडलच्या लोकांसाठीं स्टेशनवाघिणीची सोय आधींच करण्यांत आलेली होती. त्यांनीं आम्हांला बरोबर घेतलें. त्यामुळें तेवढ्या थोड्या अवधींत जें कांहीं बघतां येण्यासारखें होतें तें आम्ही बघूं शकलों. रवींद्रनाथांचे चिरंजीव श्री. रथींद्रनाथ ठाकुर ह्यांच्या मानलेल्या कन्येचे – नंदिनीचे – यजमान श्री. गिरिधारी लाला येथें दंतवैद्य म्हणून काम करतात. ते गुजराती असल्यामुळें 'रंगमंडल'च्या कलावंतांना सारें शांतिनिकेतन दाखविण्याची जबाबदारी त्यांनीं प्रेमानें अंगीकारली होती.

शांतिनिकेतन म्हणजे हिरव्यागार, दाट छायेच्या वृक्षांची राई असेल, त्याच्या सभोंवार बंकिमचंद्रांची सुजला-सुफला, मलयज-शीतला व सस्य-श्यामला वंगभूमि पाहावयास मिळेल अशी आमची अपेक्षा होती. परंतु येथील ओसाड माळ आणि रखरखीत मैदान पाहून आमच्या कल्पनेंतील नंदनवन दिवास्वप्नाप्रमाणें उडून गेलें आणि असल्या वैराण जागेंत राहूनही रवींद्रबाबूंची चिरयौवन प्रतिमा शेवटपर्यंत टवटवीत राहिली ह्याबद्दल त्यांच्याविषयींचा आदर अनेक पटींनीं वाढला.

प्रथमदर्शनीं जरी ह्या जागेबद्दल प्रतिकूल मत झालें तरी थोड्या वेळानें तिच्यांतील गुण व तिचें वैशिष्ट्य हीं ध्यानांत आल्याशिवाय राहात नाहींत. ह्या ठिकाणीं झाडेंझुडपें अथवा डोंगरदऱ्या मुळींच नाहींत. ह्यामुळें क्षितिजाजवळ आकाश आणि भूमि ह्यांची भेट होते. सूर्योदय व सूर्यास्त ह्यांचें दर्शन स्पष्टपणें होतें आणि असें सांगतात, कीं तेथें ऋतूंतील परिवर्तन चटदिशीं जाणवतें. म्हणजे ह्या मैदानाची प्रवृत्ति कवीच्या मनाप्रमाणेंच तरल व संवेदनशील आहे. प्रत्येक ऋतूवर रवींद्रबाबूंनीं ज्या असंख्य

सुंदर कविता लिहिल्या आहेत, त्यांचें कांहीं श्रेय अशा प्रकारें ह्या ओसाड माळरानालाही मिळूं शकतें.

## श्रीनिकेतनची उद्योगशाळा

आम्ही प्रथम श्रीनिकेतनला गेलों. तेथें हस्तोद्योग व यंत्रोद्योग ह्यांचा समन्वय करणारी उद्योगशाळा चालते. येथें नाना प्रकारचें रंगीबेरंगी कापड विणणारे हातमाग व यंत्रमाग आहेत. कापड कापण्यासाठीं यंत्रें बसविलेलीं आहेत. कातड्यावर उत्तम नक्षी व कारागिरी केली जाते. मातीच्या भांड्यांवर लाखेचें व वॉर्निशचें सुंदर काम केलें जातें. तेथें एक मुका व बहिरा विणकर आहे. तो सर्वांत जास्त वेगानें आणि अत्यंत नाजूक कलाकुसरीचें नक्षीकाम करतो. आम्ही खादीवाले असल्यामुळें आम्हांला त्या गिरणीच्या सुताच्या कापडाबद्दल कांहीं विशेष आकर्षण वाटलें नाहीं. मातीचीं भांडीं घेण्याची मात्र खूप इच्छा झाली, परंतु सामान्यपणें ज्या वाटीची किंमत दोन-तीन आण्यांपेक्षां जास्त असणार नाहीं, तिची रुपया सव्वा रुपया किंमत लावलेली पाहून आम्हीं तो नादही सोडून दिला.

## दोन महाराष्ट्रीय संगीत शिक्षक

श्रीनिकेतन पाहून झाल्यानंतर आम्ही मोटारनें शांतिनिकेतनास आलों. तेथें चित्रकला व संगीत ह्यांचे वर्ग पाहिले. शांतिनिकेतनांतील वर्ग झाडाखालीं चालतात आणि तेथें मातीच्याच झोपड्या बांधलेल्या आहेत असें ऐकलें होतें. परंतु हे सर्व वर्ग चांगल्या प्रशस्त सिमेंट-क्रॉंक्रीटच्या खोल्यांतून चालत असलेले पाहून विरस झाला. कदाचित् उन्हामुळें त्यांना तसें करावें लागलें असेल. परंतु एकतर तेथें झाडें फारशीं नाहींत आणि जीं झाडें आहेत त्यांच्याखालीं गवत वाढून वाळलेलें दिसलें. ह्यावरून त्यांचा वापर सध्या होत नसावा असें दिसतें. कदाचित् रवींद्रबाबू असतांना मोकळ्या मैदानांत वर्ग भरत असतील. नाहीं म्हणावयाला हिंदीचे एक शिक्षक आपल्या एका विद्यार्थ्याला झाडाखालीं बसून शिकवीत होते. येथील वर्गांतून विद्यार्थ्यांची संख्या मात्र थोडी दिसली. ह्यावरून



१८२८४ दि: ९५.६

प्रत्येक विद्यार्थ्याकडे शिक्षकाला भरपूर लक्ष देतां येतें. नागपूरकडील श्री. वझलवार आणि इंदूरकडील एक असे दोन महाराष्ट्रीय गृहस्थ संगीतशिक्षक म्हणून अनेक वर्षांपासून येथें काम करीत आहेत. सुप्रसिद्ध चित्रकार श्री. नंदलाल बसू ह्यांना भेटण्याची आम्हांला फार इच्छा होती, परंतु ते सध्या आजारी असल्यामुळें कोणाला भेटत नाहींत असें कळल्यामुळें त्यांच्या चिरंजीवांना पाहूनच दुधाची तहान ताकावर भागवावी लागली. त्यांचे चिरंजीवही उत्कृष्ट चित्रकार असून ते चित्रकलेचे वर्ग घेत होते. तेथें नाट्यकलेचें अध्ययन-अध्यापन विशेषत्वानें चालतें. किंबहुना रवींद्रांचीं नाटकें बसवून त्यांचे प्रयोग करणें हा तेथील एक महत्त्वाचा कार्यक्रम असतो. त्यांच्या द्वारें विद्यार्थ्यांना नृत्य, संगीत व साहित्य ह्यांचें ज्ञान आपोआपच होतें. त्यासाठीं नुकतेंच एक मोठें सिमेंट–कॉंक्रीटचें भव्य स्टेज बांधण्यांत आलें आहे. तें पाहून आम्ही शांतिनिकेतनच्या ग्रंथालयांत आलों. ह्या ग्रंथालयांत जगांतील व भारतांतील बहुतेक सर्व भाषांचीं पुस्तकें आहेत. ग्रंथालयाची व्यवस्थाही फार चांगली दिसली.

## तिबेटी व चिनी ग्रंथांचा संग्रह

‘चीना-भवन’ हें शांतिनिकेतनचें एक विशेष आकर्षण आहे. भारताच्या पारतंत्र्य-काळांत ज्या वेळीं सारे स्वतंत्र देश गुलाम भारताकडे तुच्छतेनें पाहात होते, अशा वेळीं खंडप्राय चीन देशाशीं मैत्रीचे संबंध जोडण्यांत गुरुदेव ठाकुरांनीं यश मिळविलें होतें. त्या यशाचें प्रतीक म्हणून ह्या चीना-भवनाकडे पाहिलें पाहिजे. मुख्य प्रवेशद्वारांतून आंत शिरतांच समोरच्या बाजूस सबंध भिंतीवर श्री. नंदबाबूंनीं काढलेलें बुद्ध-मार-संग्रामाचें चित्र अत्यंत प्रेक्षणीय आहे. माडीवर चिनी आणि तिबेटी पुस्तकांचा व हस्तलिखितांचा फार मोठा संग्रह आहे. चीन-जपान युद्धाच्या वेळीं चीनमधील अत्यंत महत्त्वाचीं अशीं प्राचीन हस्तलिखितें सुरक्षिततेसाठीं येथें आणून ठेवलेलीं आहेत. त्या वेळीं चॅंग–कै शेक ह्याचें चीनवर राज्य होतें. त्यांनीं ह्या ‘चीना-भवनाला’ बरीच मोठी देणगी दिलेली होती. अनेक वर्षांपासून चिनी संस्कृतीच्या अध्ययनाचें एक केंद्र ह्या दृष्टीनें ह्या भवनाला फार महत्त्व आहे. सध्या सुप्रसिद्ध चिनी प्राध्यापक तान

युन शान तेथील प्रमुख असून, त्यांनींच आम्हांला सर्व संग्रह दाखविला आणि मोठ्या आस्थेनें माहिती सांगितली. हजारों वर्षांपूर्वी कांहीं संस्कृत ग्रंथ भारतांतून तिबेट व चीन ह्या देशांत गेले. तेथें त्यांचीं तिबेटी व चिनी भाषांत भाषांतरें झालीं, परंतु ते संस्कृत ग्रंथ मात्र जगांतून लोप पावले. आतां त्या तिबेटी व चिनी भाषांतरांवरून त्यांचें पुन: संस्कृतमध्यें भाषांतर करण्याचें प्रचंड काम प्रा. तान युन शान ह्यांनीं अंगावर घेतलें आहे. प्रा. शान राष्ट्रवादी असले तरी नव्या कम्युनिस्ट चीनशीं अथवा तेथील लोकांशीं त्यांचे संबंध चांगले आहेत. मध्यंतरीं जें लाल चीनचें शिष्टमंडळ भारतांत आलें होतें त्याच्याशीं ते फार आत्मीयतेनें वागले असें श्री. लाला ह्यांच्याकडून समजलें.

## ‘उत्तरायणा’ चें रम्य वातावरण

‘चीना-भवनांतून’ निघाल्यानंतर आम्हीं जुनें अतिथिगृह पाहिलें. ह्याची जागा मोठी रम्य आहे. आजूबाजूस बरींच झाडें आहेत. हें शांतिनिकेतनच्या मध्यभागीं असल्यामुळें अभ्यागतांच्या दृष्टीनें फार सोयीचें होतें. तें बंद करून लांब माळावर नवें अतिथिगृह कां बांधलें असावें तें समजलें नाहीं. येथून जवळच दोन मोठे सप्तपर्णांचे वृक्ष असून, त्यांच्याभोवतीं पार बांधलेला आहे. ह्या वृक्षाचें बंगाली नांव ‘छतिम’ वृक्ष असें आहे. ह्या झाडाखालीं गुरुदेवांचे पिता महर्षि देवेंद्रनाथ ठाकुर ह्यांना मन:शांति लाभली व त्यांनीं आपला आश्रम येथें बांधला, म्हणून गुरुदेवांनीं ही जागा शांतिनिकेतनासाठीं पसंत केली असें म्हणतात. तेथून आम्ही ‘उत्तरायण’ ह्या ठिकाणीं आलों. ‘उत्तरायणा’च्या आवारांत ‘उदयन’ नांवाचा टुमदार बंगला आहे. ह्या बंगल्यांत गुरुदेव रवींद्रनाथ ठाकुर रहात असत. ह्याचें तोंड पूर्वेस आहे, म्हणून त्याला ‘उदयन’ नांव दिलें आहे. आम्ही गेलों तेव्हां तेथें रवींद्रनाथांचे चिरंजीव रथींद्रनाथ ठाकुर रहात होते. ते त्या वेळीं शांतिनिकेतनचे मुख्य संचालक होते. बंगल्याच्या डाव्या बाजूच्या खोलींत रवींद्रबाबूंच्या वापरांतील वस्तु ठेवण्यांत आल्या आहेत. त्या खोलीची दुरुस्ती चालली असल्यामुळें ती फक्त सकाळींच उघडी असे, म्हणून आम्हांला ती पाहातां आली नाहीं.

उत्तरेच्या बाजूस मातीची एक सुंदर झोपडी असून तिचें नांव 'श्यामली' असें आहे. ह्या झोपडींत पूर्वी गांधीजी राहात असत. सध्या तेथें रवींद्रबाबूंच्या भगिनी राहातात. पश्चिमेच्या बाजूस 'प्रदीचि' नांवाचा बंगला आहे. 'उदयन' तयार होण्यापूर्वी रवींद्रबाबू ह्या 'प्रदीचि' मध्यें राहात असत. सध्या तेथें रवींद्रबाबूंचे जांवई श्री. गिरिधारी लाला राहातात. ह्यामुळें आम्हांला ही बंगली आंत जाऊन पाहातां आली.

ह्या सर्व आवारालाच 'उत्तरायण' असें नांव आहे. येथें आल्याबरोबर मनाला एक प्रकारचें समाधान व शांतता लाभली. दिवसभराची रखरख व त्रास क्षणांत नाहींसा झाला आणि आपण जणू प्रत्यक्ष रवींद्रबाबूंच्या सान्निध्यांतच आलों आहोंत असा भास होऊं लागला. थोड्याच वेळांत अंधार झाला आणि अष्टमी-नवमीचें शांत-स्निग्ध चांदणें हळूहळू सारें आसमंत व्यापूं लागलें. दिवसभराच्या धावपळीनें थकले-भागलेले आम्ही सर्वजण 'प्रदीचि' बंगल्याच्या अंगणांतील रेतीवर बसलों आणि रवींद्रबाबूंना अत्यंत प्रिय असलेल्या कार्यांत – गायनांत – दंग होऊन गेलों.

## रवीन्द्रांच्या काव्यानें मन भारतें

जयंतीप्रसाद भट्टाचार्यानें कांहीं आसामी व बंगाली लोकगीतें फार सुंदर म्हटलीं. परंतु तेवढ्यानें माझें समाधान झालें नाहीं. मी त्याला म्हणालों, "शांतिनिकेतनला येऊन रवींद्रबाबूंचें गीत न ऐकणें म्हणजे मदुरेला जाऊन मीनाक्षीचें मंदिर न पाहाण्यासारखेंच होईल. तेव्हां तुम्हीं रवींद्रबाबूंच्या कांहीं कविता म्हटल्याच पाहिजेत." माझ्या विनंतीला मान देऊन त्यानें 'वसंत जागृत द्वारे', 'तोमार प्रेमे धन्य करे जारे' आणि इतर अनेक कविता व गीतें म्हणून दाखविलीं. आमची ती बैठक जवळजवळ दोन-अडीच तास चालली होती. अष्टमीच्या त्या प्रशान्त चांदण्यांत वेळ कसा निघून गेला हें आम्हांला कळलेंच नाहीं आणि जर रात्रीं परत जाण्याची घाई आम्हांला नसती तर आम्हीही कालिदासाप्रमाणें 'रात्रिरेवव्यरंसीत्' असें म्हणू शकलों असतों. सारें वातावरण संगीतानें इतकें धुंद झालें होतें.

अखेर एकदाचे आम्ही अतिथिगृहांत पोंचलों. जेवणें झालीं आणि रात्रीं दहा-साडेदहाच्या सुमारास आम्ही स्टेशनवर परतलों. अतिथिगृहाच्या व्यवस्थापकाला मी म्हणालों, " ह्या खेपेला फार घाई झाली. पुन्हा केव्हांतरी सवडीनें येण्याची इच्छा आहे. त्या वेळीं तुम्हांला आधीं कळवून मगच येऊं." माझें बोलणें ऐकून त्याला आनंद झाल्यासारखें दिसलें. परंतु माझें मन मला म्हणत होतें, ' तूं कशाला येणार इथें? पुन्हा येण्यासारखं इथें काय आहे? गुरुदेव गेले आणि त्यांच्याबरोबर शांतिनिकेतनची शान गेली, आकर्षण गेलं. आतां फक्त एक ऐतिहासिक स्थळ म्हणून ह्याचं महत्त्व उरलं आहे. मध्यवर्ती सरकारनें ह्याची आर्थिक जबाबदारी उचलल्यापासून तर एक सरकारी विद्यापीठ ह्याशिवाय ह्याला कांहींच वैशिष्ट्य उरलेलं नाहीं. त्यापेक्षां रवींद्रबाबूंच्या त्या स्वप्नाची जी मूर्ति त्यांच्या साहित्याच्या रूपानें तुझ्या हृदयांत साकार झाली असेल, ती टिकून राहावी असाच प्रयत्न कर म्हणजे झालं. ' §

दा. क.

## पक्ष्यांची किलबिल ऐकली नाहीं

आम्ही बोलपूर स्टेशनवर आलों तेव्हां आम्हांला कळलें, कीं कलकत्त्याला जाणाऱ्या गाडीला खूपच उशीर आहे. तें ऐकून मला चुटपुट लागली. कारण आचार्य दादा धर्माधिकारी ह्यांनीं आम्हांला सांगितलें होतें, कीं ' शांतिनिकेतनची पहाट तुम्हीं

§ रवींद्रनाथांच्या हाताखालीं शिकलेले शांतिनिकेतनचे एक जुने विद्यार्थी व शिक्षक श्री. ह्ल्हत्कुमार मुखर्जी शांतिनिकेतनहून मला लिहिलेल्या एका पत्रांत म्हणतात :

"Though Santiniketan is my old place, yet I feel out of sorts. Everything is so changed that it will take sometime for me to feel at home in the new atmosphere of a ' Govt. University.' The humble Ashram of our childhood is lost in the lybarints of massive buildings and tumult of hundred and one activities of a small town which has grown around it. My wife and I cannot really accommodate ourselves in the new surroundings and atmosphere." ह्यावरून जुनें शांतिनिकेतन आणि सध्याचें शांतिनिकेतन ह्यांतील फरक चटकन् ध्यानांत येऊं शकेल.

— लेखक

अवश्य पाहिली पाहिजे. पहाटेच्या वेळीं पक्ष्यांची जी मधुर किलबिल तिथें चालते ती ऐकली नाहीं, तर त्या स्थानाचं वैशिष्टयच समजणार नाहीं. इतकें शेकडों हजारों पक्षी ह्या वेळीं अचानकपणें कुठून येतात आणि दिवसा कुठें निघून जातात हें एक आश्चर्यच आहे.' यंत्रयुगांत सापडल्यामुळें आम्हांला ही किलबिल ऐकतां आली नाहीं ह्याचें दुःख होतच होतें, पण त्यांतही गाडी उशीरा आल्यामुळें विनाकारण अंधारांत पेंगत बसावें लागलें, ह्याची चुटपुट विशेष होती !

# जगन्नाथपुरी

## हिंदूंचें महत्त्वाचें तीर्थक्षेत्र

उत्तरेस काशी, दक्षिणेस रामेश्वर, पश्चिमेस द्वारका आणि पूर्वेस जगन्नाथपुरी हीं हिंदूंचीं महत्त्वाचीं तीर्थक्षेत्रें आहेत. ह्यांपैकीं जगन्नाथपुरीस नुक्ताच जाण्याचा योग आला व तेथें आठ-दहा दिवस राहातां आलें. पूर्वी एकदा मी पुरीला गेलों होतों ; परंतु त्या वेळीं निवान्तपणें तेथील गोष्टी पाहातां आल्या नाहींत. ह्या खेपेस मात्र मनमुराद पाहून-हिंडून घेतां आलें.

## मंदिराबाहेर प्रसादाचा बाजार

मराठी भाषेंत जगन्नाथाशीं संबंध असलेल्या कांहीं म्हणी आहेत. लहानपणीं एखादी खाण्याची वस्तु स्वतः घेण्याची परवानगी आईनें दिली कीं मागचापुढचा विचार न करतां मी भरपूर घेत असें. त्या वेळीं आई म्हणे, 'आपला हात अन् जगन्नाथ !' त्या वेळीं ह्या म्हणीचा अर्थ कळला, तरी रहस्य उमगलें नव्हतें. त्याला जोडूनच आणखी एक म्हण समजली, 'जगन्नाथका भात, जगत पसारे हात' आणि पहिल्या म्हणीचें रहस्य उमगलें. जगन्नाथाच्या देवळांतील प्रसादाचीं – भाताचीं – शेकडों मडकीं

पाहिलीं, कीं ह्या म्हणीचा अर्थ चटकन् ध्यानांत येतो. येथील देवाला दिवसांतून चार वेळां भात, आमटी, भाजी, वगैरे पदार्थांचा नैवेद्य दाखविण्यांत येतो. हा नैवेद्य लहानमोठ्या मातीच्या मडक्यांत शिजविला जातो. तीं मडकीं तशींच देवासमोर ठेवलीं जातात आणि तेथून सरळ बाहेरच्या बाजूस असलेल्या 'प्रसादाच्या बाजारांत' येतात. तेथें लहानमोठ्या आकाराप्रमाणें २-३ आण्यांस भाताचें, वरणाचें मडकें मिळतें. एखादें मडकें घेतलें, कीं पोटभर जेवण होतें. जगन्नाथाच्या परिसरांत शिजविलेल्या ह्या अन्नाचा विटाळ मानण्यांत येत नाहीं. अगदीं सोवळा सनातनी ब्राह्मणसुद्धा हा भात भक्तिभावनेनें खातो. दररोज ७२३ रुपयांहून अधिक किंमतीचें अन्न ह्या देवळांत शिजतें. ह्यावरून त्याच्या प्रचंडपणाची कल्पना येईल. ह्यापैकीं बहुतेक अन्न त्या त्या वेळीं खपून जातें, परंतु जें अन्न उरतें तें ( विशेषतः भात ) वाळवून प्रसाद म्हणून विकलें जातें.

## दोनशें फुटांहून अधिक उंच शिखर

जगन्नाथाच्या रथाची यात्रा ( रथयात्रा ) ही भारतांतील फार मोठी असून तिच्यांत लाखो यात्रेकरू भाग घेतात.

ह्या सर्व लवाजम्याला शोभेल असेंच जगन्नाथाचें मंदिर आहे. दक्षिणेकडील मीनाक्षीचें व इतर दोन-तीन मंदिरें सोडलीं तर इतकें अवाढव्य मंदिर दुसरें क्वचितच असेल. ह्या मंदिराची रस्त्यापासून शिखरापर्यंतची उंची २१४ फूट ८ इंच आहे. ह्यावरून त्याच्या प्रचंडपणाची कल्पना येईल. मंदिराच्या आवारांत गणेश, पतितपावन, हनुमान, विश्वेश्वर, नृसिंह, इंद्र, पातालेश्वर, वगैरे देवांचीं देवळें आणि मूर्ति आहेत. मुख्य मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरही कांहीं मूर्ति असून तेथें जाण्यास जिना आहे. ह्या छोट्या मंदिरांच्या गर्दीमुळें मुख्य मंदिराची भव्यता ध्यानांत येत नाहीं. परंतु तरीही त्याचें आवार व अंगण चांगलें प्रशस्त आहे.

मंदिरामध्यें काळाकुट्ट अंधार असून दिवसा तेथें दिवे असूनही ते लावीत नाहींत. ह्यामुळें नवख्या माणसाला कांहींच कळत नाहीं. रात्रीच्या वेळीं मात्र विजेचे दिवे

लावलेले असतात. परंतु त्यांचा प्रकाशही यथातथाच असल्यामुळें ठेचकळल्या-शिवाय चार पावलेंही चालतां येत नाहीं. कारण आंतील सारी जमीन सपाट नसून अनेक ठिकाणीं लहानलहान पायऱ्या आहेत. ह्या प्रकारानें नवीन माणूस बिचकतो आणि तेथें उभ्या असलेल्या पुजाऱ्याला शरण जातो. हे पुजारी प्रथम तुमच्याकडे पैसे मागत नाहींत. फक्त देवाला ' भोग चढवा ' म्हणजे ' नैवेद्य दाखवा ' एवढाच आग्रह करतात. हा नैवद्य सामान्यतः मेवामिठाईचा असून दहा आणे, सव्वा रुपया, अडीच रुपये, पांच रुपये, वगैरे किंमतीचा असतो. भाविक दर्शनार्थी सहजच हें म्हणणें मान्य करतात आणि मग नंतर त्यांना ह्या पंड्यालाही दक्षणा देणें भाग पडतें.

## असभ्य पुजाऱ्यांचा उपद्रव

चार वेळांच्या नैवेद्यांमुळें बराच वेळ देव पुजाऱ्यांच्या ताब्यांत असतो. तेथपर्यंत त्या वेळीं जावयाचें म्हणजे पुजाऱ्यांना लांच द्यावी लागते. आम्ही गेलों त्या वेळीं नैवेद्याचा कार्यक्रम चालू होता आणि जास्त वेळ थांबण्याची सवड आम्हांला नव्हती, म्हणून आम्हीं पंड्याला लांच देण्याचें ठरविलें. इतक्यांत नैवेद्याचा कार्यक्रम संपला आणि इतर लोकांच्या लोंढ्याबरोबर आम्ही देवाजवळ जाऊन पोंचलों. अर्थात् रस्त्यांतील पायऱ्या चुकवीत पंड्यानें आम्हांला नेलें, ह्यामुळें त्याला दिलेली लांच अगदींच फुकट गेली असें आम्हांला वाटलें नाहीं. परंतु दर्शनाच्या वेळा माहीत असत्या आणि आम्हीं थोडा वेळ दम धरला असता तर लांच देण्याचें पाप आमच्या हातून घडलें नसतें. येथील पुजारी अत्यंत उर्मट व असभ्य असल्याचा अनुभव गेल्या खेपेसही आला होता आणि ह्या खेपेसही आला. दर्शनेच्छूंकडून भरपूर पैसा मिळाला नाहीं तर ते मारामारी करण्यासही तयार होतात.

## श्रीकृष्ण, बलराम व सुभद्रा मूर्ति

वस्तुतः जगन्नाथ म्हणजे विष्णु. ह्यामुळें येथें विष्णूची मूर्ति असेल अशी कल्पना होते. परंतु येथें मात्र श्रीकृष्ण, सुभद्रा आणि बलराम ह्या तीन भावंडांच्या मूर्ति

आहेत. सुभद्रेची मूर्ति लहान असून ती मध्यभागीं आहे आणि तिच्या डाव्या हातास श्रीकृष्ण व उजव्या हातास बलराम आहे. ह्यांना मूर्ति म्हणावयाचें इतकेंच, परंतु खरोखरी ते नुसते लाकडाचे ओंडकेच आहेत. दोन डोळे बसविल्यामुळें त्यांना चेहेऱ्याचें कांहींसें स्वरूप आलेलें आहे. त्यांचे हात म्हणजे दोन दोन आडवीं दांडकीं आहेत. रोजच्या स्नानामुळें ह्या मूर्ति खराब होतात म्हणून दर बारा वर्षांनीं नव्या मूर्ति बनवून त्यांची प्रस्थापना करण्यांत येते. ह्या मूर्ति तयार करण्याचें काम एकच सुतार घराणें शेकडों वर्षांपूर्वींपासून करीत आलेलें आहे असें म्हणतात. ह्या मूर्तींवर खूप मौल्यवान दागिने घालण्यांत येतात. त्यांच्या माथ्यावर अत्यंत तेजस्वी रत्नाचे खडे बसविण्यांत आलेले आहेत, ते पाहाण्यासारखे आहेत.

## मूर्ति इतक्या ओबडधोबड कां ?

इतक्या प्रचंड नि भव्य देवळांतील मूर्ति इतक्या ओबडधोबड किंबहुना विद्रूप कां, ह्याचें उत्तर ह्या मूर्तींच्या उत्पत्तीसंबंधींच्या दंतकथेंत सापडतें. ही दंतकथा स्कंदपुराणाच्या उत्कल खंडांत आलेली आहे. नारदपुराण आणि कूर्मपुराण ह्यांतही हिचा उल्लेख आढळतो. नैमिषारण्यांत एकत्र जमलेल्या देव-देवतांना ह्या क्षेत्राचें ( पुरीला जुन्या पुराणांत पुरुषोत्तमक्षेत्र, श्रीक्षेत्र, नीलाचल, वगैरे नांवें दिलेलीं आढळतात ) महत्त्व व पावित्र्य वर्णन करून सांगण्यासाठीं श्रीविष्णु भगवान ही कथा सांगतात :

अत्यंत पुरातन काळीं पुरी हें एक अरण्य होतें आणि ह्या अरण्याच्या मध्यभागीं नीलाचल नांवाची एक टेकडी होती. तिच्या शिखरावर एक कल्पवृक्ष होता, त्याच्या पश्चिमेस रोहिणी नांवाचा पवित्र झरा होता. त्याच्या कांठींच इंद्रनील रत्नाची अप्रतिम अशी विष्णूची सुंदर मूर्ति होती. ह्या मूर्तीचें नांव नीलमाधव. माळव्याचा सूर्यवंशी राजा इंद्रद्युम्न ह्याला ह्या मूर्तीची माहिती कळतांच त्यानें अवन्तीहून म्हणजे आपल्या राजधानींतून नीलमाधवाच्या शोधासाठीं सर्व दिशांना ब्राह्मण धाडले. पूर्वेला गेलेल्या विद्यापति नांवाच्या ब्राह्मणाखेरीज इतर सर्वजण हात हलवीत परत गेले. विद्यापति मात्र सतत तीन महिने प्रवास करीत करीत

सवरा ( शबर ) नांवाच्या आदिवासी जमातीच्या देशांत जाऊन पोंचला. तेथें तो विश्वावसु नांवाच्या एका सवराच्या घरीं राहिला व त्यानें त्याच्या मुलीचें प्रेम संपादन केलें. हा विश्वावसु फांसेपारधी होता. तो दररोज नियमानें फुलें, फळें, वगैरे पूजासाहित्य घेऊन गुप्तपणें अरण्यांत जात असे. एके दिवशीं त्याच्या मुलीनें त्याच्याजवळ हट्ट धरून विद्यापतीला बरोबर नेण्यास त्यास भाग पाडलें. आपलें पूजास्थान कोणींही पाहूं नये अशी विश्वावसूची इच्छा होती. परंतु मुलीच्या हट्टापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. तरीपण सावधगिरीचा उपाय म्हणून त्यानें विद्यापतीचे डोळे बांधून त्याला बरोबर नेलें. अर्थात विद्यापति किती झालें तरी आर्य ! तो त्या अनार्याला थोडीच दाद देणार ? त्यानें आपल्या वस्त्रामध्यें थोडें मोहरीचें बीं लपवून घेतलें आणि तें रस्त्याच्या कडेला थोडें थोडें टाकीत तो गुप्तस्थळापर्यंत गेला. तेथें गेल्यावर विश्वावसूनें त्याच्या डोळ्यांवरील पट्टी सोडली. कल्पद्रुमाखालील नीलमण्याची भगवान नीलमाधवाची मूर्ति त्याला दिसली. त्याच वेळीं तेथें एक चमत्कार घडला. कल्पद्रुमावरून एक कावळा मरून खालीं पडला आणि सरळ वैकुंठाला गेला. आपणही ह्या झाडावरून खालीं पडून स्वर्गास जावें ह्या हेतूनें विद्यापति झाडावर चढूं लागला. इतक्यांत अशी आकाशवाणी झाली, कीं ‘ हे ब्राह्मणा ! थांब. हें कृत्य करण्यापूर्वीं तूं आधीं आपल्या राजाकडे जा आणि जगाचा नाथ – जगन्नाथ – तुला गवसला आहे ही गोष्ट त्याच्या कानांवर घाल.’

## फुलांफळांना देव कंटाळला

त्यानंतर विश्वावसूनें फुलें व फळें देवापुढें ठेविलीं. परंतु नीलमाधवानें रोजच्याप्रमाणें त्यांचा स्वीकार केला नाहीं. त्याला फक्त पुढील शब्द ऐकूं आले : “ हे माझ्या एकनिष्ठ सेवका, मी तुझ्या जंगली फुलांफळांना अगदीं कंटाळून गेलों आहें. आतां मला शिजवलेला भात आणि मेवामिठाई खाण्याची इच्छा झाली आहे. ह्यापुढें मी तुला तुझ्या नीलमाधवाच्या रूपांत कधीं दिसणार नाहीं. ह्यानंतर जग मला ‘ जगन्नाथ ’ नांवानें ओळखील.”

ह्या गोष्टीला विद्यापतिच कारणीभूत झाला ह्या कल्पनेनें विश्वावसूनें विद्यापतीला अनेक दिवस कैदेंत डांबून ठेवलें. परंतु मुलीच्या अश्रूंपुढें हार खाऊन त्यानें अखेर त्याला सोडून दिलें.

विद्यापतीनें अवन्तीला जाऊन राजा: इंद्रद्युम्नाला सारी हकीकत सांगितली. ती ऐकून राजाला आनंद झाला आणि तो लाकूडतोड्यांची एक भली मोठी फौज बरोबर घेऊन भगवान नीलमाधवाच्या शोधार्थ निघाला. त्याचा तो अहंकार पाहून परमेश्वराला त्याचा राग आला आणि अशी आकाशवाणी झाली, कीं 'हे राजा, तूं माझं मंदिर अवश्य बांधशील, पण माझं दर्शन मात्र तुला घडणार नाहीं.' आणि खरोखरीच ती नीलमूर्ति अदृश्य झाली.

## हजार अश्वमेध केल्यावर दर्शन

राजाला भयंकर पश्चात्ताप झाला आणि त्यानें देवाला प्रसन्न करून घेण्यासाठीं मोठें प्रायश्चित्त घेतलें. तेव्हां त्याला अशी आकाशवाणी ऐकूं आली, कीं 'हे राजा, तूं एक हजार अश्वमेध यज्ञ करशील तर मी तुला दर्शन देईन. मात्र तें नीलमाधवाच्या रूपानें असणार नाहीं; तर कांहीं विचित्रित खुणा असलेल्या लाकडाच्या रूपानें असेल.' ईश्वराच्या इच्छेप्रमाणें राजानें एक हजार अश्वमेध यज्ञ केले. तेव्हां समुद्रांतून लाकडाचा एक मोठा ओंडका वाहात किनाऱ्याला लागला. त्याच्यावर विशिष्ट खुणा होत्या. म्हणून तो बाहेर काढून ज्या ठिकाणीं अश्वमेध यज्ञ करण्यांत आले होते, तेथें त्याची प्रस्थापना करण्यांत आली. हल्लीं जेथें जगन्नाथाचें देऊळ आहे, तेथेंच अश्वमेध यज्ञ करण्यांत आले होते असें म्हणतात.

## देवानेंच देवाची मूर्ति घडविली

ह्यानंतर राजानें देशांतील सर्व सुतारांना बोलावून त्या लाकडापासून जगन्नाथाची मूर्ति तयार करण्याची त्यांना आज्ञा केली. परंतु सुतारांच्या पटाशीचा स्पर्श त्या लाकडाला होतांच पटाशीचे तुकडे तुकडे होऊन जात. अखेर देवाला राजाची करुणा येऊन तो अनंत महाराणा नांवाच्या वृद्ध सुताराच्या रूपानें

राजाकडे गेला आणि म्हणाला, "मी तुला एक्वीस दिवसांत जगन्नाथाची मूर्ति तयार करून देतों. मात्र एक्वीस दिवस पूर्ण होईपर्यंत कोणींही माझ्या कामाच्या खोलींत डोक्वायचं नाहीं."

राजानें त्याची अट मान्य केली आणि त्याला एका खोलींत कोंडून ठेवलें. कांहीं दिवस निघून गेले, पण खोलींतून कसलाच आवाज येईना म्हणून राजा अधीर झाला आणि एक्वीस दिवसांची मुदत पूर्ण होण्याच्या आधींच त्यानें त्या खोलीचें दार उघडलें. पण आंत जाऊन पाहातो तों काय, सुतार नाहीं नि कांहीं नाहीं. मात्र त्या ठिकाणीं तीन मूर्ति अर्धवट तयार झालेल्या स्थितींत पडलेल्या होत्या. राजा इंद्रद्युम्नास मोठा पश्चात्ताप झाला आणि अनंत महाराणाच्या रूपानें आलेल्या त्या ब्रह्मदेवाची त्यानें कित्येक वर्षेपर्यंत वाट पाहिली. परंतु तो पुन्हा दिसला नाहीं. ह्या अवधींत दुसऱ्या एका राजानें इंद्रद्युम्नाला पदच्युत करून त्याचें राज्य बळकाविलें. त्यानें त्या अपूर्ण मूर्तींची रथांतून मिरवणूक काढली आणि अभिषेकपूर्वक त्यांची प्राणप्रतिष्ठा केली.

ह्या कथेवरून फारसा महत्त्वाचा ऐतिहासिक निष्कर्ष काढतां येत नाहीं. फक्त एवढीच गोष्ट कळते, कीं जेथें सध्या जगन्नाथाचें मंदिर आहे, तो भाग एके काळीं उत्तर भारतांतील ब्राह्मणांच्या प्रभावापासून दूर, आदिवासी लोकांचें निवासस्थान होता. देवांच्या विद्रूप मूर्तींवरून असाही अंदाज होऊं शकतो, कीं हीं मूलतः आदिवासींचीं दैवतें असावींत. कदाचित् त्या मूळच्या अनार्य लोकांच्या स्वपक्षनिदर्शक अथवा स्वजातिनिदर्शक पशुपक्ष्यादिकांच्या आकृतिही असण्याची शक्यता आहे.

सुमारें एक हजार वर्षेपर्यंत उत्कलवर बौद्ध धर्माचा पगडा होता आणि जैन धर्माचाही येथें बराच प्रसार झालेला होता. ह्यामुळें सोवळ्याओवळ्याच्या ब्राह्मणी संस्कृतीचें वर्चस्व ह्या देवळांत आढळत नाहीं. यात्रेच्या वेळीं पूर्वीपासूनच येथें अस्पृश्यांना मंदिरप्रवेश होता ही गोष्टही उल्लेखनीय आहे. हल्लीं तर सर्वच हिंदूंना ह्या देवळांत प्रवेश मिळतो.

## मंदिरावर मुसलमानांचे हल्ले

स्कंद पुराणांतील कहाणीला ऐतिहासिक आधार मात्र कांहीं नाहीं. ऐतिहासिक वस्तुस्थिति अशी आहे, कीं उत्कलचा सम्राट अनंगभीमदेव (इ. स. ११८९–१२२३) ह्यानें हें मंदिर इ. स. ११९८ सालीं बांधून पुरें केलें. अर्थात् आजचें सारें मंदिर त्या वेळींच बांधलें गेलें असें नव्हे, तर पुरुषोत्तमदेव (इ. स. १४६५–१४९५) व प्रतापरुद्रदेव (१४९५–१५३२) ह्यांच्या कारकीर्दींतही मंदिराचें पुष्कळसें बांधकाम झालेलें आहे. ह्या अवधींत बंगालचा सुभेदार हुसेन शाह ह्यानें १५०९ सालीं ह्या मंदिरावर हल्ला केला होता. त्यानंतर कालापहाड ह्या कुप्रसिद्ध बाटग्या मुसलमानानें १५६८ सालीं ओरिसांत नंगा नाच घातला, त्या वेळींही ह्या मंदिराला खूप तडाखे सहन करावे लागले. त्यानंतरही १७४२ पर्यंत अनेक हल्ले ह्या मंदिरावर झाले. पुढें १७५३ सालीं मराठ्यांनीं ओरिसावर ताबा मिळविल्यापासून मात्र ह्या मंदिरावरील हल्ले थांबले, इतकेंच नव्हे, तर दरसाल सत्तावीस हजार रुपये मराठा सरकारकडून ह्या देवळाला मिळूं लागले आणि अशा प्रकारें ह्या मंदिराची ऊर्जितावस्था सुरू झाली. इंग्रजांच्या आगमनानंतर तर धार्मिक बाबतींत जुलूम-अत्याचारांचा प्रश्नच उरला नाहीं.

## अश्लील चित्रांचें स्पष्टीकरण

पुरीचें जगन्नाथ मंदिर उत्तर किंवा पूर्व भारतांतील एक प्रचंड व भव्य मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचा रथही तसाच अवाढव्य असतो आणि त्यावरून 'जगन्नाथाचा रथ' म्हणजे प्रचंड कार्य असा अर्थ आपल्याकडे रूढ झालेला आहे. ह्या भव्यतेइतकीच दुसरी एक गोष्ट प्रसिद्ध (किंवा कुप्रसिद्ध म्हणा हवें तर!) आहे. ती म्हणजे येथील अश्लील चित्रें. अर्थात् ही गोष्ट मुख्यतः सुशिक्षित लोकांनाच महत्त्वाची वाटते. अंधश्रद्धेनें देवदर्शनास जाणाऱ्या लोकांना अनेकदा तिची गंधवार्ताही नसते.

सर्वसामान्य सुसंस्कृत व्यक्तीला किळसवाणीं वाटतील अशीं चित्रें ह्या मंदिरावर कां असावींत? मंदिराला दृष्ट लागूं नये, त्यावर वीज पडूं नये ह्यासाठीं अशीं चित्रें

किंवा मूर्ति कोरण्यांत व बसविण्यांत आल्या असाव्यात असें कांहीं विद्वानांचें मत आहे, तर एखादी व्यक्ति देवदर्शनासाठीं देवळांत जाण्यास योग्य आहे कीं नाहीं, मनानें पवित्र आहे कीं नाहीं, हें पाहाण्यासाठीं हीं चित्रें आहेत असें कांहींजण समजतात. ह्या प्रकारच्या शृंगारिक चित्रांनीं ज्याचें मन विचलित होणार नाहीं, त्यानेंच आंत जावें, अशा प्रकारचा एक संकेतही ह्या चित्रांमागें होता असें कांहीं लोकांचें मत आहे. तर श्री. पर्सी ब्राऊन नांवाचा इंग्रज विद्वान् असें म्हणतो, कीं ज्या काळीं हीं चित्रें कोरलीं गेलीं, त्या काळीं हिंदु समाज नैतिक दृष्ट्या अगदीं रसातळाला जाऊन पोंचला होता. परंतु ओरिसाचा इतिहास पाहातां श्री. ब्राऊन ह्यांचें म्हणणें ग्राह्य वाटत नाहीं. कारण ज्या वेळीं हें मंदिर बांधलें गेलें त्याच्या आधीं आणि नंतर ओरिसा वैभवाच्या शिखरावर जाऊन पोंचलेला होता. त्या काळच्या उत्कलीय राजांनीं बलाढ्य मुस्लिम शासकांनाही धूळ चारली होती. अशा स्थितींत हिंदु समाज रसातळाला गेलेला होता असें म्हणणें चूक आहे. आमच्याबरोबर कोणार्कला आलेले ओरिसाच्या सरकारी म्युझियमचे क्यूरेटर श्री. बिपिन बिहारी नाथ ह्यांना ह्या बाबतींत मीं विचारलें असतां ते म्हणाले, "हीं चित्रें अश्लील आहेत हें म्हणणें चूक आहे. तुमच्या आमच्या जीवनाशीं त्यांचा घनिष्ट संबंध आहे. ईश्वर जर संपूर्ण आहे, तर जीवनांतील हा भागच त्याला अप्रिय अथवा त्याज्य आहे, असें कसें म्हणतां येईल? तरीपण माझ्या मतें तरुण स्त्रीपुरुषांना देवळाकडे आकर्षित करण्यासाठीं हीं चित्रें देवळावर कोरलेलीं असावींत. कोणार्कला खालच्या पट्टींत लहान मुलांना आकर्षून घेतील अशीं हत्ती-सिंहांचीं, जनावरांचीं चित्रें आहेत. त्यावरील भागांत नवविवाहित दंपतींना व तरुण-तरुणींना गोडी वाटेल अशीं शृंगारचित्रें आणि त्यावर देवादिकांचीं चित्रें. मानवी जीवन ज्या क्रमानें वाहात असतें, त्याचेंच जणू प्रतीक येथें आढळतें. ह्या निमित्तानें मंदिरांत प्रवेश करणाऱ्या युवक-युवतींवर ईश्वरभक्तीचे कांहीं संस्कार झाल्याशिवाय राहात असतील काय?"

## चित्रावर आवरण घालण्याची सूचना

आचार्य विनोबा भावे ह्यांनाही ह्या चित्रांचें कोडें उलगडलेलें नाहीं. ते एवढेंच म्हणाले, कीं "संस्कृतांत किंवा आपल्या धार्मिक ग्रंथांत मिथुन म्हणजे जोडपें ही

पवित्र व शुभ वस्तु गणण्यांत आलेली आहे. त्यावरून मैथुनही शुभ समजलें गेलें असावें." पुरीच्या जगन्नाथमंदिरांतील अशा ह्या चित्रांविषयीं पूर्वी महात्माजींनीं अशी सूचना केली होती, कीं तीं तेथून हलवून दुसरीकडे ठेवावींत किंवा त्यांवर आवरण घालावें. परंतु त्यांची ही सूचना अंमलांत आणली गेलेली नाहीं. ह्याचें कारण विचारतां एका गृहस्थांनीं सांगितलें, "एक तर असं, कीं बहुतेक चित्रं भिंतींत कोरलेलीं असल्यामुळें तीं हलवणं शक्य नाहीं आणि दुसरं असं कीं त्यांवर आवरण घातल्यास जे लोक सामान्यतः तिकडे पाहात नाहींत, त्यांचं तिकडे मुद्दाम लक्ष वेधल्यासारखं होईल. तेव्हां आहे ही स्थितिच चालू ठेवणं योग्य होईल." हीं चित्रें पाहिलीं, कीं प्रथम थोडेंसें चमत्कारिक वाटतें, परंतु एकदोन वेळां तीं नजरेसमोरून गेलीं कीं त्यांचें कांहीं वाटेनासें होतें. हीं चित्रें सहजासहजीं दिसण्यासारख्या ठिकाणीं नसून सांदी-कोपऱ्यांतून आहेत. बाहेरून जे लोक केवळ जगन्नाथाच्या दर्शनासाठीं जातात, त्यांना ही गोष्ट माहीत नसल्यास त्यांच्या दृष्टीस हीं चित्रें पडणारही नाहींत. येथील अश्लील चित्रांचेही दोन भाग पडतात. भिंतींत कोरलेलीं चित्रें अत्यंत रेखीव व कलात्मक दृष्ट्या उत्कृष्ट आहेत. परंतु जीं शाडूचीं चित्रें मागून कोपऱ्यांतून बसविलेलीं आहेत तीं अगदींच कलाहीन व किळस उत्पन्न करणारीं आहेत.

परंतु ह्या चित्रांमुळें उत्कलचे तरुण इतर प्रांतांतील तरुणांपेक्षां अधिक बहकलेले आहेत, असा कांहीं अनुभव नाहीं. प्रयोग करून पाहिल्यास कदाचित् उलटाच अनुभव येईल.

## कोपऱ्यांत पडलेला शंकराचार्यांचा मठ

बाहेरच्या लोकांना जगन्नाथाच्या मंदिराइतकीच पुरीला आणखी एक गोष्ट महत्त्वाची वाटते. ती म्हणजे श्रीमत् जगद्गुरु आद्य शंकराचार्य ह्यांनीं स्थापिलेला मठ. भारतवर्षाच्या चार दिशांना चार मठ स्थापून शंकराचार्यांनीं ब्राह्मणी धर्माचा झेंडा सर्वत्र फडकाविला. त्या ऐतिहासिक दृष्टीनें ह्या स्थानाबद्दल एक प्रकारचें कुतूहल मनांत होतेंच. त्याखेरीज आणखी एक आकर्षण होतें. तें म्हणजे त्या

पीठावर त्यावेळीं आरूढ असलेले शंकराचार्य महाराष्ट्रीय होते. नागपूरचे प्रसिद्ध डॉ. खरे ह्यांचे बंधु पुरीचे शंकराचार्य असल्यामुळें जमल्यास त्यांना भेटावें अशी इच्छा बाळगून आम्ही तेथें गेलों. परंतु तेथील एकूण स्थिति पाहून सगळा उत्साह पार मावळला. शंकराचार्यमहाराज बहुधा नागपुरास घरींच असतात, मठामध्यें क्वचितच येतात, असें तेथील गृहस्थांनीं सांगितलें. कोणी बंगाली ब्रह्मचारी तेथें राहातात. ते त्या वेळीं पूजेमध्यें गुंतले असल्यामुळें त्याची भेट होऊं शकली नाहीं. पण तेथील कार्यक्रमाची जी माहिती कळली ती ऐकून एवढेंच लक्षांत आलें कीं त्या संस्थेची किंवा संस्थानाची उपयुक्तता आतां मुळींच उरलेली नाहीं.

मठाची इमारत आणि आवार मात्र फार छान आहे. मठ जगन्नाथाच्या मंदिरापासून दूर एका कोपऱ्यांत असल्यामुळें आणि लोकांची वर्दळ नसल्यामुळें पुरी शहरांत पदोपदीं आढळणारी अस्वच्छता तेथें दिसली नाहीं. सारा मठ जमिनीच्या सपाटीच्या खालीं आहे. ह्यामुळें एखाद्या गुहेंत शिरल्यासारखें वाटतें. येथील शंकराचार्यांची शुभ्र संगमरवरी मूर्ति मात्र छान आहे.

## देवळासमोरचा प्रशस्त रस्ता

उत्तर किंवा पूर्व भारतांत सहसा न आढळणारी एक चांगली गोष्ट पुरीला पाहावयास मिळाली. ती म्हणजे जगन्नाथाच्या मंदिरासमोरील ऐसपैस राजमार्ग. काशी, गया, कलकत्ता येथील विश्वेश्वर, विष्णु व काली ह्यांचीं मंदिरें अगदीं कोंदट जागेंत असून तेथपर्यंत जाऊन पोंचावयाचें म्हणजे जिवावरचा प्रसंग असतो. परंतु पुरीला मात्र ही अडचण नाहीं. ह्याचें कारण बहुधा रथयात्रा हें असावें. रथयात्रेच्या वेळीं लाखों लोक गोळा होतात. त्या वेळीं जर असा राजरस्ता नसेल तर लोक चिरडूनच मरतील. अर्थात् रस्ता मोठा असूनही लोक चिरडून मरतात आणि कांहींजण मुद्दाम रथाखालीं पडून आत्महत्या करतात ( कारण रथाखालीं जीव दिल्यास मोक्ष मिळतो अशी समजूत ! ) ही गोष्ट निराळी !

सबंध ओरिसांत आणि विशेषतः पुरीमध्यें महारोग आणि हत्तीरोग झालेल्या लोकांचें प्रमाण फार मोठें आहे. हत्तीरोग आपणांकडे फारसा आढळत

नाहीं. ह्या रोगामध्यें रोग्याचे पाय हत्तीच्या पायासारखे जाडजूड होतात. महारोगाप्रमाणें तो किळसवाणा नसेल, अशी कांहीं लोकांची कल्पना होते. परंतु प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मात्र महारोगापेक्षां हा रोग तिळमात्रही कमी किळसवाणा नाहीं, ह्याची खात्री पटते. हा रोग येथील पाण्यामुळें होतो. म्हणून पाणी उकळून प्याल्यास त्याची भीति नसते.

## सरळ रेषेंतील सुंदर किनारा

पुरीमध्यें मला सर्वांत अधिक आवडलेली गोष्ट म्हणजे तेथील समुद्र. एका सरळ रेषेंत लांबच्या लांब पसरलेला समुद्रकिनारा मंगळूरजवळील मल्पे बंदराखेरीज अन्यत्र कोठेंही पाहावयास मिळत नाहीं. सकाळीं व संध्याकाळीं ह्या किनाऱ्यावर फिरावयास येणाऱ्या षौकिनांची बरीच गर्दी असते. येथील समुद्र फार उथळ आणि उघडा (असंरक्षित) आहे, ह्यामुळें येथें बंदर नाहीं. येथेंच काय, पण सबंध ओरिसांतच समुद्र असून बंदर नाहीं. मात्र दूर क्षितिजावरून जाणारीं जहाजें येथून कधींकधीं दिसतात. समुद्र उथळ असल्यामुळें स्नानाला फार मजा येते (कारण बुडून मरण्याची भीति नसते). येथें सूर्योदयाच्या वेळीं सूर्य समुद्रांतून स्नान करून वर येतो. आम्हां पश्चिम किनाऱ्यावर राहाणाऱ्या लोकांना हा एक अलभ्य लाभच म्हटला पाहिजे. म्हणून आम्ही दोनदा सूर्योदयाच्या वेळीं समुद्रस्नानास गेलों. परंतु उन्हाळ्याच्या सुरुवातीचे दिवस असूनही क्षितिजाजवळ ढग होते. ह्यामुळें स्पष्ट सूर्यदर्शन झालें नाहीं. अर्थात् क्षितिजापासून किंचित् वर आलेला सूर्यही फार सुंदर दिसतो आणि त्याच्या कोवळ्या किरणांनीं सारा समुद्र सोनेरी बनतो. गेल्या खेपेस आम्हांला सूर्योदय पाहावयास मिळाला होता. त्याची आठवण काढीतच आम्ही थकलेल्या शरीरांनीं व उल्हसित मनांनीं परत फिरलों. समुद्राची आठवण म्हणून सुंदर शंख व शिंपले विकत घेण्यास मात्र आम्ही विसरलों नाहीं.



...ग्रंथ संग्रहालय, ...

# कोणार्कचें सूर्यमंदिर

## कलावंतांचें लक्ष

आपल्या देशांत सूर्याची उपासना अतिप्राचीन काळापासून चालत आलेली असली, तरी सूर्याचें देऊळ असें फारच थोड्या ठिकाणीं पाहावयास मिळतें. ह्यामुळें ओरिसामध्यें कोणार्क येथें असलेलें सूर्यमंदिर पाहातांना नाविन्याचा वेगळाच अनुभव येतो. 'कोण' म्हणजे 'कोपरा' आणि 'अर्क' म्हणजे सूर्य. तेव्हां 'कोणार्क' ह्या शब्दाचा अर्थ झाला सूर्याचा कोपरा. ह्यालाच कोनार्क किंवा कोनारक असेंही म्हणतात. कालांतरानें कोणार्क हें विशेषनाम बनलें आणि पिवळ्या पीतांबराप्रमाणें कोणार्कचें सूर्यमंदिर हा शब्दप्रयोग रूढ झाला. ह्या कोणार्कामुळेंच ओरिसासारख्या मागासलेल्या प्रदेशाकडे अनेक कलावंतांचें लक्ष गेलें आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे ह्याचें महत्त्व कळून येतें.

कोणार्कचें सुप्रसिद्ध मंदिर जगन्नाथपुरीच्या ईशान्येस २१ मैलांवर आहे. परंतु हें अंतर नकाशांतील झालें. मोटारच्या मार्गानें हें अंतर सुमारें पन्नास मैल पडतें. मोटारचा रस्ता अत्यंत वाईट असून मधूनमधून येणाऱ्या नद्यांवरील पुलांवरून अथवा कच्च्या बांधांवरून जातांनाही प्रवाशांना कर द्यावा लागतो.

सूर्यमंदिराच्या सभोवार रेतीचा समुद्र पसरलेला आहे. आज मंदिरापासून समुद्र दीड मैल दूर असला तरी एकेकाळीं हें मंदिर समुद्राच्या कांठीं किंवा समुद्रांतच असावें असें वाटतें. मंदिराच्या परिसरांत प्रवेश करतांच ती प्रचंड, परंतु भग्न इमारत पाहातांच मन आश्चर्य आणि हळहळ ह्यांनीं भरून येतें. वस्तुतः ह्या मंदिराचा मुख्य भाग (विमान) कोसळून पडलेला आहे, परंतु त्याच्या विद्यमान भागावरून असें अनुमान सहज काढतां येतें, कीं ह्या देवळाची उंची २२७ फूट असली पाहिजे.

जगन्नाथपुरीच्या जगन्नाथाचें देऊळ सुमारें २१५ फूट उंच आहे. त्यावरून हें देऊळ किती उंच असेल ह्याची चांगली कल्पना येते. देवळाच्या खालील जोत्याची उंचीच मुळीं १२ फुटांपेक्षां अधिक आहे.

## सांबाला कृष्णाचा मिळालेला शाप

मुख्य वस्तीपासून दूर, समुद्रकिनाऱ्यावर हें इतकें सुंदर व भव्य मंदिर कां उभारण्यांत आलें असावें? ह्याचें कारण ही जागा फार प्राचीन काळापासून पवित्र समजण्यांत येत होती. ह्यासंबंधीं द्वापर युगांतील एक कथा सांब-पुराणामधून कपिलसंहितेंत दिलेली आहे. ती अशी : श्रीकृष्णाचा मुलगा सांब ह्यानें नारदाच्या भरीस पडून गोपींशीं अतिप्रसंग केला. हें कृष्णाला कळतांच त्यानें सांबाला असा शाप दिला, कीं 'तुला महारोग होईल.' त्याप्रमाणें खरोखरीच सांबाला रक्तपिती भरली. तेव्हां तो मैत्रेय वनांत जाऊन सूर्याची उपासना करूं लागला. त्यानें बारा वर्षेपर्यंत सूर्याची उपासना केली तेव्हां त्याचा महारोग नाहींसा होऊन त्याला पूर्ववत् तेजःपुंज शरीर प्राप्त झालें. ही उपासना करीत असतां चंद्रभागा नदींतून वाहात येणारें एक कमळ सांबाला दिसलें. त्या कमळामध्यें सूर्याची एक मूर्ति होती. सांबानें ती मूर्ति घेऊन तिच्यासाठीं एक मंदिर बांधलें. तेंच कोणार्कचें मंदिर. अर्थात् ह्या कथेंत ऐतिहासिक तथ्य कितपत असेल हें सांगणें कठीण आहे. परंतु कोणार्कच्या आसपास जीं लहान लहान देवळें आढळलीं, त्यांवरून आजचें सूर्यमंदिर बांधलें जाण्याच्यापूर्वींही हें स्थान अत्यंत पवित्र समजलें जात असलें पाहिजे, असें दिसतें.

सांबाचा महारोग ह्या ठिकाणीं बरा झाला अशी समजूत असल्यामुळें अनेक महारोगी ह्या स्थानाला भेट देतात आणि कोणीतरी बैरागी अधूनमधून त्यांना त्या रोगावर औषध देत असतो असें म्हणतात. परंतु आम्ही गेलों त्या वेळीं मात्र तेथें कोणी नव्हतें. कदाचित् आम्ही फार लवकर उठून तेथें पोंचलों होतों ह्यामुळें तेथें कोणी नसेल.

## देव नसलेलें देऊळ; सूर्य अदृश्य

इतर सर्वसामान्य देवळांप्रमाणें ह्या सूर्यमंदिरांत पुजारी अथवा पंडे ह्यांचें दर्शन घडत नाहीं आणि बाहेरही भिकारी बसलेले नसतात. ह्याचें कारण ह्या देवळांत देवच नाहीं. येथील मुख्य गर्भागारांतील सूर्याची मूर्ति कोठें गडप झालेली आहे त्याचा पत्ता अजूनही लागलेला नाहीं. मंदिरामध्यें जेथें ही मूर्ति होती तो चबुतरा शाबूत आहे, उत्तम स्थितींत आहे, त्यावरील कलाकुसरही छान आहे, परंतु तेथील मुख्य मूर्ति मात्र अदृश्य झालेली आहे. ह्यामुळें ह्या मंदिराशीं धार्मिकतेचा संबंध नांवाचाच उरलेला आहे.

## रथचक्रांवर आधारलेलें मंदिर

ह्या सूर्यमंदिराचें चटकन् डोळ्यांत भरणारें वैशिष्ट्य म्हणजे त्याला देण्यांत आलेला रथाचा आकार. प्रत्येक बाजूस बारा ह्याप्रमाणें चोवीस रथचक्रांवर हें मंदिर उभारलेलें आहे. ह्यामुळें सूर्याचा रथच जणूं आपण पाहात आहोंत असा भास होतो. सुमारें बारा फूट उंचीचीं हीं रथचक्रें म्हणजे कलेचा अप्रतिम नमुनाच आहे. दुरून पाहिल्यास सबंध चक्र एका दगडांत कोरलेलें असावें असा भास होतो. परंतु जवळ जाऊन पाहातांच लक्षांत येतें, कीं अनेक लहान लहान दगडांनीं मिळून तें बनलेलें आहे. चाकाच्या पट्टीवर आणि आऱ्यांवर सुंदर नक्षीकाम केलेलें आहे. प्रत्येक चाकावरीलच नव्हे, तर प्रत्येक आरीवरील कलाकुसर वेगवेगळी आहे. कांहीं आऱ्यांवर देवादिकांचीं व अवतारांचीं चित्रें आहेत तर कांहींवर स्त्री-पुरुषांचीं जोडपीं चित्रित केलेलीं आहेत, कांहीं आऱ्यांवर नृत्यांगना नृत्य करीत आहेत, तर कांहींवर शिकारीचींही चित्रें आहेत. चित्रकलेचें इतकें वैविध्य फारच क्वचित् पाहावयास सापडतें.

ओरिसाच्या गंग वंशांतील महापराक्रमी सम्राट् नरसिंह (पहिला) (इ. स. १२३८ ते १२६४) ह्यानें बंगालच्या मुस्लिम राज्यावर हल्ले चढवून मुस्लिम सेनापति मलिक इझ्झुद्दीन ह्याचा सपशेल पराभव केला आणि आपलें राज्य बंगालच्या मिदनापूर, हावरा, हुगळी, वगैरे दक्षिण जिल्ह्यांवर प्रस्थापित केलें.

ज्या वेळीं मुसलमान विजेते सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणें सबंध भारतवर्षांत थैमान घालीत होते, त्या वेळीं त्यांच्या हल्ल्याची वाट न पाहातां आपणच त्यांच्यावर आधीं हल्ला चढवून त्यांना बेजार करण्याचा मार्ग सम्राट् नरसिंहानें स्वीकारला आणि त्यांत तो अपेक्षातीत विजयी झाला. आपल्या ह्या विजयाचें कांहींतरी चिरंतन स्मारक आपण मागें ठेवलें पाहिजे असें नरसिंहाला वाटलें. राजा नरसिंह मोठा धर्मनिष्ठ पुरुष होता. ह्यामुळें नुसतेंच कीर्तिमंदिर न बांधतां एखाद्या भव्य मंदिराच्या रूपानें आपली कीर्ति अजरामर करावी असें त्यानें ठरविलें. त्याला सूर्याचेंच मंदिर बांधण्याची कल्पना कां सुचली असावी, हें सांगणें कठीण आहे, परंतु विजयाचें व पराक्रमाचें प्रतीक म्हणून त्यानें सूर्याची जी निवड केली ती अत्यंत योग्यच होती ह्यांत मात्र मुळींच शंका नाहीं.

## ‘बारा’ ह्या संख्येची जादू

ह्या सूर्यमंदिरामध्यें ‘१२’ ही संख्या वैशिष्ट्यानें झळकते. रथाच्या बारा फूट उंचीच्या चाकांच्या बारा जोड्यांवर ( २४ चाकें ) सारें मंदिर उभारलेलें आहे हें वर सांगितलेंच आहे. चाकांच्या ह्या बारा जोड्या म्हणजे बारा राशींच्या प्रतीक आहेत, कीं त्या बारा महिने सूचित करतात ? कीं दोनही गोष्टी त्यांच्या द्वारें सूचित होतात ? भगवान् श्रीकृष्णाचा मुलगा सांब ह्यानें येथें बारा वर्षें तपश्चर्या केली होती त्याचा उल्लेख वर आलाच आहे. सम्राट् नरसिंहदेवानें आपल्या राज्याचा बारा वर्षांचा महसूल ह्या मंदिरापायीं खर्चीं घातला होता असें म्हणतात. बाराशें कारागिरांनीं बारा वर्षें खपून हें मंदिर उभारल्याचें सांगण्यांत येतें, तेंही लक्षांत घेण्यासारखें आहे. अर्थात् इतर संख्या येथें नाहींत असें नाहीं. सूर्याच्या किरणांचें किंवा सात वारांचें प्रतीक असे सात घोडे ह्या रथाला जोडलेले होते. त्यांपैकीं दोन-तीनच घोडे मोडक्या-तोडक्या स्थितींत शिल्लक आहेत. तसेंच रथचक्रांच्या आऱ्यांची संख्या बारा नसून आठ आहे, हें खरें, परंतु ‘१२’ ह्या संख्येचा प्रभाव बराच आहे हें सहज ध्यानांत येतें.

येथील इमारतीचा दगड कोंकणांतील जांभ्या दगडासारखा तांबूस आहे आणि कांहीं मूर्ति व कलाकुसरी पट्ट्या काळ्या दगडाच्या आहेत. कोणार्कच्या

आसपास अनेक मैलांमध्यें दगडाचें नांवही आढळत नाहीं अथवा डोंगर-पर्वतही नाहीं. अशा स्थितींत इतक्या मोठमोठ्या शिळा कोठून आणल्या असतील हा प्रश्नच आहे. इमारतीच्या दगडावर व अनेक मूर्तींवर समुद्राच्या खाऱ्या हवेचा परिणाम होऊन त्यांची झीज व मोडतोड झालेली आहे. ज्या वेगानें ह्या वास्तूचा नाश होत आहे, त्याचा विचार करतां ह्यापुढें शंभरदीडशें वर्षांहून जास्त दिवस हें मंदिर आहे ह्या स्थितींतही टिकणार नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे. वस्तुतः जांभ्या दगडांवर एवढें अवाढव्य धूड रचणें चूकच म्हटलें पाहिजे. ह्यामुळेंच कांहीं वर्षांपूर्वी ह्या मंदिराचा पुढील दर्शनी भाग कोसळून पडला होता. त्यानंतर दरवाजाच्या जागीं भिंत रचून मधील पोकळ भागांत वाळू व दगड भरण्यांत आले. हेतु हा, कीं बाहेरील हवेचा दाब जास्त होऊन भोवतालच्या भिंती पडूं नयेत. परंतु परिणाम उलटाच झाला. आंतील वाळू व दगड ह्यांत पाणी मुरून ते फुगूं लागले आणि बाहेरच्यापेक्षां आंतील दाब वाढला आणि त्यानेंच उरलेली इमारत कोसळण्याचा संभव निर्माण झाला. म्हणून आतां आंतील वाळू व पाणी ह्यांना बाहेर पडण्यासाठीं वाट करून देण्यांत आली आहे. अर्थात् आंतील वाळू बाहेर निघून गेली, कीं बाहेरच्या हवेचा दाब वाढून भिंती आपोआपच जमीनदोस्त होतील. सारांश, ह्या वास्तूच्या संरक्षणाचा कांहीं मार्ग सध्या तरी शास्त्रज्ञांना दिसत नाहीं.

ओरिसा सरकारचे सरकारी पाहुणे म्हणून आम्ही गेलों होतों. ह्यामुळें ओरिसा प्रांत पदार्थसंग्रहालयाचे क्यूरेटर श्री बिपिन बिहारी नाथ कोणार्कचें मंदिर दाखवावयास आमच्याबरोबर आले होते. मी त्यांना म्हणालों, "हीं चित्रं सुरक्षित रहातील असं एखादं रसायन शास्त्रानें शोधून काढलेलं नाहीं काय?" त्यांनीं उत्तर दिलें, "हा दगडच कच्चा आहे आणि समुद्रकांठच्या हवापाण्याचा परिणाम सतत होतच राहाणार. ह्यामुळें ही चित्रकला कोणत्याही परिस्थितींत जतन करून ठेवणं शक्य नाहीं." त्यांचें तें निराशापूर्ण उत्तर ऐकून क्षणभर विषाद वाटला आणि तोंडून उद्गार बाहेर पडले, "कालाय तस्मै नमः।"

## मंदिरासंबंधीं दंतकथा

ह्या मंदिराच्या बांधकामासंबंधीं दोन मोठ्या उद्बोधक दंतकथा ओरिसांत प्रचलित आहेत. सम्राट् नरसिंहदेव ह्याला हें मंदिर समुद्रांत बांधावयाचें होतें. समुद्रांतूनच वर येणाऱ्या सूर्यासारखें तें भासलें पाहिजे, अशी त्याची इच्छा. म्हणून त्यानें त्याप्रमाणें कारागिरांना आज्ञा केली. कारागीर लोक ओहोटीच्या वेळीं मंदिराचा पाया खणून काढीत, परंतु एवढ्यांत भरतीची वेळ होऊन खणलेला पाया रेतीनें भरून जाई. ह्यांतून कांहीं मार्ग सुचेना. मुख्य स्थपति ( चीफ इंजिनियर ) शिबेई सान्तरा काळजींत पडला.

एके दिवशीं चिंताग्रस्त शिबेई सान्तराला एका खेडवळ म्हातारीच्या घरीं वस्तीस राहावें लागलें. आपल्या घरीं आलेला पाहुणा सबंध राज्याचा स्थपति आहे, ह्याची तिला कल्पनाही नव्हती. तिनें नेहमींच्या सवयीप्रमाणें अतिथीच्या स्वागतासाठीं गरम गरम खीर तयार केली व ती केळीच्या पानावर घालून त्याच्यापुढें ठेवली. विचारमग्न व भुकेलेल्या सान्तरानें एकदम खिरींत हात घातला. त्याबरोबर त्याचा हात भाजला. त्याचा तो बावळटपणा पाहून म्हातारीला हसूं आलें आणि ती म्हणाली, “अरे, तूं तर त्या शिबेई सान्तरासारखाच वेडा दिसतोस !”

“शिबेई सान्तरासारखा ?” त्यानें चमकून तिच्याकडे पाहात विचारलें, “त्यानें काय वेडेपणा केला ? तो तर मोठा हुशार स्थपति आहे म्हणतात !”

“कसला हुशार अन् काय ! गरम खीर मधून न खातां कडेकडेनें खायची असते एवढी साधी गोष्टही ज्याला कळत नाहीं त्याची हुशारी काय कामाची !”

“म्हणजे !” आपल्याला ह्या बाईनें ओळखलें असावें ह्या शंकेनें शिबेई सान्तरा उद्गारला.

“म्हणजे असं, कीं तो जें सूर्याचं मंदिर बांधतो आहे, तें एकदम समुद्रांत कसं टिकणार ? कडेकडेनें बांधत जाऊन मग हळूहळू समुद्रांतला भाग बांधला पाहिजे, एवढी साधी गोष्टही त्याच्या लक्षांत येत नाहीं ! अन् म्हणे राजस्थपति !”

शिबेई सान्तराच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. त्याला बरोबर मार्ग सुचला. त्यानें आपल्या गळ्यांतील कंठा काढून तो म्हातारीच्या पायांवर ठेवला आणि तिला म्हणाला, " आई, आज तूं माझ्या शिरावरलं फार मोठं ओझं उतरवलंस. एवढा मोठा जगप्रसिद्ध कारागीर मी, पण एवढी साधी गोष्टही माझ्या ध्यानांत आली नव्हती ! "

बिचारी म्हातारी ! ' आ ' वासून पाहातच राहिली.

दुसरी दंतकथा मात्र कारुण्यपूर्ण आहे. कोणार्कचें बांधकाम चालू असतां तेथील एका कारागिराचा मुलगा धर्मपद हा रोज मंदिराचें काम पाहावयास जात असे. एके दिवशीं त्याला असें दिसून आलें, कीं आपला बाप आणि इतर कारागीर सचिंत बसले आहेत. त्याचें कारण असें होतें, कीं मंदिरावर कळस टिकत नव्हता आणि राजानें तर चोवीस तासांची मुदत दिलेली होती. त्या अवधींत जर कळस चढला नाहीं तर मुख्य स्थपतीसकट सगळ्या कारागिरांचीं डोकीं उडवून देण्यांत येणार होतीं. धर्मपदानें आपल्या मनाशीं कांहीं निश्चय केला आणि अंधाऱ्या रात्रीं आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें त्यानें मंदिरावर कळस चढवून दिला. येथपर्यंत सर्व ठीक झालें. परंतु नंतर त्याला वाटलें, कीं राजाच्या कानीं ही वार्ता गेली तर तो आपला सन्मान करून आपल्या बापाचा व इतरांचा अपमान करील. म्हणून त्यानें काम होतांच मंदिराच्या शिखरावरून खालीं समुद्रांत उडी टाकली आणि अशा प्रकारें आत्मबलिदान केलें. ह्या दंतकथेंत सत्याचा अंश कितपत असेल हें सांगणें कठीण आहे, परंतु अजूनही उत्कलवासी जनता ह्या बालहुतात्म्याचे पोवाडे गात असते, ही गोष्ट खरी आहे. त्याच्या बलिदानानें हजारों लोकांना दिव्य प्रेरणा दिलेली आहे.

## हत्ती व सिंह ह्यांचें आधिक्य

ओरिसांतील सर्वच देवळांत हत्ती व सिंह ह्यांच्या चित्रांचें अतोनात आधिक्य आढळतें. मंदिराच्या जोत्यांतील खालच्या पट्टीवर हत्तींची रांगच्या रांग असून प्रत्येक हत्ती वेगळा आहे. वरच्या बाजूस हत्तीवर सिंह व सिंहावर मनुष्य

अशा तऱ्हेचीं मोठीं मोठीं चित्रें आहेत. ह्या चित्रांचा अर्थ काय, असें श्री बिपिन बिहारी नाथ ह्यांना विचारलें असतां ते म्हणाले, "हत्ती म्हणजे संपत्ति आणि सिंह म्हणजे सामर्थ्य. सामर्थ्य हें नेहमींच संपत्तीवर प्रभुत्व मिळवीत असतं. ह्या सामर्थ्यावर जो आरूढ होईल तोच खरा पुरुषार्थी. ही गोष्ट लोकांच्या डोळ्यांसमोर सदैव राहावी म्हणून हीं शिल्पं आमच्याकडील मंदिरांत उभारण्यांत आलेलीं आहेत." कांहीं कांहीं ठिकाणीं हत्तीचें शरीर व सिंहाचें तोंड अशा मूर्ति आहेत, तर क्वचित् सिंहाचें शरीर व हत्तीचें तोंड अशाही मूर्ति पाहावयास मिळतात. ह्या सर्व मूर्ति अत्यंत प्रमाणबद्ध आणि भावनापूर्ण आहेत. सिंहाचा आवेश आणि हत्तीची दीनवाणी मुद्रा पाहिली, कीं संपत्ति व सामर्थ्य ह्यांचे संबंध चटकन् डोळ्यांसमोर उभे राहातात.

## न आढळणारें जिराफाचें चित्र

भारतांतील मंदिरांत कोठेंही न आढळणारा एक प्राणी कोणार्कच्या मंदिरावर पाहावयास मिळाला. तो म्हणजे जिराफ. भारतांत नसणाऱ्या ह्या प्राण्याचें चित्र ज्या अर्थीं तेराव्या शतकांत बांधलेल्या ह्या मंदिरामध्यें पाहावयास मिळतें, त्या अर्थीं वास्को-डि-गामाच्या आगमनापूर्वींही भारताचे व विशेषतः उत्कलचे संबंध आफ्रिकेशीं चालू असले पाहिजेत असा निष्कर्ष श्री नाथ ह्यांनीं काढला व आम्हांलाही तो मान्य झाला. एके काळीं उत्कल किंवा कलिंग देश समुद्रपर्यटन आणि व्यापार ह्या बाबतींत उत्कर्षाच्या परमोच्च बिंदूपर्यंत पोंचला होता असें इतिहास सांगतो. त्यामुळें येथील कारागिरांनीं जिराफ पाहिला असल्यास नवल नाहीं.

## पोर्तुगीजांचा 'ब्लॅक पॅगोडा'

पाश्चात्यांमध्यें ह्या मंदिराचें सर्वांत प्रथम दर्शन पोर्तुगीजांना झालें असावें. त्यांनीं ह्याला 'ब्लॅक पॅगोडा' ( काळें मंदिर ) असें नांव दिलें होतें. ह्या मंदिराच्या मानानें चुन्याचा गिलावा असलेलें पुरीचें जगन्नाथमंदिर पांढरें दिसतें म्हणून त्यांनीं त्याला 'व्हाइट पॅगोडा' असें नांव दिलें होतें. बंगालच्या

उपसागरावरील हीं दोन मंदिरें एके काळीं फिरंग्यांमध्येंही खूप प्रसिद्ध होतीं असें दिसतें.

## शिकारीचीं व सैनिकांचीं चित्रें

ओरिसांतील इतर मंदिरांप्रमाणें ह्या मंदिराच्या भिंतीवरही अश्लील चित्रें कोरलेलीं आहेत. परंतु त्यांतही कलेनें परमोच्च बिंदु गांठलेला दिसून येतो. अर्थात् त्याखेरीज इतर जीं चित्रें आहेत तीं अधिक चांगलीं आहेत असें मला वाटतें. वाघाची शिकार, रानडुकराची शिकार, मारलेली शिकार वाहून नेणारे लोक, सिंहाशीं झुंज, वगैरे अनेक चित्रें मोठीं जिवंत वाटतात. त्याचबरोबर रामायण-महाभारतांतील प्रसंगही अनेक चित्रांत चित्रित केलेले आढळतात. एक मजेशीर चित्र येथें पाहावयास मिळालें. एक सैनिक आपल्या पत्नीला व मुलाला घेऊन प्रवासाला चालला आहे, असें तें चित्र आहे. त्याच्या हातांत उभी ढाल आहे व पत्नीच्या कडेवर मूल असून डोक्यावर ओझें आहे. पत्नीच्या चेहेऱ्यावरील वात्सल्य आणि प्रणयभावनांचें मिश्रण मोठें मजेशीर दिसतें. तसेंच येथील अलसकन्यांचीं चित्रेंही प्रेक्षणीय आहेत. यौवनानें रसरसलेल्या ह्या तरुणी नुसत्या आळस देतात, परंतु त्यांत किती तरी मोहकता नि मादकता भरलेली आहे.

## सूर्यदेवाचीं दोन उत्कृष्ट शिल्पें

ह्या मंदिरांत सूर्याच्या तीन दगडी मूर्ति असाव्यात असें तज्ज्ञांचें मत आहे. पैकीं सूर्योदयाच्या वेळची मूर्ति मुख्य गर्भागारांत असावी. कारण मंदिराचें तोंड पूर्वेस असून उगवल्या सूर्याचीं किरणें तेथें पोंचत असावींत. परंतु सध्या तरी ती मूर्ति कोठें दिसत नाहीं. दुसऱ्या दोन मूर्तींतील एक मध्यान्हींच्या सूर्याची असून दुसरी अस्तास जाणाऱ्या सूर्याची आहे. मध्यान्हींच्या सूर्यामध्यें तसें वैशिष्ट्य कांहीं नाहीं. परंतु अस्तास जाणाऱ्या सूर्याचा चेहेरा इतका थकलेला व मलूल दिसतो कीं तो अस्तास जाण्यास अगदीं उत्सुक झालेला आहे हें न सांगतांही लक्षांत येतें. पण त्यापेक्षांही त्याचा घोडा विशेष प्रेक्षणीय आहे. सबंध दिवसभर धावून धावून बिचारा अगदीं दमून गेला आहे. आतां जर त्याला विश्रांति मिळाली नाहीं तर तो

जमिनीवर ( ! ) कोसळणार असें वाटतें. मध्यान्हींच्या सूर्याची दृष्टि डोळ्यांसमोर आहे, त्याला अजून खूप दूर जावयाचें आहे, परंतु सूर्यास्ताच्या सूर्याची नजर खालीं वळलेली आहे. घोड्याची मान व नजरही खालीं वळलेली आहे. जणूं वर पाहाण्याची ताकदही त्याच्या ठिकाणीं उरलेली नाहीं.

## नटमंदिरावरील नृत्यवाद्यांचीं चित्रें

मुख्य सूर्यमंदिरावर अगदीं वरच्या बाजूस मृदुंग, टाळ, वीणा, वगैरे वाद्यें वाजविणाऱ्या स्त्रियांच्या मूर्ति मोठ्या प्रेक्षणीय आहेत. त्यांत पूर्णपणें शाबूत असलेल्या मूर्ति फारच थोड्या आहेत. परंतु मंदिराचाच भाग असलेल्या नट-( किंवा नाट्य ) मंदिरावरील चित्रें मात्र माणसाला थक्क करून सोडतात. येथील भिंतीवर नृत्य करणाऱ्या व वाद्यें वाजविणाऱ्या स्त्री-पुरुषांचीं शेकडों चित्रें आहेत. त्यांतील प्रत्येक चित्र अगदीं वेगळें आहे. नृत्यकलेचा किती विकास त्या काळीं येथें झालेला होता ह्याची कल्पना ह्या चित्रांवरून सहज येऊं शकते. ह्या ठिकाणीं एक गोष्ट चटकन् ध्यानांत येते ती अशी, कीं येथील चित्रांत प्रणयाचें अथवा शृंगाराचें एकही चित्र नाहीं. मग अश्लील चित्राचें तर नांवच नको. घोड्यावरील शिकार, सिंहाशीं द्वंद्वयुद्ध, मातेचें वात्सल्य, वगैरे नाना प्रकारचीं चित्रें नृत्य व वाद्यांच्या चित्रांमधून पेरल्यासारखीं आहेत. परंतु अश्लील चित्र एकही नाहीं. नटमंदिराप्रमाणें भोग ( प्रसाद ) मंदिरावरही अश्लील चित्रें नाहींत.

## ते प्रसिद्ध घोडे व हत्ती

मुख्य मंदिराच्या बाहेरच्या बाजूस एकीकडे दोन घोड्यांचीं शिल्पें असून दोन दगडी हत्तीही आहेत. त्यांपैकीं घोड्याचें चित्र भारतीय पोस्टाच्या तिकिटावर घेण्यांत आलेलें आहे. ह्या घोड्याशेजारीं त्याचा सैनिक असून तो आतां त्यावर आरूढ होणार आणि घोडा तुफान वेगानें दौडायला सुरुवात करणार असें त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें कीं वाटतें. घोड्यानें आपल्या पायांखालीं एका शत्रुसैनिकाला चिरडलेलें आहे. हत्तीनें मात्र शत्रुसैनिकाला पायांखालीं न चिरडतां सोंडेंत आवळून धरलें

आहे आणि तो आतां त्याच्या चिंधड्या करून पुढें जाणार असें त्याच्याकडे पाहिलें कीं वाटतें. त्याला नृत्य करणारा हत्ती असें म्हणतात.

## नवग्रहांची प्रचंड शिळा

मंदिराच्या आवारांतच एक छोटीशी शेड बांधून तींत अनेक भग्न मूर्ति ठेवलेल्या आहेत. एक छोटेंसें म्युझियमच तेथें तयार झालेलें आहे. परंतु त्या सर्वांपेक्षां एक वेगळी वस्तु तेथें आहे. ती म्हणजे नवग्रहांच्या मूर्ति कोरलेली प्रचंड शिळा. ही शिळा काळ्याभोर दगडाची असून तिची लांबी सुमारें सोळा फूट आहे व रुंदी सुमारें अडीच फूट आहे. हिची जाडी दोन अडीच फूट असावी. ती मधोमध कापून मूर्तींच्या पाठीमागची शिळा विलायतेला न्यावी असा विचार कोण्या साहेबानें केला होता. परंतु तें एवढें प्रचंड धूड त्या वेळीं त्याला जागेवरून हलवितां आलें नाहीं असें म्हणतात.

ह्या शिळेवर रवि, सोम, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहू व केतु इतके ग्रह ओळीनें आहेत. प्रत्येकाच्या कांहीं खुणा आहेत. नवग्रहस्तोत्रांतील वर्णन ह्या मूर्तींना लावून दाखविण्याचा प्रयत्न श्री बिपिन बिहारी नाथ ह्यांनीं केला, परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. ह्या सर्व ग्रहांतील राहूचें चित्र मला फार आवडलें. एका हातांत सूर्य व दुसऱ्या हातांत चंद्र दाबून धरलेल्या त्या ग्रहाच्या चेहेऱ्यावर जें विजयाचें हास्य विलसतें तें पाहिलें, कीं गंमत वाटते. त्याच्या त्या हास्यांत दुष्टता किंवा क्रूरता नाहीं. दानवाचा सहज भोळेपणा त्यांत दिसून येतो. सूर्य आणि चंद्र ह्यांना किती लीलेनें आपण कबजांत ठेवलें आहे हेंच जणूं त्याला जगाला दाखवून द्यावयाचें आहे.

ह्या नवग्रहांची पूजा करण्यासाठीं अनेक लोक तेथें येत असतात. ह्यामुळें येथें पंडे-पुजारी हटकून असतात.

## अतृप्त मनानें परत

ह्या ठिकाणीं शिल्पकलेचें जणूं अखंड भांडारच भरलेलें आहे. तासन् तास पाहात राहिलें तरी मनाची तृप्ति अशी होत नाहीं. पाय थकतात, डोळेही

थक्तात, परंतु मन मात्र थक्त नाहीं. पुनः पुन्हा तीं चित्रें पाहाण्याची इच्छा होते. दुपारच्या वेळीं उन्हांत फिरणें त्रासाचें असतें म्हणून आम्ही भल्या पहांटे उठून सरकारी जीपनें सूर्योदयाच्या सुमारास तेथें पोंचलों आणि उन्हें चढण्यापूर्वी सर्व पाहून घेतलें. समुद्रकिनारा असल्यामुळें तेथें उत्तम शहाळीं मिळालीं. त्यांचें पाणी पोटभर पिऊन पुनः पुन्हा त्या भग्न सूर्यमंदिराकडे वळून पाहात पाहात आम्ही परत फिरलों. भारतीय शिल्पकलेच्या त्या भव्य दर्शनानें आमचीं मनें इतकीं भारावलीं होतीं कीं जातेवेळीं अखंड बडबड करणारीं आमचीं तोंडें आतां अगदीं गप्प झालीं होतीं.

# मंदिरांचें आगर : भुवनेश्वर

## लिंगराजाचें अवाढव्य मंदिर

ओरिसाची नवी राजधानी भुवनेश्वर जसजशी जवळ येऊं लागते, तसतशीं तेथील मंदिरांचीं शिखरें आगगाडींतून दिसूं लागतात. त्या सर्वांत उंच अशा एका शिखराकडे नवख्या माणसाची दृष्टि सहजच खेचली जाते आणि तो मोठ्या कुतूहलानें शेजारीं बसलेल्या व्यक्तीला विचारतो, " काय हो, तें समोर दिसतं तें मंदिर कसलं आहे ? "

ती व्यक्ति जाणकार असेल तर चटक्न् उत्तर देते, " तें होय ? तें लिंगराजाचं मंदिर."

" फारच मोठं आहे नाहीं ? "

" तर हो, इथल्या सगळ्या देवळांत तेंच मोठं आहे ! "

खरोखरीच लिंगराजाचें देऊळ फार प्रचंड आहे. त्याच्या आवाराची लांबी ५२० फूट असून रुंदी ४६५ फूट आहे. मुख्य शिखराची उंची जोत्यापासून १४७ फूट ९ इंच आहे. ह्यावरून ह्या मंदिराच्या अवाढव्यपणाची कल्पना येईल.

## अप्रतिम शिल्पकलेचे नमुने

परंतु भव्यता किंवा अवाढव्यपणा हेंच कांहीं लिंगराज मंदिराचें वैशिष्ट्य नव्हे. कलिंग शिल्पपद्धतीचा उत्कृष्ट नमुना म्हणून लिंगराज मंदिराकडे बोट दाखवितां येतें. जगन्नाथाच्या मंदिराप्रमाणें हेंही पूर्णपणें शाबूत असें मंदिर आहे. ह्याच्या मुख्य भागावर ( विमान ) वरील बाजूस लहान लहान देवळें किंवा खोलीवजा कोनाडे असून त्यांत कांहीं अप्रतिम सुंदर मूर्ति आहेत. तेथें जाण्यास प्रशस्त पायऱ्या असल्यामुळें कांहीं अडचण पडत नाहीं. त्यांपैकीं कार्तिकेय, गणपति आणि पार्वती ह्यांच्या मूर्ति फारच मोहक आहेत. पार्वतीच्या अंगावरील वस्त्र इतक्या नाजुकपणें कोरलेलें आहे, कीं त्यांतील रेषा न् रेषा स्पष्ट दिसते. ह्या मूर्तींचा दगड पूर्ण काळा नसून काळसर आहे आणि भक्त लोक त्यांवर तेल ओतीत असतात. ह्यामुळें प्रथमदर्शनीं असें वाटतें, कीं ह्या मूर्ति दगडी नसून लोखंडीच आहेत. ह्याखेरीज अलसकन्यांच्या अनेक मनोहर मूर्ति येथें पाहावयास मिळतात. अलसकन्या म्हणजे यौवनानें रसरसलेली तरुणी. ती आळशीपणानें शरीराला आळोखेपिळोखे देते; त्यांत कलावंतांनीं किती मादकता भरलेली आहे हें प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज कळणार नाहीं. लिंगराजाच्या मंदिरांतील 'पत्रलेखन' ह्या शिल्पाचें चित्र आपल्यापैकीं अनेकांच्या पाहाण्यांत आलेलें असेल. ह्यांत एक यौवनमत्ता तरुणी आपल्या प्रियकराला पत्र लिहीत आहे. तिच्या हातांतील भूर्जपत्र व लेखणी आणि तिची लिहिण्याची ऐट हें सर्वच पाहात राहावें असें आहे. हें चित्र कितीही वेळां पाहिलें तरी मनाची तृप्ति अशी होत नाहीं.

असेंच आणखी एक शिल्प आहे. शृंगार करणाऱ्या तरुणीचें. हातांत आरसा घेऊन ती भाळीं कुंकूं रेखीत आहे. पण तिची शान मोठी प्रेक्षणीय आहे.

अर्थात् ह्या मंदिरावर नुसतींच प्रणय-शृंगाराचीं शिल्पें आहेत असें मात्र नाहीं. मातृत्व आणि वात्सल्य ह्यांचें दर्शन घडविणारीं माता-बालकांचीं शिल्पेंही येथें आहेत. हत्ती व सिंह ह्यांचीं चित्रें आहेत. इतकेंच काय, पण ओरिसांतील इतर मंदिरांत आढळणारीं अश्लील चित्रेंही येथें आहेत. सारांश, जीवनांतील कोणताही भाग येथें अस्पृष्ट राहिलेला नाहीं.

## स्वयंभू शिवलिंग

ह्या प्रचंड मंदिराला शोभेल असेंच अवाढव्य शिवलिंग येथें आहे. लिंगराजाचें हें शिवलिंग स्वयंभू व जागृत आहे अशी लोकांची समजूत असल्यामुळें यात्रेकरूंची गर्दी ह्या मंदिरांत सारखी असते. जगन्नाथाच्या मंदिराप्रमाणें येथेंही प्रसाद तयार करण्यासाठीं मोठें स्वयंपाकघर आहे व तेथें मोठमोठ्या चुलींवर अन्न शिजत असतें. ह्या मंदिराच्या आवारांत इतरही अनेक लहान मोठीं मंदिरें आहेत. ह्यामुळें आवार प्रशस्त असूनही तें अगदीं गजबजल्यासारखें वाटतें.

## परशुरामेश्वराचें प्राचीन मंदिर

लिंगराजाचें मंदिर हें नवव्या शतकांतील आहे तर परशुरामेश्वराचें मंदिर सातव्या शतकाच्या सुरुवातीचें आहे. ह्या देवळावर कोठेंही अश्लील चित्रें नाहींत. ह्यावरून त्या वेळपर्यंत अशीं चित्रें कोरण्याची प्रथा पडलेली नसावी असें दिसतें. अर्थात् नृत्य, वादन, वगैरे करणाऱ्या तरुण-तरुणींचीं चित्रें ह्या मंदिरावर आहेत आणि तीं फारच छान आहेत. येथील सजावटीमध्यें आंवळ्यांसारखे गोल मणी प्रामुख्यानें आढळतात. ते इतर मंदिरांतील चित्रांत आढळत नाहींत. ह्या देवळाच्या प्रवेशद्वारावर कैलास पर्वत उचलणाऱ्या रावणाचें मोठें वैशिष्ट्यपूर्ण चित्र आहे. हल्लीं तें भंगलेल्या स्थितींत असलें तरी अवश्य प्रेक्षणीय आहे. त्यांतील रावणानें आपल्या वरच्या हातांनीं कैलास उचलून धरला आहे आणि खालचे दोन हात गुडघ्यांवर टेकून तो उठण्याच्या बेतांत आहे. त्याच्या डोक्यावर मधोमध शंकर-पार्वती असून पार्वती घाबरल्यासारखी दिसत आहे, तर भोलानाथ शंकर तिला अभयदान देत आहेत. त्यांनीं डाव्या हातानें पार्वतीला सांवरलें असून उजव्या हातानें अभयमुद्रा धारण

केली आहे. ह्या चित्राच्या बाजूंना गणेश, कार्तिकेय आणि शंकराचे इतर गण दाखविलेले असून त्यांच्यापैकीं कांहींजण रावणाशीं लढायला उद्युक्त झालेले दिसत आहेत, तर कांहींजणांची भीतीनें घाबरगुंडी उडालेली आहे.

ह्या चित्राच्या वरच्या बाजूस नृत्य करणाऱ्या नटराजाचें चित्र आहे आणि त्याही वर एक लाकुली आहे. लाकुली म्हणजे लाकुटिक, लाकडाचा दंडुका घेतलेला पहारेकरी. असे लाकुली ह्या देवळावर अनेक पाहावयास मिळतात. त्याखेरीज शिवपार्वतीच्या विवाहाचीं दृश्यें, अन्नपूर्णेकडून शंकर भिक्षा घेत असलेलें दृश्य, वगैरे अनेक दृश्यें येथें अमर करण्यांत आलेलीं आहेत.

## वैताल मंदिरवरील वैशिष्टयपूर्ण नटराज

ह्या काळच्या मंदिरांपैकीं वैताल मंदिराचा बाह्य भाग मोठा प्रेक्षणीय आहे. ह्याच्या शेजारींच मार्कंडेश्वर आणि शिशिरेश्वर हीं मंदिरें असून तीं सर्व एकाच प्रकारचीं आहेत. वैताल म्हणजे वेताल, वेताळ, द्वारपाल. परंतु ह्या ठिकाणीं हा शब्द वेतालेश्वर ( शंकर ) ह्या अर्थानें वापरण्यांत आला असावा. हें मंदिर लहानसेंच आहे. परंतु त्याच्यावरील कलाकुसर पाहाण्यासारखी आहे. परशुरामेश्वराच्या मंदिराप्रमाणें हेंही मंदिर अश्लील चित्रांपासून सर्वस्वीं मुक्त आहे. ह्या मंदिराच्या प्रवेशद्वारावरील नटराजाचें शिल्प वैशिष्टयपूर्ण आहे. ह्या शिल्पाभोवतीं मण्यांच्या माळा असून त्यानंतर चैत्य पद्धतीची महिरप आहे. एरव्हीं नटराजाच्या चित्रांत न दिसणाऱ्या अशा दोन गोष्टी ह्या चित्रांत आहेत, त्या म्हणजे नटराजाच्या डाव्या बाजूस एक स्त्री असून तिच्या हनुवटीला नटराजानें आपल्या अनेक हातांपैकीं एका हातानें स्पर्श केलेला आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे नृत्य करणाऱ्या त्या नटराजाच्या दोन्ही पायांच्या मधोमध एक बैल असून त्यानें आपलें तोंड नटराजाच्या चेहेऱ्याकडे वळविलेलें आहे. त्या बैलाच्या एकूण ढंगावरून असें वाटतें, कीं तोही नृत्यांत समरस होऊन स्वतः नाचत आहे.

## केदारगौरी मंदिरांतील औषधी पाणी

केदारगौरी मंदिरामध्यें उल्लेखनीय असें कांहीं वैशिष्टय नाहीं. परंतु इतर एक दोन कारणांमुळें तें मंदिर स्मरणांत राहिलेलें आहे. एक म्हणजे त्याच्या आवारांतील औषधी

पाण्याचें टाकें. हें पाणी शुभ्र निळसर दिसतें. ह्याची चवही फार छान आहे. खोल विहिरीसारखें असल्यामुळें तें दोरानें ओढून काढावें लागतें. त्यामुळें अस्वच्छ होण्याची भीति नसते. ह्याच्या औषधी गुणांमुळें तें कलकत्त्यालाही नेण्यांत येतें असें कोणींतरी सांगितलें. परंतु त्यांत कितपत तथ्य असेल हें सांगणें कठीण आहे. भुवनेश्वरांत शिरतांना अगदीं रस्त्याच्या कडेलाच हें देऊळ आहे. आम्ही स्वतंत्र सरकारी मोटारींतून जात होतों, ह्यामुळें गाडी थांबवून पाणी भरून घेणें आम्हांला सहज शक्य झालें.

दुसरें कारण म्हणजे ह्या मंदिराच्या मुळाशीं असलेली दंतकथा. आधुनिक पद्धतीची ती प्रेमकथाच आहे. एका राजाच्या गौरी नांवाच्या सुस्वरूप कन्येचें केदार नांवाच्या एका गरीब तरुणावर प्रेम बसतें. केदारही तिच्यासाठीं जीव टाकूं लागतो. पण राजाला हें कसें खपणार! तो आपल्या चाकरांकरवीं शिकारीस चाललेल्या केदारावर आपल्या शिकारखान्यांतील सिंह सोडतो. बेसावध केदार सिंहाशीं झालेल्या झटापटींत जखमी होऊन मेल्यासारखा पडतो. तो मेल्याची वार्ता कळतांच गौरी दुःखातिशयानें आत्महत्या करते. इकडे जंगलांतील लोकांच्या उपचारानें केदार बरा होऊन राजधानींत परत येतो आणि गौरीच्या मृत्यूची बातमी ऐकून स्वतःही मरून जातो. अशा प्रकारें ह्या सनातन कहाणीचा शेवट झाल्यावर राजाला ह्या पापाचें प्रायश्चित्त करण्याची आज्ञा देवांकडून होते. तो एक शिवमंदिर बांधतो. हेंच तें केदारगौरीचें मंदिर.

## देवळांची संख्या

इसवी सनापूर्वीच्या तिसऱ्या शतकापासून इसवी सनाच्या सोळाव्या शतकापर्यंत म्हणजे सुमारें दोन हजार वर्षेपर्यंत हें शहर भरभराटीच्या स्थितींत होतें. ह्या शहरामध्यें जितकीं धार्मिक व ऐतिहासिक स्थळें भरलेलीं आहेत, तितकीं इतरत्र एके ठिकाणीं क्वचितच आढळतील. ह्या शहरांत असलेल्या देवळांची निश्चित संख्या अजूनपर्यंत कोणीही सांगूं शकलेलें नाहीं. हीं देवळें खूप दूरदूरपर्यंत पसरलेलीं

आहेत आणि त्यांच्यापैकीं कित्येक लहानमोठ्या घरांआड दडलेलीं आहेत. ह्यामुळें त्यांची गणना करणें जवळ जवळ अशक्य आहे. अशा प्रकारचा एक पद्धतशीर प्रयत्न श्री. एम्. एम्. गांगुली ह्या बंगाली संशोधकांनीं केला होता आणि देवळांची संख्या पांचशें आहे, असें जाहीर केलें होतें. परंतु त्यांत मोठ्या मंदिरांतील लहान मंदिरांचाही समावेश झालेला असावा. ह्यामुळें त्यांची संख्या कितपत विश्वसनीय समजतां येईल ह्याविषयीं मतभेद आहे. सारांश काय, कीं भुवनेश्वर हें शेकडों मंदिरांनीं गजबजलेलें शहर आहे. ह्यामुळेंच त्याला The Temple Town of Bhuvaneshwar असें म्हणण्यांत येतें.

## राजाराणी-मंदिर

मुख्य शहरापासून दूर एकीकडे पडलेल्या राजाराणी-मंदिराकडे सामान्यतः प्रेक्षकांचें लक्ष जात नाहीं. कारण तें लिंगराजाच्या मंदिराप्रमाणें प्रचंडही नाहीं आणि त्यांत देव नसल्यामुळें भगतगणांची कृपादृष्टिही त्याच्याकडे वळत नाहीं. परंतु शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून कलारसिक लोक ह्या मंदिराकडे पाहातात. ह्या मंदिरांत एके काळीं शिवाची अथवा नटराजाची मूर्ति असावी, असें कांहीं विद्वानांचें मत आहे. परंतु सध्या मात्र तें पूर्णपणें रिकामेंच आहे. ह्यामुळें युरोपियन लोकांनाही ह्या देवळांत बिनदिक्कतपणें प्रवेश करतां येतो. आचार्य विनोबा भावे ह्यांच्याबरोबर भूदानयात्रेंत असलेल्या मिस फ्रान्स ह्या फ्रेंच महिलेला पुरीच्या जगन्नाथाच्या मंदिरांत तेथील पंड्यांनीं प्रवेश करूं दिला नाहीं ह्या गोष्टीचा त्या वेळीं खूपच गाजावाजा झालेला होता आणि पुरीच्या सर्वोदय संमेलनाच्या वेळीं आचार्य विनोबांनीं लागोपाठ तीन दिवस प्रार्थना-प्रवचनांत ह्या गोष्टीचा उल्लेख करून हिंदूंना अधिक सहिष्णु बनण्याचा उपदेश व सल्ला दिला होता, हें आपल्यापैकीं अनेकांच्या स्मरणांत असेल. वस्तुतः ही घटना भुवनेश्वराच्या लिंगराज मंदिरांतच घडावयाची. कारण पुरीच्या आधीं विनोबांचा मुक्काम भुवनेश्वरास होता. ह्यासंबंधीं आमच्याबरोबर असलेले ओरिसा राज्याचे प्रसिद्धिअधिकारी श्री. सुधीर घोष ह्यांना विचारलें असतां ते म्हणाले, "लिंगराजमंदिरांत त्या बाईंना प्रवेश मिळणार नाहीं, ह्याची कल्पना आम्हांला होतीच. म्हणून ज्या वेळीं विनोबा त्या

देवळांत जाणार होते त्याच वेळीं मिस् फ्रान्सना घेऊन आम्ही बाहेर पडलों आणि राजाराणीसारख्या कलापूर्ण पण देवरहित देवळांतून त्यांना आम्हीं हिंडवून आणलें. त्यामुळें झगड्याचा प्रसंगच टळला. अर्थात् ही युक्ति पुरीला जमली नाहीं. कारण तेथें जगन्नाथाच्या मंदिराखेरीज दुसरें कांहीं पाहाण्यासारखें नाहींच." 'पब्लिसिटी ऑफिसरां'च्या त्या युक्तीचें आम्हांलाही कौतुक वाटलें. परंतु परधर्मीयांना हिंदु मंदिरापासून दूर ठेवण्यांत त्यांनीं जो नकळत हातभार लावला त्याबद्दल विषादही वाटला.

मराठी ग्रंथालय ठाणे
१०६९६

## नांव कसें पडलें ?

ह्या मंदिराच्या द्वारावरील चंड व प्रचंड हे शैव द्वारपाल, नटराज, लिंगपूजा, निशापार्वती, शिवपार्वतीविवाह, वगैरे चित्रें प्रेक्षणीय आहेत. परंतु सर्वांत सुंदर भाग म्हणजे येथील कलाकुसर होय. अशी कलाकुसर भुवनेश्वरच्याच काय पण इतर ठिकाणच्याही फार थोड्या इमारतींवर पाहावयास मिळते.

ह्या देवळाला 'राजाराणी' असें नांव कोणत्या कारणानें पडलें ह्या बाबतींत विद्वानांमध्यें मतभेद आहेत. श्री. एम्. एम्. गांगुली ह्यांचें म्हणणें असें, कीं ह्या मंदिरासाठीं जो पिवळसर रंगाचा रेताड दगड वापरलेला आहे, त्याला स्थानिक लोक "राजरानिया" दगड असें म्हणतात. त्यावरून ह्या देवळाला राजाराणीचें मंदिर असें नांव पडलें असावें.

ह्याच्या उलट कांहीं लोकांचें असें मत आहे, कीं हें मंदिर बांधलें जात असतां राजाची राणी तें पाहाण्यास येत होती. अचानकपणें वाटेंतच ती मृत्युमुखीं पडली. तिच्या शोकानें व्यथित होऊन राजानें तें मंदिर तसेंच अर्धवट ठेवलें; त्यांत मूर्तीची प्राणप्रतिष्ठाही केली नाहीं. ह्यामुळें ह्या मंदिराला राजाराणी-मंदिर असें नांव मिळालें. ह्या मताला आधार म्हणून श्री. सुधीर घोष ह्यांनीं ह्या मंदिराच्या इमारतीचा अपूर्ण राहिलेला भागही दाखविला. तो भाग पाहातां खरोखरीच हें मंदिर अपूर्ण राहिलें असावें असें वाटतें.

## अलसकन्यांचीं मनोहर शिल्पें

ओरिसांतील इतर मंदिरांप्रमाणें ह्या देवळावरही अश्लीलतेच्या सदरांत मोडूं शकतील अशीं चित्रें आहेत. परंतु तीं बीभत्स मात्र मुळींच नाहींत. कोपऱ्या-कोपऱ्यांतून, सर्वसामान्य प्रेक्षकाला न दिसतील अशा ठिकाणीं हीं चित्रें आहेत. ह्यामुळें त्यांच्यावर हवापाण्याचा परिणाम न होतां तीं चांगलीं टिकून राहिलीं आहेत. त्यांतील मार्दव व सौंदर्य सहज डोळ्यांत भरण्याइतकें स्पष्ट आहे.

परंतु ह्या मंदिरावरील अलसकन्यांचीं शिल्पें सर्वोत्कृष्ट आहेत. झाडाच्या फांदीला एका हातानें धरून आळस देणारी किंवा आरशांत पाहून शृंगार करणारी युवती ह्यांचीं चित्रें खरोखरीच मन मोहून टाकतात.

## मुक्तेश्वराचें अद्भुत सुंदर प्रवेशद्वार

राजाराणी मंदिराप्रमाणें मुक्तेश्वराचें मंदिरही कलाकुसरीच्या बाबतींत थक्क करून सोडणारें आहे. भारतांतील प्रथमश्रेणीच्या कलापूर्ण मंदिरांत ह्याची गणना होते.

जणूं एखादें स्वप्नच सत्यसृष्टींत साकार झालेलें असावें तसें हें मंदिर भासतें. ह्यांतील प्रत्येक इंच जागा कलाकुसरीनें भरलेली आहे. ह्याचें प्रवेशद्वार इतकें सुंदर आहे कीं त्याला भारतीय तिकिटावरही स्थान मिळालें आहे. ह्या प्रवेशद्वाराची नक्कल वैताल मंदिरासमोर कांहीं वर्षांपूर्वी करण्यांत आलेली आहे ; परंतु गेलीं शेकडों वर्षें उन्हांत व पावसांत राहूनही मुक्तेश्वराच्या प्रवेशद्वारामध्यें जो ताजेपणा व मोहकता दिसून येते ती ह्या नव्या प्रवेशद्वारांत मुळींच आढळत नाहीं. ह्या प्रवेशद्वाराच्या खांबावर मोत्यांच्या सरांसारखी नक्षी करण्यांत आलेली आहे, ती तर फारच आकर्षक वाटते.

ह्या मंदिराचें दुसरें एक वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या गाभाऱ्यांतील छतावर सुंदर चित्रें कोरलेलीं आहेत. उत्कलमधील इतर कोणत्याही मंदिरांत अशीं चित्रें आढळत नाहींत. सर्व मंदिरांच्या बाहेरील भिंतींवरच सारी कलाकुसर दिसून येते. दक्षिणेस हळेबीड-बेलूरच्या मंदिरांत अशा प्रकारें छतांवर नानाप्रकारचीं चित्रें कोरलेलीं आढळतात, त्यांवरून मुक्तेश्वराच्या मंदिराचे शिल्पकार कदाचित् दाक्षिणात्य असतील असा विचार मनांत येऊन गेला.

## मूषकावरील गजानन

ह्या मंदिरांत हत्तीवर आरूढ झालेल्या सिंहांचीं, हत्तीचे पाय असलेला सिंह व सिंहाचें तोंड असलेला हत्ती ह्यांचीं, नागांचीं, वगैरे चित्रें सर्वत्र भरलेलीं आहेत. येथील मंदिरांच्या इतिहासांत गणेशाचें वाहन म्हणून उंदराचा उपयोग केल्याचें चित्र प्रथम ह्याच देवळांत पाहावयास मिळतें. तसेंच कार्तिकेयाशेजारील कोंबडा ( कीं मोर ? ), सप्तमातृकांच्या कडेवरील बालकें आणि नवग्रहांतील केतु प्रथमच येथें आढळतात. ह्यामुळें जुन्या पद्धतीचीं आणि नव्या पद्धतीचीं मंदिरें ह्यांतील दुवा सांधण्याचें कार्य हें मुक्तेश्वराचें मंदिर करीत आहे. ह्या दृष्टीनें ह्याला फार महत्त्व आहे. ह्याच्या जवळ इतर अनेक मंदिरें आहेत परंतु त्यांत वैशिष्ट्य असें कांहीं दिसत नाहीं.

## आवारांतील निर्वासित मूर्ति

मुक्तेश्वराचें मंदिर विशेष लक्षांत राहाण्याचें आणखी एक कारण म्हणजे ह्या देवळाच्या आवारांत लहान लहान देवळांतून किंवा मोठ्या कोनाड्यांतून कांहीं सुंदर मूर्ति ठेवण्यांत आलेल्या आहेत. ह्या मूर्ति येथें कोठून आल्या हें सांगणें कठीण आहे. बहुधा जीं देवळें पडून झडून गेलीं त्यांतील ह्या मूर्ति असाव्यात. स्वतःचें घरदार नसलेल्या निर्वासितांप्रमाणें अर्ध्या खणाच्या खोलींत कसाबसा जीव सांभाळून राहाणाऱ्या ह्या मूर्तींकडे पाहिलें, कीं त्यांच्याबद्दल मनांत करुणा निर्माण झाल्याशिवाय राहात नाहीं.

ह्यांपैकीं दोन मूर्ति चटकन नजरेंत भरून चिरकाल स्मरणांत राहाणाऱ्या आहेत. एक आहे नटराजाची आणि दुसरी आहे नागराजाची. नटराजाच्या मस्तकावरील आडवा नाग विशेष लक्ष वेधून घेतो आणि त्याच्या उजव्या पायाशीं गणराज मांडी ठोकून कां बसले असावेत तें ध्यानांत येत नाहीं. नृत्यामध्यें निमग्न झालेल्या नटराजाच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेचें मोठें लोभस हास्य वेलसत आहे. नागराजाची मूर्ति मानवासारखीच आहे, परंतु त्याच्या चेहऱ्याच्या मागील बाजूस फणा काढलेला आहे. ही मूर्ति संपूर्ण नसून गुडघ्याच्या

किंचित् वरपर्यंतच कोरलेली आहे. एकूण आकारप्रकारावरून ती नागाचीच मूर्ति आहे हें सहज ध्यानांत येतें.

अशा प्रकारचीं शेकडों मंदिरें ह्या भागांत पसरलेलीं आहेत. ह्या भागाला पूर्वी एकाम्रकानन किंवा स्वर्णाद्रि अशीं नांवें होतीं. ह्या ठिकाणीं बौद्ध, जैन, शैव, वैष्णव आणि गाणपत्य ह्या पांच पंथांचीं तीर्थस्थानें होतीं. येथील भग्नावशेषांवरून एके काळीं हा भाग चांगलाच भरभराटीस आलेला असावा असें वाटतें. चंड स्वभावाच्या क्रूर अशोकाला अहिंसेचा पाईक बनविण्याचें कार्य ज्या कलिंग देशानें केलें त्या देशाचा हा गाभाच होता असें म्हटलें तरी चालेल. जेथें तें विख्यात कलिंग युद्ध झालें तें स्थान येथून जवळच दया नदीच्या कांठीं आहे. त्या टेकडीला धौली असें म्हणतात. धौलीचे अशोकाचे शिलालेख प्रसिद्धच आहेत. एके काळीं गजबजलेला हा भाग आज पुन्हा भरभराटीस येऊं लागला आहे हें पाहून मनाला एक प्रकारचा संतोष वाटतो.

## पदार्थसंग्रहालय

भुवनेश्वर ही ओरिसाची नवी राजधानी आणि जुन्या वास्तूंचें आगर. तेव्हां येथील पदार्थसंग्रहालय प्रेक्षणीय असणार ह्याविषयीं प्रश्नच नव्हता. परंतु तें प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मात्र कांहींसा विरस झाला. ह्याचें कारण दिल्ली, मुंबई, मद्रास येथील मोठमोठीं पदार्थसंग्रहालयें ज्यानें पाहिलीं आहेत त्याला हें अगदींच सामान्य वाटेल, इतकें लहान आहे. एक दोन खोल्या आणि एक्दोन ओवऱ्या एवढीच जागा सध्या ह्या पदार्थसंग्रहालयाला मिळालेली आहे. अनेक मोठमोठ्या प्रस्तरमूर्ति तर रस्त्यावरच पडलेल्या आहेत.

परंतु जागेच्या लहानपणामुळें ह्या पदार्थसंग्रहालयाचें महत्त्व कमी होत नाहीं. येथें अनेक अद्भुत प्रतिमा आणि कलाकृति पाहावयास मिळतात. आपण देवांच्या स्त्रियांच्या मूर्ति नेहमीं पाहातों. परंतु दैत्यांना स्त्रिया होत्या, ह्या गोष्टीचा उल्लेख आपल्या वाचनांत फारसा येत नाहीं. येथें कांहीं दैत्यस्त्रियांच्या प्रतिमा पाहावयास मिळाल्या. अर्थात् त्यांना दैत्यस्त्रिया म्हणावयाचें कीं रणांगिणी स्त्रिया म्हणावयाचें

ह्याविषयीं मतभेद होऊं शकेल. परंतु त्यांचीं तीं भयंकर रूपें पाहून त्यांना देवस्त्रिया म्हणण्याची मात्र कोणाचीही छाती होणार नाहीं. येथील चांमुंडा देवीची मूर्ति तर इतकी भयंकर आहे कीं पाहून छातींत धडकीच भरावी. ह्या मूर्तीच्या अंगावर मांसाचा लवलेशही नाहीं. नुसता हाडांचा सांपळा आहे. विशेषतः तिच्या बरगड्या तर खरोखरीच्या बरगड्यांइतक्या स्पष्ट आणि उठावदार आहेत. चामुंडेची अशी मूर्ति अन्यत्र कोठेंच पाहावयास मिळत नाहीं असें म्हणतात. ह्या सर्व मूर्ति अगदीं अभंग स्थितींत आहेत. त्यांचा एकही अवयव खंडित झालेला नाहीं.

## आकर्षक प्रदर्शन

येथील मार्केटमध्यें एका लहानशा इमारतींत उत्कलचें समग्र सचित्र दर्शन घडविणारें लहानसें स्थायी प्रदर्शन आहे. उत्कलची खनिज संपत्ति, शिल्पकला, धरणें, आदिवासींच्या उन्नतीचें कार्य, वगैरे गोष्टी ह्यांत पाहावयास मिळतात. सरकारनें गेल्या आठ वर्षांत जनतेसाठीं काय काय केलें, हें थोड्या वेळांत लोकांना पटवून देण्यास हें प्रदर्शन फार उपयुक्त आहे. वरच्या मजल्यावर छोटेखानी सिनेमागृह आहे. तेथें आचार्य विनोबांच्या भूदान यात्रेचा लघुपट सरकारतर्फे दाखविण्यांत आला. त्यानंतर ओरिसांतील नृत्यें व वाद्यें ह्यांचें दर्शन घडविणारा एक अनुबोधपट दाखविण्यांत आला. तो तर फारच छान होता. त्यांत मुख्यतः डोंबारी, आदिवासी, निरनिराळ्या जत्रा व लोकनृत्यें ह्यांचेंच चित्रीकरण करण्यांत आलेलें आहे. उडीसाचें वैशिष्ट्य म्हणून ह्या अनुबोधपटाचा उल्लेख करतां येईल. ह्यांत सरकारी प्रचार मुळींच नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

## उदयगिरि आणि खंडगिरि

भुवनेश्वरच्या पश्चिमेस चार-पांच मैलांवर उदयगिरि आणि खंडगिरि नांवाच्या दोन टेकड्या असून त्यांवर कांहीं लहान-मोठीं लेणीं आहेत. सम्राट् खारवेलाच्या शिलालेखांत उदयगिरीला 'कुमारी पर्वत' असें नांव दिलेलें आहे आणि पतंजलीच्या महाभाष्यांत खंडगिरीला खंडिका म्हणून संबोधण्यांत आलेलें आहे. ह्या

टेकड्यांमध्यें जीं लेणीं कोरण्यांत आलेलीं आहेत, त्यांना जयविजय गुंफा, पणस ( फणस ) गुंफा, स्वर्गपुरी, हाथी गुंफा, गणेश गुंफा, राणी गुंफा, अनंत गुंफा, नवमुनि गुंफा, ललितेंदु केसरी गुंफा, वगैरे नांवें आहेत. हीं लेणीं जैनांचीं असून त्या पंथाच्या तीर्थंकरांच्या लहान लहान मूर्ति येथें आहेत. ज्यांनीं वेरूळ-अजिंठ्याचीं किंवा भाज्याचीं-कार्ल्याचीं लेणीं पाहिलीं आहेत त्यांना हीं लेणीं अगदींच सामान्य, खेळण्यांसारखीं वाटतात. परंतु ऐतिहासिक दृष्ट्या ह्या लेण्यांना फार महत्त्व आहे. खारवेल राजा इसवी सनापूर्वी पहिल्या-दुसऱ्या शतकांत राज्य करीत होता. तेव्हां-पासून इसवीसनाच्या अकराव्या शतकापर्यंतच्या कालखंडांत हीं लेणीं कोरलीं गेलीं आहेत. परंतु उत्कलमधील मंदिरांच्या मानानें हीं फार क्षुद्र वाटतात.

खारवेल हा जैन सम्राट् होता. अशोकानें कलिंगावर स्वारी करून लाखों जीवांची जी हत्या केली होती त्या अपमानाचें शल्य खारवेलाच्या मनांत डांचत होतें. त्यानें हळूहळू आपलें सामर्थ्य वाढविलें आणि अखेर शेवटीं मगधावर स्वारी करून भूतकाळांतील पराभवाचा डाग धुवून काढला. त्याच्या स्वारीची वार्ता कळतांच तेथील ग्रीक राजा डिमेट्रियल मथुरेला पळून गेला आणि मगध शरण आलें. आंध्र व तमिळनाडमधील राजांचीही अशीच विल्हेवाट लावून खारवेलानें पुन्हा एकदा मगधावर स्वारी केली आणि कोणा नंदवंशीय राजानें कलिंगमधून नेलेली जिनमूर्ति परत आणली. त्या वेळीं, त्यानें ,पाटलीपुत्राच्या राजमहालांतच, सुंग राजवाड्यांतच आपले हत्ती बांधले आणि अशा प्रकारें बौद्ध धर्माचा पराभव करून जैन धर्माची पुन्हा स्थापना केली. मात्र त्यानें ब्राह्मणांवर जुलूम केले नाहींत. आपल्या साऱ्या कर्तबगारीचा आलेख खारवेलानें हत्तीगुंफेमध्यें कोरून ठेवलेला आहे. उडिया जनतेला आपल्या भूतकालीन पराक्रमाचा पुरावा म्हणून हा शिलालेख प्राणाहून प्यारा वाटत असल्यास नवल नाहीं.

खंडगिरीवरून भुवनेश्वर शहराचा देखावा फार सुंदर दिसतो. तेथें जैनांनीं एक नवें मंदिर बांधलेलें असून त्यांत काळ्या संगमरवरी दगडाची दिगंबर मूर्ति आहे. तिच्यांत विशेष प्रेक्षणीय असें कांहीं नाहीं, परंतु ह्या देवळाचें आवार मोठें प्रशस्त व हवेशीर आहे.

# सा क्षी गो पा ल

## साक्ष द्यावयास गेलेल्या गोपालाचें देऊळ

पुरीहून कोणार्कला जातांना पुरीपासून दहा मैलांवर साखीगोपाल अथवा साक्षीगोपाल हें लहानसें गांव असून तेथें राधाकृष्णाचें देऊळ आहे. ह्यांतील वृंदावनाच्या गोपालाची काळ्या पाषाणाची मूर्ति फार सुंदर आहे. मुरलीधर कृष्णाच्या समोर डाव्या बाजूस राधेची मूर्ति आहे. परंतु तिला रूप वगैरे कांहीं नाहीं. ती अगदींच कळाहीन दिसते. ह्या कृष्णासंबंधींची कहाणी अशी आहे :

एकदा दोन वृद्ध ब्राह्मण वृंदावन वगैरे तीर्थक्षेत्रांची तीर्थयात्रा करावयास गेले. वृंदावनाला गेल्यानंतर त्यांपैकीं श्रीमंत असलेला ब्राह्मण आजारी पडला. तेव्हां दुसऱ्या गरीब ब्राह्मणानें त्याची खूप सेवाशुश्रूषा केली, त्यायोगें तो आजारांतून बरा झाला. पुढें तो हिंडूं-फिरूं लागल्यानंतर आपली सेवाशुश्रूषा करणाऱ्या मित्राला म्हणाला, "गड्या, तूं माझी सेवाशुश्रूषा केली नसतीस तर मी कांहीं ह्या आजारांतून वांचलों नसतों. तुझे हे उपकार कसे फेडावेत हेंच मला कळत नाहीं. तरीपण आपल्या दोघांचे संबंध अधिक दृढ व्हावेत म्हणून मी माझी मुलगी तुझ्या मुलाला देण्याचा निश्चय केला आहे." हें ऐकून त्या गरीब ब्राह्मणाला फार आनंद झाला. त्यांचें हें बोलणें वृंदावनाच्या देवळांत झालें. तेथें त्या वेळीं त्यांच्याखेरीज इतर पुष्कळ मंडळी होती. परंतु त्यांचें बोलणें कोणींच ऐकलें नाहीं. फक्त श्रीकृष्णाचेंच तिकडे लक्ष होतें.

कालांतरानें ते दोघे तीर्थयात्रा पूर्ण करून आपापल्या घरीं गेले. घरीं पोंचतांच श्रीमंत ब्राह्मणाची बुद्धि फिरली आणि तो आपल्या मुलीचें लग्न दुसऱ्या एका श्रीमंत ब्राह्मणाच्या मुलाशीं ठरवूं लागला. हें कळतांच

गरीब ब्राह्मणानें त्याची भेट घेऊन त्याच्या वचनाची त्याला आठवण करून दिली. परंतु श्रीमंत ब्राह्मणानें दोन्ही कानांवर हात ठेवले आणि आपण असें कधींच बोललों नव्हतों असें सांगितलें. तेव्हां गरीब ब्राह्मणानें त्याच्यावर फिर्याद ठोकली. फिर्याद सुरू झाल्यावर न्यायाधीशानें विचारलें, " तुझ्या म्हणण्याला पुरावा काय ? तुझ्या बाजूचा एखादा साक्षीदार आहे काय ? " त्यावर तो म्हणाला, " सरकार, आम्ही जेव्हां बोलत बसलों होतों तेव्हां इतर कुणाचंच आमच्याकडे लक्ष नव्हतं. ह्याला फक्त भगवान् कृष्णच साक्षी आहेत. " न्यायाधीशानें सांगितलें, " तर मग तूं भगवान् कृष्णाची साक्ष काढ. नाहींतर तुझं म्हणणं खरं आहे हें सिद्ध होणार नाहीं. "

त्या ब्राह्मणाला आपल्या सत्यवादित्वाचा आत्मविश्वास होता म्हणून तो परत वृंदावनाला गेला आणि अन्नपाणी न घेतां देवापुढें धरणें धरून बसला. " परमेश्वरा, माझ्या बाजूनें साक्ष द्यायला तूं चल. " प्रथम कांहीं दिवस कृष्णानें त्याला दाद दिली नाहीं. परंतु पुढें जेव्हां तो म्हातारा फुकट मरून जाणार असें दिसूं लागलें, तेव्हां त्यानें आकाशवाणी करून त्याला सांगितलें, कीं " हे माझ्या भक्तवरा, मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें आणि तुझ्या इच्छेप्रमाणें तुझ्या गांवीं साक्ष देण्यास यायला मी तयार आहें. मात्र एका अटीवर. तूं पुढें पुढें चालावयाचें नि मी मागून यावयाचें. परंतु तूं मागें वळून पाहातां कामा नये. ज्या ठिकाणीं तूं मागें वळून पाहाशील तेथेंच मी अदृश्य होईन. "

अशा प्रकारें ठराव झाल्यानंतर तो ब्राह्मण चालूं लागला व त्याच्या मागोमाग गोपाळही चालूं लागला. गोपाळाच्या पायांत घुंगूर असल्यामुळें तो आपल्या मागून येत आहे किंवा नाहीं हें त्या ब्राह्मणाला सहज कळत असे. म्हणून त्याला मागें वळून पाहाण्याचें प्रयोजन वाटलें नाहीं. पुढें एके ठिकाणीं नदीचें वाळवंट लागलें. तेथें येतांच कृष्णाच्या पायांतील घुंगूर रेतींत घुसल्यामुळें वाजण्याचें बंद झालें. तेव्हां भटजीबोवांना अशी शंका आली, कीं ह्या खट्याळ कान्ह्यानें बहुधा मागच्या मागेंच आपल्याला गुंगारा दिला असावा. म्हणून त्यानें मागें वळून पाहिलें. त्याबरोबर जिवंत कृष्ण अदृश्य झाला आणि त्या ठिकाणीं त्याची फक्त दगडी

मूर्ति उभी राहिली. इकडे वृंदावनांत श्रीकृष्ण न दिसल्यामुळें राधाराणी बेचैन झाली आणि तीही त्याच्या पावलाचा मागोवा घेत त्या ठिकाणीं येऊन पोंचली.

ह्याच गोष्टींत थोडासा फरक करून कांहीं लोक ती अशी सांगतात, कीं साक्ष देण्यासाठीं श्रीकृष्ण कांजीवरमला गेला आणि तेथेंच राहिला. पुढें पुरीच्या एका राजानें कांजीवरमच्या राजाला जिंकून तेथून गणेश आणि गोपाळ ह्या दोघांनाही आपल्याबरोबर नेलें. त्यांतील गणेशाला जगन्नाथाच्या मंदिरांत ठेवलें ( आजही हा काळ्या कुळकुळीत दगडाचा तुळतुळीत गणपति जगन्नाथाच्या मंदिरांत आहे. ) पण कुंजवनांत राहिलेल्या गोपाळाला गजबजलेल्या पुरी शहरांत चैन पडेना म्हणून तो येथील निवान्त जंगलांत येऊन राहिला.

## गोपबंधु दासांचें 'सत्यवादी' विद्यालय

आम्हांला वस्तुतः ह्या कृष्णाच्या देवळांत कांहीं रस नव्हता. आम्ही मुख्यतः येथील सुप्रसिद्ध सत्यवादी विद्यालय पाहाण्यासाठींच थांबलों होतों. सत्यवादी हें विद्यालयाचें विशेषण नसून तें साक्षीगोपाल गांवाचेंच दुसरें नांव आहे. बाहेरच्या लोकांना यात्रेच्या निमित्तानें साक्षीगोपाल हें नांव परिचित आहे तर स्थानिक जनतेमध्यें सत्यवादी हेंच नांव अधिक रूढ आहे. ह्यामुळें 'सत्यवादी दवाखाना', 'सत्यवादी पोलीसठाणें', वगैरे गमतीदार पाट्या येथें वाचावयास मिळतात.

कै. गोपबंधु दास हे आधुनिक उत्कलचे पिताच होत. त्यांनीं गांधीजींचें नेतृत्व पत्करून त्यांच्या तत्त्वांनुसार सबंध प्रांतांत जागृतीचें काम केलें. त्यांच्यानंतर त्यांचे सहकारी व शिष्य असे श्री. होताजी, आचार्य हरिहरदास, श्री. हरेकृष्ण मेहताब, श्री. गोपबंधु चौधरी, वगैरे सौम्य व सात्त्विक प्रवृत्तीचे लोक उत्कलचें नेतृत्व करूं लागले. ह्यामुळें वरच्या बाजूस दहशतवादी क्रांतिकारक बंगाल आणि खालच्या बाजूस अत्याचारी कम्युनिस्टांचा आंध्र असूनही ह्या प्रांतांतील जनता सनदशीर मार्गानेंच आपले प्रश्न सोडविण्याची श्रद्धा बाळगून राहिली.

ह्या गोपबंधु दासांनीं १९०८ च्या राष्ट्रीय चळवळींत ह्या ठिकाणीं राष्ट्रीय शिक्षणाची एक शाळा काढली. तिचें नांव सत्यवादी विद्यालय. ह्या विद्यालयाचें

वैशिष्ट्य असें, कीं येथील वर्ग उघड्यावर झाडांच्या गर्द छायेंत चालत असत. येथील जंगल किंवा कुंजवन फारच दाट आहे. वडाचीं व बकुळीचीं उंचउंच झाडें येथें आहेत. त्यांच्या गर्द व दाट छायेंत प्राचीनकालीन गुरुकुलांप्रमाणें वर्ग चालत. उन्हाचा त्रास तर होत नसेच पण मामुली पावसाचाही उपसर्ग पोंचत नसे. विद्यार्थ्यांना निसर्गाच्या निकट सान्निध्यांत तपस्वी गुरूकडून पवित्र ज्ञान मिळे. शिक्षकाकरितां वीट-चुन्याची खुर्ची आणि मेज तयार करून ठेवलेलें असे. सध्याही येथें तेंच विद्यालय चालू आहे. आम्ही गेलों त्या वेळेस शाळा सुटलेली होती, तरी पण मुलांचीं बाकें वगैरे सामान बाहेर उघड्या जागेंत झाडांच्या छायेमध्येंच होतें. त्यावरून ह्या शांतिनिकेतन पद्धतीच्या शाळेची थोडीशी कल्पना आली. परंतु सध्या ह्या विद्यालयांत कांहीं जीव उरलेला नाहीं, तें एक सामान्य सरकारी हायस्कूल झालेलें आहे आणि आचार्य हरिहरदास वगैरे जुनी मंडळी त्यांतून बाहेर पडली आहेत, असें कळलें.

अर्थात् सत्यवादी विद्यालयाचा संबंध तुटला तरी ह्या गांवाशीं ह्या राष्ट्रीय कार्यकर्त्यांचा संबंध आहेच. गोपबंधु दास ह्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्थापन करण्यांत आलेल्या ‘ गोपबंधु दरिद्रनारायण संघ ’ ह्या संस्थेचें मुख्य केंद्र ह्याच ठिकाणीं आहे. ह्या संघाच्या शाखा सर्व उत्कलप्रांतांत पसरलेल्या असून त्या जनजागृतीचें काम अव्याहतपणें करीत आहेत.

# उत्कलची जुनी राजधानी : कटक

## प्राचीन काळापासून मोक्याचें ठिकाण

भुवनेश्वराहून आम्ही रात्रीच्या गाडीनेंच येथें आलों. ह्या ठिकाणीं पाहाण्यासारखें कांहीं नाहीं असें लोकांनीं आम्हांला सांगितलें होतें आणि Orissa Review च्या Orissa Monuments Special मध्येंही आम्हांला कटकमध्यें कांहीं पाहाण्यासारखें आढळलें नव्हतें. ह्यामुळें आम्हीं ह्या शहराला अगदीं शेवटचा नंबर दिला. रात्रीं दहा वाजल्यानंतर धर्मशाळा बंद होतात म्हणून आम्ही घाई करून स्टेशनपासून दीड दोन मैल दूर असलेल्या शहरांत सायकल-रिक्षामधून गेलों. परंतु शहरांतील एकूण दोन धर्मशाळांपैकीं एकीची दुरुस्ती चालल्यामुळें ती बंद होती आणि दुसरी भरून गेल्यामुळें तिच्यांत जागा नव्हती. पूर्वबंगालमधून आलेले निर्वासित धर्मशाळेंतून व हॉटेलांतून भरल्याचें कळलें. दोनतीन हॉटेलांतही चौकशी केली, परंतु राहायला जागा मिळाली नाहीं. ह्यामुळें त्याच रिक्षांतून सामानासह परत स्टेशनावर गेलों व प्लॅटफॉर्मवर पडून राहिलों. सगळीं उठून सामान क्लोकरूममध्यें ठेवून शहरांत भटकण्यास गेलों.

उत्तरेस महानदी आणि दक्षिणेस तिचाच फाटा असलेली काठजुडी ह्या दोन नद्यांच्या बेळक्यांत वसलेल्या ह्या त्रिकोणाकृति शहराची लोकसंख्या जवळ जवळ एक लाख आहे. शहराचें क्षेत्रफळ सुमारें चार चौरस मैल आहे. ह्या शहरांत यावयाचें म्हणजे विस्तीर्ण महानदीचें रेताड पात्र किंवा काठजुडीचें लहान पात्र ओलांडावें लागतें. उत्तरेकडून दक्षिणेकडे अथवा दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणाऱ्यांना कटकजवळच महानदी पार करावी लागते. ह्या कारणानें कटक हें फार प्राचीन काळापासून मोक्याचें ठिकाण बनलेलें आहे. नंद आणि मौर्य ह्यांना कलिंग

देशावर स्वारी करतांना आणि खारवेलांना मगधावर स्वारी करतांना कटकजवळच महानदी ओलांडावी लागली असली पाहिजे असा इतिहासज्ञांचा अंदाज आहे. पावसाळ्यांत चार महिने महानदी आणि काठजुडी ह्या नद्यांचीं मैल-मैल रुंदीचीं विस्तीर्ण पात्रें पाण्यानें तुडुंब भरलेलीं असतात. ह्यामुळें त्या दिवसांत ह्या शहराचें शत्रूपासून आपोआपच संरक्षण होत असलें पाहिजे.

हा भाग अगदीं सपाट मैदानासारखा आहे आणि नदीचें पात्रही खोल नाहीं, ह्यामुळें दरवर्षी ह्या शहराला पुराची भीति असे. त्यांतून सुटका होण्यासाठीं काठजुडीच्या बाजूनें जांभ्या दगडांची एक तटबंदीवजा भक्कम भिंत बांधण्यांत आलेली आहे. इतका लांब व मजबूत बांध हिंदुस्थानांत इतरत्र पाहावयास मिळत नाहीं. ह्या भिंतीची उंची १७ फुटांपासून २६ फुटांपर्यंत आहे आणि रुंदी तळाशीं ५ ते ८ फूट व वरच्या भागांत ३ ते ४ फूट आहे. ह्या भिंतीचा आकार नालासारखा असून ती काठजुडी नदीवरील पुरी घाटापासून महानदीवरील जोबडा घाटापर्यंत पसरलेली आहे. बांधकाम ढासळूं नये ह्यासाठीं मध्यें मध्यें बुरुजासारखी रचना केलेली आहे आणि त्यामधून पाण्यापर्यंत जाण्यासाठीं पायऱ्या बांधलेल्या आहेत. पाण्याजवळ गेल्यानंतर तेथें घाट बांधलेला आहे, परंतु नदींत पाणी नांवापुरतेंच आहे. पुराच्या भीतीमुळें नदीला जे कालवे काढलेले आहेत त्या कालव्यांतून मात्र पाणी भरपूर असतें आणि त्यांतून लहान लहान होड्या व नावा चालत असतात.

आम्हांला कोणींतरी सांगितलें, कीं मराठ्यांनीं ह्या नदीला घाट बांधलेला आहे. म्हणून आम्ही मुद्दाम तेथें जाऊन स्नान करून आलों. पण नंतर समजलें, कीं ही भिंत आणि घाट वगैरे इसवी सनाच्या दहाव्या शतकांतच बांधले गेले असावेत असा विद्वानांचा अंदाज आहे. ह्या बाबतींत अजून निश्चित असा ऐतिहासिक पुरावा मिळालेला नाहीं. कांहीं लोकांच्या मतें हा तट तेराव्या शतकाच्या प्रारंभीं तिसऱ्या अनंगभीमदेवाच्या काळीं बांधण्यांत आला असावा.

## कटक म्हणजे 'लष्करी शिबिर'

कटक ह्या संस्कृत शब्दाचे निरनिराळे सात अर्थ असले तरी त्यांपैकीं दोनच अर्थ येथें लागू पडतात. ( १ ) लष्करी शिबिर आणि ( २ ) लष्करानें संरक्षिलेल्या सरकारचा किल्ला अथवा राजधानी. ह्याचा अर्थ प्राचीन काळापासून ही ओडिसाची राजधानी होती.

१७५१ सालीं मराठ्यांचा कटकशीं संबंध आला. त्या वेळीं बंगालचा सुभेदार अलीवर्दीखान ह्याची सत्ता ओडिसा प्रांतावर चालत होती. त्याच्यावर नागपूरकर भोसल्यांनीं स्वाऱ्या करून त्याला जेरीस आणलें. त्यामुळें त्यानें १७५१ सालीं मराठ्यांशीं तह करून त्यांचें ओडिसावरील सार्वभौमत्व जवळ जवळ मान्य केलें. परंतु तहांतील अटी पाळण्याची त्यानें टाळाटाळ केल्यामुळें भोसल्यांनीं इ. स. १७५३ सालीं ओडिसावर जोरदार चढाई करून मुसलमानांना ओडिसांतून हाकलून दिलें. तेव्हांपासून १८०३ पर्यंत म्हणजे इंग्रजांची सत्ता प्रांतांत प्रस्थापित होईपर्यंत येथें मराठ्यांचेंच राज्य होतें. त्यांच्याबरोबर आलेलीं कांहीं महाराष्ट्रीय घराणीं येथील जनतेंत एकरूप होऊन गेलेलीं आहेत. ओडिया भाषेंतील पहिल्या तीन कवींमध्यें ज्यांची गणना होते असे श्री. मधुसूदनराव हे महाराष्ट्रीयच होते, हें ज्या वेळीं मला समजलें, तेव्हां आजच्या कानडी भाषेंतील कवि श्री. बेंद्रे ह्यांची मला आठवण झाली.

मराठ्यांनीं बांधलेला किल्ला, घोड्याच्या पागा, वगैरे गोष्टी येथें आहेत असें समजलें होतें, परंतु तें सर्व पाहाण्याइतका उत्साह उरलेला नसल्यामुळें नुसतें शहरांतून फेरफटका मारण्यावरच समाधान मानलें. कूर्गप्रांत सोडल्यास इतका लहान प्रांत हिंदुस्थानांत दुसरा नसेल. आसामचा कांहीं भाग आतां पाकिस्तानांत गेल्यामुळें तो ओडिसाहूनही लहान प्रांत बनलेला आहे. अर्थात् त्याच्या भौगोलिक परिस्थितीमुळें त्याला जास्त महत्त्व आहे.

त्यामुळें ह्याची राजधानीही सर्व प्रांतीय राजधान्यांहून लहान असणें स्वाभाविकच आहे. पण ह्या शहरांत राजधानीचा भव्यपणा असा कांहीं आढळला नाहीं. थोडेंसें

बेळगांवच्या पद्धतीचें हें शहर वाटलें. दुमजली तिमजली घरें जवळ जवळ नाहींतच. गवताचीं छप्परें असलेलीं घरेंही ह्या राजधानींत आहेत. स्टेशनाजवळची वस्ती आणि मुख्य शहर ह्यांत सुमारें मैलभराचें अंतर आहे. जेथें वस्ती आहे तेथें ती खूप दाट आहे. ह्यामुळें अस्वच्छता भरपूर आहे.

रविवार असल्यामुळें बरींचशीं दुकानें बंद होतीं. परंतु एकूण बाजारपेठ अगदीं सामान्य वाटली. हॉटेलें अस्वच्छ आहेत. पुण्यामुंबईसारखीं स्वच्छ हॉटेलें व खाणावळी बहुतेक कोठेंच आढळत नाहींत. इकडे चहाचें प्रमाण इतर प्रांतांप्रमाणेंच पुष्कळ आहे, परंतु चांगल्या हॉटेलांचें दर्शन मात्र होत नाहीं. त्यांतल्या त्यांत मद्रासी लोकांचीं उपाहारगृहें बरीं वाटलीं.

## आम्ही जातों अमुच्या गांवा

थोडा वेळ गांवांत भटकून, इडली, दोशे, उपमा, रसगुल्ले, गुलाबजाम, मीठा, वगैरे पदार्थांचा फराळ करून आम्ही परत स्टेशनवर आलों. येथून आम्हांला खुर्दारोडला जावयाचें होतें. कारण खुर्दारोड जंक्शन हें ह्या भागांतील रेल्वेचें मुख्य ऑफिस आहे. सर्वोदय समाज ही अखिल भारतीय स्वरूपाची सांस्कृतिक संस्था असल्यामुळें तिच्या संमेलनासाठीं जाणाऱ्यांना रेल्वेच्या भाड्यांत सवलत मिळते. त्यासाठीं केलेले आमचे अर्ज मंजूरही झाले होते. म्हणून आम्हांला खुर्दारोडला जाऊन तिकीट काढावें लागलें. खुर्दारोडपासून पुण्याला जायला तीन मार्ग आहेत. एक खुर्दारोड-कटक-खडगपूर-नागपूर-कल्याण-पुणें. म्हणजे खडगपूरपर्यंत एका गाडीनें जावयाचें, तेथें कलकत्त्याहून नागपूरमार्गें मुंबईला जाणारी गाडी पकडावयाची आणि ती कल्याणला बदलावयाची. ह्या मार्गाचें अंतर सर्वांत जास्त म्हणजे १४६० मैल पडतें. परंतु दगदगीच्या दृष्टीनें हा सर्वांत अधिक सोयीचा व कमी वेळाचा आहे. दुसरा मार्ग खुर्दारोड-विजयानगरम्-रायपूर-नागपूर-कल्याण-पुणें. ह्या मार्गाचें अंतर १३१७ मैल आहे. परंतु तो अधिक दगदगीचा आहे. विजयानगरम्, रायपूर व कल्याण ह्या तीन ठिकाणीं गाडी बदलावी लागते. ह्यानें वेळही पहिल्या मार्गापेक्षां जास्त लागतो. तिसरा मार्ग खुर्दारोड-बेझवाडा-सिकंदराबाद-वाडी-पुणें.

ह्या मार्गानें पुणें सर्वांत जवळ म्हणजे १२५३ मैल आहे. परंतु हा सर्वांत अधिक दगदगीचा आणि जास्त वेळ लावणारा आहे. परंतु सवलतीच्या नियमांत 'सर्वांत जवळचा मार्ग' असे शब्द असल्यामुळें आम्हांला ह्याच मार्गाचें तिकिट मिळालें.

## हिंदुस्थानांतील सर्वांत मोठें सरोवर 'चिलिका'

ह्या मार्गानें येण्यांत आम्हांला दगदग झाली खरी, परंतु एक फायदाही झाला. तो म्हणजे आम्हांला हिंदुस्थानांतील सर्वांत मोठें सरोवर पाहावयास मिळालें. ह्या सरोवराचें नांव चिलिका. इंग्रजी शुद्धलेखनामुळें ह्याचा उच्चार कांहीं लोक चिल्का असाही करतात. ह्या सरोवराचें क्षेत्रफळ चारशें चौरस मैल आहे आणि त्याच्या कांठाकांठानें बऱ्याच लांबपर्यंत गाडी जाते, ह्यामुळें गाडींतूनही तें पाहावयास मिळतें. हें सरोवर अगदीं समुद्राकांठीं असल्यामुळें भरतीच्या वेळीं त्यांत समुद्राचें पाणी घुसतें. अशा प्रकारें हें सबंध सरोवर खाऱ्या पाण्याचें झालेलें आहे. त्यामुळें येथें खूप मोठमोठीं मिठागरें आहेत आणि जलमार्गाच्या दृष्टीनेंही ह्याचा उपयोग होतो. वसंत ऋतूमध्यें ह्या सरोवरांतील मासे पकडण्यासाठीं लहानमोठे, रंगीबेरंगी पक्षी येतात ते पाहाण्यासारखे असतात. सुटी घालविण्यासही हें फार रम्य ठिकाण आहे. कलकत्ता-मद्रास ह्या मुख्य रेल्वेवर हें असल्यामुळें कलकत्त्याचे बरेच लोक येथें येत असतात.

## स्वभावांतील फरक

थोडक्याच वेळानें आम्ही उत्कल प्रदेश मागें टाकून आंध्र प्रांतांत शिरलों आणि आपण दुसऱ्या प्रांतांत प्रवेश केल्याचें मोठ्या चमत्कारिक मार्गानें माझ्या लक्षांत आलें. एक तर आंध्रांत प्रवेश केल्यानंतर लोकांची गर्दी व भांडकुदळ बडबड सुरू झालीच होती. उत्कलमध्यें प्रवास करतांना गर्दी झाली तरी गोंगाट होत नसे. विनाकारण बडबड व भांडणें करण्याची सवय ओडिया लोकांत दिसली नाहीं. आंध्र-कर्नाटकांत ती फारच आढळते. कदाचित् भाषेच्या राकटपणामुळें तसा भास होत असावा.

दुसरी गोष्ट म्हणजे गाडीनें आंध्र प्रांतांत प्रवेश करतांच माझ्या वहाणा चोरीस गेल्या. त्या जुन्याच असल्यामुळें फारसें दुःख झालें नाहीं; परंतु दोन

प्रांतांच्या स्वभावांतील फरक चटकन् जाणवला. आम्ही सुमारें दहा दिवस उत्कलमध्यें होतों. परंतु त्या अवधींत आमची एकही वस्तु चोरीस गेली नाहीं. अनुगुलला राहाण्याच्या झोपडीपासून सभेची जागा खूप दूर होती आणि आमच्या झोपडीला तर दारही नव्हतें. कपडे, वाहाणा, पुस्तकें, भांडीं, अंथरूण-पांघरूण सगळें उघड्यावर पडलेलें असे, पण त्यांतल्या एकाही वस्तूला कोणीं हात लावला नाहीं. झोपड्यांच्या जवळूनच कामावर जाणाऱ्या-येणाऱ्या मजुरांचा रस्ता होता. परंतु त्यांनीं कधींही वाकडें पाऊल टाकलें नाहीं. बरें त्या ठिकाणीं पहारा होता असेंही नाहीं. सर्वत्र शुकशुकाट व निर्मनुष्यता असे. तरीही चोरी झाली नाहीं. पुढें पुरी, कटक, वगैरे ठिकाणीं राहाण्याचा प्रसंग आला, पण तेथेंही चोरी झाली नाहीं. संमेलन संपल्यानंतर सर्वांनाच ह्या गोष्टीचें नवल वाटलें. आंध्रांत प्रवेश करतांच माझ्या वाहाणा चोरीस गेल्या हें पाहातांच मला धक्का बसला आणि मी जरा जपून वागूं लागलों !

## पुनरागमनाय च !

आम्ही बेझवाड्याला दोन तास उशीरां म्हणजे रात्रीं साडेसात वाजतां पोंचलों, ह्यामुळें एक गाडी चुकली. तेथून रात्रीं साडेअकरा वाजतां निघून दुसऱ्या दिवशीं दुपारीं साडेअकराच्या सुमारास सिकंदराबादला पोंचलों. वस्तुतः आम्ही वाडी-( शाहाबादवाडी ) च्या गाडींत बसलों होतों, ह्यामुळें ती गाडी शाहाबाद-वाडीला जायला पाहिजे होती. परंतु सिकंदराबादला गाडी दोन-तीन तास उशिरां पोंचली. ह्यामुळें वाडीला दुसरीच एक गाडी पूर्वीच निघून गेली होती. तेव्हां अर्थातच आम्हांला सिकंदराबादला उतरावें लागलें. कारण आमची गाडी रद्द झाल्याचें आम्हांला सांगण्यांत आलें. अशा प्रकारें सबंध गाडी रद्द झाल्याचा हा पहिलाच अनुभव आम्हांला निजामींत आला.

सिकंदराबादला थेट मुंबईला जाणारा एक डबा जोडलेला असतो. त्यांत जागा मिळवून आम्ही वरच्या बाजूस ताणून दिली आणि सकाळीं दहाच्या सुमारास पुण्यास आलों. सुमारें वीस दिवसांच्या दगदगीच्या प्रवासानंतर पुण्याच्या जमिनीवर पाय ठेवतांना सहजच आमच्या मुखांतून एक सुटकेचा निःश्वास सुटला.

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
क्रमांक ...

# भारताच्या पूर्व किनाऱ्यावर

## अनुगुल

हें गांव अगदींच आडवाटेवर आहे. मुंबई-कलकत्ता रेल्वेच्या मुख्य रस्त्यावर मुंबईपासून ९०३ मैलांवर झारसुगुडा हें स्टेशन आहे. झारसुगुडा ते संबलपूर हें अंतर २९ मैल असून तेवढाच रेल्वेचा फाटा आहे. संबलपूरपासून अनुगुल शंभर मैल आहे आणि हा मोटाररस्ता आहे. रेल्वेची सोय नाहीं.

झारसुगुडा स्टेशन येण्यापूर्वींच उत्कलचा (ओरिसाचा) प्रदेश सुरू होतो. परंतु रायपूर-बिलासपूर हा मध्यप्रदेशांतील भाग केव्हां संपला आणि ओरिसा केव्हां सुरू झाला हें कळतच नाहीं. महाराष्ट्र केव्हां संपतो नि मध्यप्रदेश केव्हां सुरू होतो हें तरी आपल्याला कोठें कळतें ? अर्थात् महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश ह्यांच्या सरहद्दीवर एकच भाषा – मराठी – असल्यामुळें ही सरहद्द कृत्रिम आहे हें सहज लक्षांत येतें. परंतु उत्कल आणि मध्यप्रदेश ह्यांच्या भाषा भिन्न असल्या तरी भाषा बदलतांच निसर्ग बदलत नसल्यामुळें एक प्रांत कोठें संपतो नि दुसरा कोठें सुरू होतो, ह्याची कांहींच कल्पना येत नाहीं. गाडीमध्यें हिंदीचेंच प्रभुत्व असल्यामुळें उत्कलचें अस्तित्व सहजासहजीं जाणवत नाहीं.

## पूर्वेकडील कोंकणच

ह्या प्रांतांत आल्यापासून आपण पुन्हा महाराष्ट्राच्या कोंकणपट्टींत किंवा गोव्यांतच आलों आहोंत :असें वाटतें. सर्वत्र तांबडी-पिवळी माती पसरलेली दिसते. काळी माती पाहायलाही मिळत नाहीं. मुख्य उत्पन्न भाताचें. त्याच्या खालोखाल कडधान्येंही होतात. सुमारें साठ लाख एकर जमिनींत भात पिकतें. ह्यामुळें लोकांचें

मुख्य अन्न तांदूळ हेंच आहे. कोंकणांतील माती अगदीं लालभडक असते, तेथें डोंगरही भरपूर आहेत. किंबहुना समुद्रसपाटीचा प्रदेश फार थोडा आहे. समुद्राला लागूनच पश्चिम घाट आहे. ह्यामुळें प्रदेश खडकाळ व कमी सुपीक आहे. ओडिसामध्यें ह्याच्या उलट स्थिति आहे. समुद्रापासून खूप आंतपर्यंत सपाट प्रदेश आहे. लहानमोठे डोंगर असले तरी त्यांची रांग नाहीं आणि किनाऱ्याजवळ तर डोंगर आढळतच नाहीं. मातीचा रंग पांढरट किंवा पिवळट आहे आणि तिच्यांत रेतीचा अंश आहे. दगड गोव्याप्रमाणें जांभा आहे. कोंकणाच्या मानानें जमीन खूपच सुपीक आहे. फार थोड्या परिश्रमांत भरपूर पीक हातीं येतें. पाऊस भरपूर पडतो ह्यामुळें दुष्काळाची भीति ह्या प्रांताला जवळ जवळ नाहींच. आणि म्हणूनच ह्या भागांतील लोक अत्यंत अल्पसंतुष्ट, उद्योगाची आवड नसलेले, आळशी परंतु कमालीचे श्रद्धाळु आहेत. कोंकणच्या शेतकऱ्याला जगण्यासाठीं निसर्गाशीं लढत राहावें लागल्यामुळें तो काटक, उद्योगी, धडपड्या व बुद्धिनिष्ठ झाला आहे. येथें त्याच्या अगदीं उलट स्थिति आहे. ह्या बाबतींत येथील लोकांची तुलना गोव्यांतील हिंदु लोकांशीं करतां येण्यासारखी आहे.

भाताखेरीज आंबा, फणस, काजू, नारळ, केळीं, वगैरे फळझाडें आणि बांबू ह्यांचीही कोंकणांतल्याप्रमाणेंच येथें रेलचेल आहे. येथील आंब्यांचीं झाडें इतकीं उंच, मोठीं व दाट आहेत, कीं दिवसभर सभेचें काम त्यांच्या सावलींतच चालतें. एक मोठा सभामंडप उभारण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता, परंतु निसर्गाला आपल्या छायेचें सुख आम्हांला देण्याची इच्छा झाली आणि तो मंडप तयार होत असतांच कोसळला. त्यामुळें आपोआपच शांतिनिकेतन पद्धतीनें आमचें काम आम्रवृक्षांच्या छायेंत चालूं लागलें.

येथील घरें गोव्यांतल्याप्रमाणेंच बाहेरून लालमातीनें सारवलेलीं असतात. वर गवताचें छप्पर असतें. कौलें सहसा आढळत नाहींत. सरकारी इमारती आणि श्रीमंत लोकांचे बंगले ह्यांच्यावर मंगलोरी कौलें दिसतात. शहरांतून मात्र पत्रे व मंगलोरी कौलें ह्यांचा वापर सर्रास आढळतो. घराच्या आसपास चांगली स्वच्छता असते.

## कोट-टोपीचें दर्शन नाहीं

ह्या भागांत आल्यापासून कोट व टोपी मात्र पाहायलाही मिळाली नाहीं. बहुतेक सर्वजण कमरेला एक पंचा व अंगावर एक पंचा ह्याच वेषांत आढळतात. त्यांतही पुन्हा खालच्या वर्गांतील लोक फक्त कमरेला पंचा गुंडाळतात. अंगावर कांहीं घेत नाहींत. कांहीं थोडे सरकारी अधिकारी व पोलीसचे लोक हाफपँट, सदरा व क्वचित् प्रसंगीं कोट घातलेले दिसतात. परंतु त्यांच्यांतही टोपीला स्थानच नाहीं.

कोंकणांतील लोकांमध्यें डोक्यावर गायीच्या पावलाएवढा घेरा ठेवण्याची पद्धत आहे, ती मात्र इकडे अजिबात दिसली नाहीं. सर्वच लोकांचे केस नवीन पद्धतीप्रमाणें वाढविलेले व कापलेले दिसतात. पुण्या-मुंबईकडे बहुतेक तरुणांचे केस पांढरे होऊं लागले आहेत. तसें मात्र इकडे नाहीं. बहुतेकांचे केस काळेभोर आणि तुळतुळीत आहेत.

## पानतंबाखूचा षोक

आमच्या संमेलनांत ओरिसाचे कांहीं मंत्रि उपस्थित होते. त्यांच्यापैकीं बहुतेक जणांचीं तोंडें अष्टौप्रहर पानतंबाखूनें भरलेलीं असत.

" हे एवढे मोठे मंत्री पण व्यासपीठावर बसून पान चघळत असतात, हें कांहीं बरं नाहीं. " माझा एक सोवळा गांधीवादी मित्र म्हणाला. परंतु मला मात्र त्यांत आक्षेपार्ह असें कांहीं वाटलें नाहीं. कारण पान खाणें ही एक चांगली गोष्ट आहे असें मी मानतों. शिवाय इकडे पान खाण्याची प्रथा इतकी अधिक आहे कीं तिला शिष्टमान्यता मिळालेली आहे. गोव्यांत किंवा कोंकणांत पानाचा प्रसार इतका आढळत नाहीं. खालीं मंगळूरकडे मात्र पान खूप खाल्लें जातें.

## रूप-सौंदर्याचा तुटवडा

कां, कोण जाणे, पण इकडील लोकांमध्यें रूप-सौंदर्य मात्र मुळींच दिसत नाहीं. तसें कांहीं खास शारीरिक व्यंगही दाखवितां येणार नाहीं. एकेक अवयव घेतल्यास त्यांत कांहीं दोष काढतां येणार नाहीं. परंतु एकूण चेहेऱ्याकडे पाहिल्यास तो रूपहीन व भावनाहीन दिसतो. ह्याचा अर्थ येथील लोक कुरूप आहेत असा

मुळींच नाहीं. गालाचीं हाडें किंचित् वर आलेलीं असतात, एवढाच काय तो दोष म्हणतां येईल, पण तींही सर्वांचीं आणि फार वर आलेलीं असत नाहींत. डोळे बारीक नाहींत. नाक नकटें नाहीं. कपाळ अरुंद नाहीं, रंग काळा ठिक्कर नाहीं, किंबहुना पुष्कळ उजळच आहे, तरी पण चेहेऱ्यांत आकर्षकपणा नाहीं. ह्याचें कारण शोधण्याचा प्रयत्न केला, पण कांहीं मार्ग सापडला नाहीं. येथील लोकांच्या मानानें आंध्रवासी खूपच काळे आहेत, परंतु त्यांच्या चेहेऱ्यांवर तरतरी, उत्साह, जिवंतपणा आढळतो. येथील गौरवर्ण लोकही सुंदर दिसत नाहींत. कोणी म्हणतात, येथील लोक हे आदिवासी, आर्य, द्रविड, वगैरे अनेक जातींच्या मिश्रणापासून झालेले आहेत, त्यामुळें त्यांच्यांत रूप नाहीं. तर कांहीं लोकांच्या मतें येथील लोकांना आपल्या रूपाची जोपासना करण्याची बुद्धि नसल्यामुळें ते रूपहीन दिसतात. स्त्रियांच्या बाबतींत हें म्हणणें कांहीं अंशीं खरेंही असण्याची शक्यता आहे, कारण आपल्या नैसर्गिक सौंदर्याला बाह्य प्रसाधनांची जोड देऊन तें जास्त आकर्षक करण्याची कला येथील स्त्रियांमध्यें नसावीच असें वाटतें. ह्यामुळें थोडा फार सुंदर चेहेरा असूनही त्याची आबाळ झाल्यामुळें त्याच्या ठिकाणचें सौंदर्य लोपल्याचींही उदाहरणें आढळतात.

अर्थात् हें विवेचन अगदीं उच्चवर्णीयांना लागू पडणार नाहीं. परंतु पांढरपेशे, मध्यम वर्ग व कनिष्ठ वर्ग ह्यांची स्थिति अशी दिसते खरी. असाच कांहींसा अनुभव बिहारी स्त्री-पुरुषांच्या बाबतींतही आला आहे. परंतु त्याचेंही कारण कळलें नाहीं.

## उडिया भाषेचें मराठीशीं साम्य

झारसुगुडा स्टेशनवर संबलपूरच्या गाडींत झोपलों असतां पहाटेच्या वेळीं कानीं शब्द पडले, ' उठून बोसा, उठून बोसा. ' मी मनांत म्हणालों, ' ह्या उत्कल प्रांतांत मराठी बोलणारे लोक कुठून आले ? ' मान वर करून पाहिलें तो स्थानीय रहिवाश्यांची गर्दी डब्यांत घुसून निजलेल्या लोकांना उठवीत होती. त्यांच्या बोलण्यांतील कांहीं कांहीं शब्द परिचित वाटले. माझी बंगाली भाषेशीं तोंडओळख झालेली असल्यामुळें त्या लोकांचें बोलणें आपल्याला कळतें असा भास होत होता. परंतु वस्तुतः फारसें कळत नव्हतें. आतां त्या भाषेचा

थोडाफार परिचय करून घेतल्यानंतर तसें कां वाटलें ह्याचा उलगडा होत आहे. उडिया भाषेवर सर्वांत जास्त पगडा बंगालीचा आहे. मुख्यतः बोलण्याची धाटणी बंगाली आहे. 'अ' चा उच्चार 'ओ' करण्यांत येतो. 'कण' लिहितील पण 'कोण' वाचतील. परंतु बंगाल्यांप्रमाणें सर्वच्या सर्व वाक्य तोंडांतल्या तोंडांत बोलत नाहींत. ह्यामुळें उडिया ही ऐकायला गोव्यांतील कोंकणीसारखी वाटते. बंगाली भाषा वाचतां आली तरी बंगाली लोक बोलत असतां तें समजण्यास त्रास पडतो. ती: स्थिति उडियाच्या बाबतींत होत नाहीं. उडियाभाषी लोक आपआपसांत बोलत असल्यास ते काय बोलतात ह्याचा सर्वसामान्य अंदाज मराठी माणसाला येऊं शकतो. मराठीचें साधर्म्य 'ण' आणि 'ळ' ह्या अक्षरांच्या द्वारें व्यक्त होतें. उत्तर भारतांतील भाषांत 'ळ' हें अक्षर आढळत नाहीं. त्याऐवजीं 'ल' चा उपयोग केला जातो आणि 'ण' च्या ऐवजीं 'न' चा प्रसार आहे. परंतु उडिया भाषेंत 'ळ' चा खूप भरणा आहे. इतका, कीं पुष्कळ वेळां 'ल' च्या ऐवजीं 'ळ' च वापरला जातो. उदाहरणार्थ, 'ललिता', 'उत्कळ', असेंही बोलले जातें.

'आणणें', 'खाणें', 'करणें', 'घेणें', 'बसणें', 'जाणें', 'उठणें', 'चढणें' वगैरे आपलीं मराठी क्रियापदें उडिया भाषेंतही आहेत. अर्थात् हीं व असलीं बरींचशीं क्रियापदें इतरही भाषांतून आढळतातच. परंतु 'ण' च्या प्रयोगामुळें तीं आपल्याला जास्त परिचित वाटतात. कांहीं कांहीं क्रियापदांच्या रूपांवर संस्कृतची छाप आहे. उदाहरणार्थ, 'आपण अछन्ति' (आपण आहांत), 'आपण ए बहि पढन्तु' (तुम्ही हें पुस्तक वाचा), 'ए थर चलन्तु ?' (ह्या खेपेस येणार ?), वगैरे. ह्यामुळेंही ही भाषा आपल्याला विशेष जवळची वाटते. संस्कृत व अरबी-फारसी शब्द तर पुष्कळच समान आहेत. पण हें कांहीं ह्याच भाषेचें वैशिष्ट्य नव्हे. भूतकाळाचें रूप मराठीला जरा जवळचें वाटतें. उदाहरणार्थ, 'से खाईला' (त्यानें खाल्लें), 'मूँ जाउथिल किन्तु मो मामूँ आसि पहुँचिले' (मी जाणार होतों परंतु माझे मामा येऊन पोंचले), 'एहा तुसंकू केइ कहिल ?' (हें तुम्हांला कोणीं सांगितलें ?), वगैरे.

उडिया लिपि नागरीचाच एक प्रकार असल्यामुळें ती फार त्वकर शिकतां येते. ज्यांना बंगाली लिपीची ओळख आहे, त्यांना तर ती मुळींच अवघड वाटणार नाहीं. ज्याप्रमाणें कानडी अक्षरांवर अशा ✓ खुणा केल्या कीं तेलुगु लिपि बनते त्याचप्रमाणें नागरी अक्षरांवर ∩ (मडकें झाकल्याप्रमाणें) अशी खूण केली कीं उडिया लिपि बनते. ही किल्ली हातीं लागली कीं लिपि उलगडूं लागते. ह्या लिपींतील सर्वांत सोपें अक्षर ठ आहे. एक पोकळ व गोल टिंब काढलें ( ० ) कीं झालें ठ. ह्यालाच वर थोडी रेघ दिली कीं मराठी 'ठ' होतें.

इतकी सोपी लिपि व सोपी भाषा असूनही ह्या प्रांतांत शिक्षणाचा व साहित्याचा प्रसार फार थोडा आहे. सुमारें सव्वा कोटि लोकसंख्येच्या ह्या प्रांतांत एकूण पांच दैनिकें आहेत. त्यांपैकीं 'समाज', 'प्रजातंत्र' व 'आशा' हीं तीन उडिया भाषेंतील असून दोन इंग्रजी आहेत. नांव घेण्यासारखीं उडिया मासिकें तीनच आहेत. तीं म्हणजे 'झंकार', 'डगर' आणि 'निया खुँटा'. पाक्षिकें व साप्ताहिकेंही अगदीं हाताच्या बोटांवर मोजतां येण्यासारखीं आहेत. ह्याचें मुख्य कारण लोकांमधील लिहिण्या-वाचण्यासंबंधींचा कंटाळा हेंच होय. कारण जरी सव्वा कोटि लोकांमध्यें पस्तीस लाख लोक आदिवासी असले तरी येथील साक्षरतेचें प्रमाण १३.२ म्हणजे इतर प्रांतांप्रमाणेंच आहे.

वर्तमानपत्रांप्रमाणेंच साहित्याची स्थिति आहे. कालिंदीचरण पाणिग्राही, गोदावरीश मिश्र, राजकिशोर राय व फकीर मोहन सेनापति, वगैरे कथालेखक, अश्विनीकुमार घोषसारखे नाटककार, डॉक्टर मायाधर मानसिंह व सची राउतराय ह्यांच्यासारखे कवि आज उडिया भाषेंत आहेत. परंतु लोकांमध्यें वाचनाचीच गोडी नसल्यामुळें साहित्यनिर्मिति फार थोड्या प्रमाणांत होते. त्यांतल्या त्यांत कथासाहित्य विशेष वाचलें जातें असें कळतें.

## उदरभरण नुहें जाण ए यज्ज्यकर्म

परप्रांतांत मराठी बोली ऐकायला मिळाली, कीं अगदीं पुत्रप्राप्तीचा आनंद होतो. आचार्य विनोबा भावे ह्यांचा एक मराठी श्लोक आश्रम-प्रार्थनेच्या द्वारें असाच सर्व

देशभर पसरला आहे. परप्रांतीय लोक आपल्या मोडक्या तोडक्या उच्चारांत तो म्हणूं लागले, म्हणजे माझ्यासारख्या मराठीप्रेमी व्यक्तीची छाती उगीचच आनंदानें फुलल्यासारखी होते. हा श्लोक पुढीलप्रमाणें आहे :

अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन
सर्वधर्मीं समानत्व स्वदेशी स्पर्शभावना
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें ॥

ह्या श्लोकांत शेवटींच थोडासा मराठीचा संबंध येतो. परंतु श्लोक मराठीचा आहे हें कांहीं कोणाला नाकारतां येणार नाहीं.

येथें ( सर्वोदय संमेलनांत ) जेवणापूर्वी ‘ सहनाववतु ’ ह्या संस्कृत मंत्राऐवजीं उडिया भाषेंतील श्लोक म्हटला जातो. हा श्लोक दुसरा तिसरा कोणताही नसून आपल्याकडे म्हटल्या जाणाऱ्या ‘ वदनिं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें ’ ह्या श्लोकाचा मुक्त अनुवादच आहे. तो सबंध श्लोक असा :

घेनिबा आगरू **मु**खे **स**दा मो नित्य भक्ख ।
घेनिबि सतत **म**ने **ह**रि हे दया रख ॥
जीवन शकति दाता अन्न हीं पूर्ण ब्रह्म ।
उदर भरण **नु**हें जाण ए यज्जकर्म ॥

( जाड अक्षरांचे उच्चार दीर्घ करावयाचे म्हणजे मात्रा पूर्ण होतात. )

हा श्लोक सामुदायिक रीत्या म्हटला गेला असतां कानाला फार गोड लागतो. आणि त्यांत तल्लीन झाल्यामुळें आपण मराठीच श्लोक ऐकत आहोंत असा भास होतो.

उत्कलचें मुख्य जेवण गोव्यांतल्याप्रमाणें भात व मासळी आहे. परंतु आम्ही आश्रमीय पाहुणे असल्यामुळें येथें मांसमासळीला स्थान नाहीं आणि आमच्यासाठीं म्हणून गहूंही मागविण्यांत आला आहे. त्यामुळें मागला–पुढला भरपूर भात आणि मध्यें पोळी असें महाराष्ट्रीय जेवणच आम्हांला मिळत आहे.

भाजी व आमटी असतेच. चटणी मात्र नसते. त्याऐवजीं हिरवी मिरची दिली जाते. सर्व जेवण अळणी असल्यामुळें अधून-मधून मिरची तोंडीं लावण्याची इच्छा होतेच.

सकाळीं नाश्ता किंवा न्याहारी मात्र मजेशीर असते. खोबरें किसून त्यांत गूळ मिसळलेला असतो, पोहे भिजवून मऊ केलेले असतात, घट्ट काक्वीसारखा गूळ असतो, गुळांत पाकविलेल्या साळीच्या लाह्या असतात, कधीं इडली व रसम् असतें, तर कधीं उपमा असतो. अर्थात् हा नाश्ता कितीही खाल्ला तरी बारा वाजेपर्यंत पोट सहज रिकामें होतें, ह्यामुळें हातावर पहारा ठेवण्याची जरूर पडत नाहीं. पोह्याला इकडे ' चिउरा ' ( चिवडा ) म्हणतात. दहीं व चिउरा हें अगदीं सर्वप्रिय खाद्य आहे.

# अनुगुलच्या सर्वोदय संमेलनांत

## श्रीनिमाईचरण हरिचंदन ह्यांचें सुरेल गायन

तोंडाप्रमाणेंच कानांनाही येथें चमचमीत मेजवानी मिळत आहे. श्री. सौरेन्द्रकुमार बसु हे बंगाली गृहस्थ सकाळीं व संध्याकाळीं प्रार्थनेमध्यें बंगाली व हिंदी भजनें म्हणतात. ह्यांचा आवाज फार गोड आहे आणि भजनाच्या विषयाशीं ते तादात्म्य पावून जातात. ह्यामुळें निरीश्वरवाद्यांच्या हृदयांतही भक्तिरसाचा ओलावा निर्माण होतो.

परंतु बंगाली भजनें व गायन ऐकण्याची संधि कांहीं दुर्मिळ नाहीं. गांधीजींच्या विधायक कार्यांतील पुष्कळांना बंगाली भजनें येतात आणि तीं ऐकायलाही सापडतात. परंतु ओडिया भाषेंतील भजनें आणि ओडिया पद्धतीचें गायन

ऐकण्याचा प्रसंग मात्र सहसा येत नाहीं. उत्कलच्या कार्यकर्त्यांमध्यें गाणारे जवळ जवळ कोणीच नाहींत आणि जरी कोणी असले तरी ते नेहमीं लाजून मागें मागेंच राहातात. ह्यामुळें उत्कलचें संगीत ऐकण्याची संधि आतांपर्यंत मिळाली नव्हती. आतां ती मिळाली आहे. सकाळीं सामुदायिक सूतकताईच्या वेळीं वेगवेगळ्या भाषांतील भजनें गाण्याचा कार्यक्रम ठेवण्यांत आला आहे. त्यामुळें सबंध भारताच्या भाषा व गायन चलच्चित्राप्रमाणें कानांवरून जातें. ओडिया भाषेंतील भजनें फक्त श्रीनिमाईचरण हरिचंदन हेच गातात. त्यांचा आवाज मोठा खणखणीत व पहाडी आहे. शरीरानेंही ते इतर उत्कलीय लोकांच्या मानानें चांगलेच धट्टेकट्टे व लांबरुंद हाडापेराचे आहेत. त्यांनीं 'श्रीजगन्नाथ' ह्या बोलपटांतही गाणाऱ्या भिक्षूचें काम केलेलें आहे. त्यांचें गंध मोठें गमतीदार दिसतें. नाकाच्या शेंड्यापासून डोक्यापर्यंत असें लांबलचक उभें, पांढरें गंध ते लावतात. ह्यामुळें त्यांच्या गाण्यांतील भक्तिरसावर एक प्रकारच्या रुबाबाची छाप पडते. ते ताना-आलाप वगैरे घेत नाहींत. साधे श्लोक किंवा कविता म्हटल्याप्रमाणें भजन म्हणतात आणि बंगाली गाण्याप्रमाणें शेवटचा सूर खूप खूप लांबवतात. गळ्यावर त्यांचा किती जबरदस्त ताबा आहे ह्याचें प्रत्यंतर त्यांच्या ह्या लांबणाऱ्या सुरावरून येतें. उत्कलच्या गायनकलेवर बंगाली गाण्याची छाप खूप असली तरी त्यांतील 'ळ' व 'ण'च्या उच्चारामुळें उत्कलचें एक खास वैशिष्ट्य निर्माण होतें आणि तें कानांना फार मधुर लागतें.

## दूध-दुभत्याची वाण

गोव्याप्रमाणेंच येथेंही दूध-दुभत्याची चणचण आहे. थोडेसे वैष्णव सोडल्यास इतर सर्व लोक मासळी खातात आणि लोकवस्ती समुद्रकिनाऱ्यावरच दाट असल्यामुळें मासळी भरपूर मिळते. ह्यामुळें दुधा-तुपाची गरज फारशी भासतही नसेल. परंतु ह्याचा शेतीवर फार वाईट परिणाम झाला आहे. येथील गायी, बैल अगदींच खुजे व मरतुकडे असतात. बैलाची उंची सरासरी चार-साडेचार फूट असते. गायीची त्याहूनही कमी. ह्या गायीला चाराही पोटभर दिला जात नाहीं, ह्यामुळें ती कोंकणांतल्या गायीप्रमाणें वेळेला

पावशेर-दीडपावशेराहून जास्त दूध देत नाहीं. बैल मरतुकडे असल्यामुळें शेतीची मशागत नीट होत नाहीं. येथील लाकडी नांगर पाहिला कीं हसूंच येतें. तें एक मुलांचें खेळणें वाटतें. दोन तीन इंचही जमीन त्यानें उकरली जात नाहीं. अशा प्रकारें पीक काय निघणार ? परंतु जमीनच अत्यंत सुपीक असल्यामुळें त्यांचा नाइलाज होतो आणि पोटापुरतें पीक उत्पन्न होतें. ह्याच बैलांना गाड्या ओढायच्या असल्यामुळें त्याही तकलुपीच असतात. मात्र गाड्यांचीं चाकें खूपच – असाधारण– मोठीं असतात. त्यांची उंची बैलांच्या दीडपट म्हणजे ५-६ फूट असते. गाडीचा आंस लोखंडी नसून लाकडीच असतो आणि त्या आंसावर एक लांबलचक शिडी बसविली कीं झाली गाडी. तिच्यांत माणसांनीं बसण्याची सोयच नाहीं. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे बैलांना वेसण घातली जात नाहीं आणि कासराही लावण्यांत येत नाहीं. .फक्त जूं मानेवर बांधलें जातें. ह्यामुळें गाडी वळविण्याच्या वेळीं गाडीवानाला खालीं उतरून ज्या बाजूला वळावयाचें असेल त्या बाजूच्या बैलाला धरावें लागतें किंवा गाडीच्या मागील भागाचा वल्ह्यासारखा उपयोग करून गाडी वळवावी लागते. हा सगळा निर्बुद्धपणा पाहिला, कीं हसावें कीं रडावें तें कळत नाहीं. आतां सरकारनें प्रांतांतील गायींची जात सुधारण्याची जोराची मोहीम सुरू केली आहे व तिला थोडेंफार यशही येत आहे. येथील आश्रमांत मिश्र जातीच्या गायी आहेत. त्या रोज दहा शेरपर्यंत दूध देतात असें कळलें. सरकारचा हा प्रयत्न यशस्वी झाल्यास येथील दुधातुपाचा प्रश्न कायमचा सुटेल असें वाटतें. सध्या येथें म्हशींची संख्या फार मोठी आहे, परंतु त्यांचा शेतीला फारसा उपयोग होत नसल्यामुळें ती वाढूं दिली जाणार नाहीं. अर्थात् येथील मूळच्या म्हशी गायींप्रमाणेंच दूध देतात. ह्यामुळें बाहेरून दिल्ली जातीच्या म्हशी आणून त्यांचें दूध पुरविलें जात आहे.

## श्रीमंत असूनही दरिद्री प्रांत

सुमारें साठ हजार चौरस मैल क्षेत्रफळ असलेला हा प्रांत नदी-मातृक आहे. महानदी, ब्राह्मणी, शालन्दी, सुवर्णरेखा, वैतरणी, इंद्रावती, वगैरे शेकडों लहान-

मोठ्या नद्यांचें जाळें ह्या प्रांतांत पसरलेलें आहे. त्यांचे कालवे काढून व त्यांना बांध घालून प्रांताचें नंदनवन बनविणें सहज शक्य आहे. प्रांतामध्यें दगडी कोळसा, लोखंड, मॅंगनीज, अभ्रक, डालमाइट, क्रोमाइट, वगैरे मौल्यवान् धातु भरपूर आहेत, परंतु अद्यापि त्यांचें नीट संशोधन झालेलें नाहीं. ज्या खाणी सापडल्या आहेत त्या गुजराती व मारवाडी व्यापाऱ्यांनीं आपल्या ताब्यांत ठेवल्या आहेत. उत्कल-वासीयांना तेथें फक्त मजूर म्हणून राबावें लागतें. त्याऐवजीं जर ओडिसा सरकारनें ह्या धंद्यांत लक्ष घातलें आणि नद्यांच्या पाण्यावर वीज तयार करून प्रांतांत औद्योगिक क्रान्ति घडवून आणली, तर कदाचित् सर्व प्रांतांहून श्रीमंत बनण्याची शक्यता ह्या प्रांताला आहे. इमारती व जळावू लाकूड तर इतकें विपुल आहे, कीं पन्नास वर्षेंपर्यंत लाकूड तोडत राहिलें तरी त्याचा तुटवडा पडणार नाहीं. परंतु त्यासाठीं प्रांतांतील जनतेमध्यें जागृति उत्पन्न होणें आवश्यक आहे आणि ती होत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. इतके दिवसपर्यंत बहुतेक डोंगराळ व जंगली भाग मध्ययुगांत वावरणाऱ्या संस्थानिकांच्या ताब्यांत होता. तो आतां संस्थानें विलीन झाल्यामुळें स्वतंत्र झाला आहे. तेथील जनतेंत शिक्षणाचा प्रसार होतांच तेथें मोठमोठे उद्योगधंदे निघतील आणि प्रांताची संपत्ति वाढेल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

## मुसलमानांची समस्या येथें नाहीं

ओरिसा हा प्रांत अगदीं अखेरीस मुसलमानांच्या ताब्यांत गेला, म्हणजे ह्यानें आपलें स्वातंत्र्य अगदीं अखेरपर्यंत टिकवून धरलेलें होतें. राजा नरसिंह, राजा कपिलेंद्रदेव, अनंगभीम देव, राजा मुकुंददेव, वगैरे पराक्रमी राजांनीं मुसलमानांच्या अनेक स्वाऱ्यांना तोंड देऊन त्यांना उत्कलमध्यें पाय ठेवूं दिला नाहीं. ह्यामुळें ह्या प्रांतांत मुसलमानांची संख्या फार थोडी म्हणजे सुमारें अडीच टक्के ( वीस हजार ) आहे आणि तीही शहरांतच आहे. ह्यामुळें येथें अल्पसंख्यांकांचा प्रश्न किंवा हिंदु-मुस्लिम दंगे, वगैरे भानगडी आढळत नाहींत. पूर्वबंगालमधील बंगाली निर्वासित ह्या प्रांतांत येऊं लागल्यामुळें मुसलमानांची शेकडेवारी आणखीच कमी होण्याची शक्यता आहे.

ह्या प्रांताची सर्वांत मुख्य समस्या दारिद्र्य ही आहे. जमीनदारी पद्धति असल्यामुळें जमीन सुपीक असूनही शेतकऱ्याला धान्य पिकविण्यास उत्साह वाटत नाही. ही जमीनदारी पद्धत लौकर नाहींशी व्हावी ह्यासाठीं पुरोगामी वृत्तीचे लोक खटपट करीत आहेत.

## ‘ बरगी ’ आला हं !

इ. स. १७५३ ते १८०३ पर्यंत म्हणजे बरोबर पन्नास वर्षें, मराठ्यांनीं – नागपूरकर भोसल्यांनीं – ओडिसावर राज्य केलें आणि इंग्रजांनीं ओडिसा प्रांत मराठ्यांकडूनच घेतला, हा इतिहास कळतांच क्षणभर आनंदानें व अभिमानानें छाती फुलून गेली. परंतु दुसऱ्याच क्षणीं मनावर एक प्रकारचें खिन्नतेचें साम्राज्य पसरलें; ओडिसावरील आमचें राज्य गेल्याबद्दल नव्हे, तर आम्ही मराठे ह्या प्रांतांत किती बदनाम झालों आहोंत ह्या विचारानें ! महाराष्ट्राबाहेर जेथें जेथें मराठे गेले तेथें तेथें त्यांनीं लोकांवर भयंकर जुलूम केल्याचें इतिहास सांगतो. जणूं लूटमार करण्यासाठींच आम्ही लढाया करीत होतों. हिंदुपदपातशाही स्थापन करण्याची किंवा हिंदु धर्माचें रक्षण करण्याची महान् कल्पना, उदात्त ध्येय छत्रपति शिवाजी-महाराजांच्याबरोबरच लयाला गेलें असावें असें वाटतें.

ओडिसांतही मराठ्यांनीं येथील निरपराध जनतेवर अनन्वित अत्याचार केले असें लोक सांगतात. अर्थात् ह्याला इतिहासाचा पुरावा नाहीं. त्या अत्याचाराची दहशत अजूनही लोकोक्तीच्या रूपानें शिल्लक राहिलेली आहे. लहान मुलांना भिवविण्यासाठीं जसें आपण ‘ बाऊ आला हं ! ’ म्हणून सांगतों तसें ओडिसांत ‘ बरगी आला हं ! ’ म्हणून मुलांना धाक घालतात. बरगी म्हणजे मराठा. हा शब्द बहुधा ‘ बारगीर ’ घोडेस्वार, शिपाई ह्या शब्दापासून आला असावा. भोसल्यांनीं जगन्नाथाच्या मंदिराला दरसाल सत्तावीस हजार रुपये देणगी दिल्याचा उल्लेख इतिहासांत आढळतो. इतरही बऱ्याचशा देवस्थानांना, मठांना, महंतांना व ब्राह्मणांना मराठ्यांनीं सनदा दिल्या होत्या, परंतु एवढ्यानें त्यांनीं केलेल्या अत्याचाराचें स्वरूप सौम्य होत नाहीं. आपल्या पूर्वजांच्या पापांचें परिमार्जन

करण्याची संधि अजून गेलेली नाहीं. ह्या मागासलेल्या प्रांताची सेवा करण्यास भरपूर वाव आहे. मुलुखगिरीची अथवा बौद्धिक प्रभुत्वाची जुनाट कल्पना डोक्यांतून काढून टाकून जर आपण ह्या प्रांतांत आलों तर नुकतीच जागृत होऊं लागलेली ही प्रजा प्रेमानें व आपलेपणानें आपलें स्वागत करील.

ह्या बाबतींत तीन गुजराती कार्यकर्त्यांचें उदाहरण आदर्श म्हणून ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

उत्कल प्रांतावर गांधीजींचें विशेष प्रेम होतें. त्यांनीं अस्पृश्यतानिवारणासाठीं १९३२ सालीं जो देशव्यापी दौरा काढला होता त्यांत ओडिसांतील प्रवास त्यांनीं पायीं केला होता. ते नेहमीं म्हणत, " दरिद्रीनारायणाचें दर्शन आणि सेवा कोणाला करावयाची असेल तर त्यानें उत्कलमध्यें जावें. " हा त्यांचा आदेश ऐकून जीवरामभाई नांवाच्या एका गुजराती व्यापाऱ्यांनीं आपला व्यापार-धंदा सोडून दिला आणि व्यापाराच्या कमाईचे एक लाख रुपये बरोबर घेऊन ते ओडिसांतील भद्रक ह्या गांवीं जाऊन राहिले. त्याच ठिकाणीं सुमारें पंधरा वर्षें सेवा करीत करीत इ. स. १९४१ सालीं ते स्वर्गवासी झाले. त्यांच्या बरोबर श्रीमति पुरबाई नांवाच्या बाई भद्रकला गेल्या होत्या. त्या अजूनही तेथेंच कार्य करीत आहेत. त्यांच्यानंतर थोड्या दिवसांनीं श्री. ईश्वरलाल व्यास नांवाचे गृहस्थ भद्रकला गेले. ते अजूनही तेथेंच कार्य करीत आहेत. येथील संमेलनासाठीं आलेल्या पाहुण्यांच्या जेवण्या-खाण्याची व्यवस्था श्री. ईश्वरलालभाईच ठेवीत आहेत. ते येथील जनतेशीं इतके एकरूप झाले आहेत कीं त्यांना कोणी गुजराती म्हणतच नाहींत. ह्या संमेलनासाठीं त्यांनीं गुजराती लोकांकडून खूप मदत मिळविली आहे. अशा प्रकारें व्यापारी गुजरात्यांनीं ओडिसाचें जें आर्थिक शोषण आजवर केलें आणि आजही चालविलें आहे, त्या पापाचें अल्पसें प्रायश्चित्त ह्या त्रिमूर्तींनीं केलें आहे व करीत आहेत. हेंच कार्य आपणा मराठ्यांनाही करतां येणार नाहीं काय ?

## अनुगुलचें ऐतिहासिक महत्त्व

अनुगुलला सर्वोदय संमेलन ठेवण्याचें मुख्य कारण येथील विधायक प्रवृत्ति हें आहे. ह्या ठिकाणीं एक मूलोद्योगी शाळा आणि मूलोद्योगाचें सरकारी ट्रेनिंग स्कूल

चालू आहे. कस्तुरबा ट्रस्टतर्फे भगिनींचें शिक्षणकेंद्रही येथेंच आहे. आदिवासी व मागासलेल्या मुलांमुलींसाठीं एक आश्रमही येथें चालतो. ह्या सगळ्या कार्याचें संचालन श्री. गोपबंधु चौधरी ह्यांचे बंधु श्री. नवबाबू चौधरी आणि शांतिनिकेतनांत शिक्षण घेतलेल्या त्यांच्या पत्नी सौ. मालतीदेवी चौधरी हीं दोघेंजण करीत आहेत. पण त्याचबरोबर ह्या स्थानाला एक ऐतिहासिक पार्श्वभूमिही आहे. गांधीजी उत्कलची पायीं यात्रा करीत असतां अनुगुललाही आले होते. तेव्हां येथील कमिशनरने गांधीजींना आपल्या घरांत उतरवून घेण्यास येथील लोकांना मनाई केली. त्या वेळीं ओडिसांतील जंगलांची राखण करण्याकरितां नेमलेल्या नोकरांवर देखरेख ठेवण्याचें मुख्य नाकें अनुगुल येथें होतें. येथें कमिशनरचें ठाणें असे. ह्या कमिशनरला इतकी सत्ता असे, कीं त्याच्या परवानगीशिवाय कोणीही बाहेरचा माणूस कोणाकडेही उतरूं शकत नसे. त्यामुळें लोकांनीं एका झाडाखालीं तंबू ठोकून त्यांत गांधीजींच्या उतरण्याची सोय केली. पुढें गांधीजी तेथून निघून गेल्यावर लोकांनीं त्या तंबूच्या चिंध्या चिंध्या करून गांधीजींची आठवण म्हणून प्रत्येकजण एकेक चिंधी आपल्याबरोबर घेऊन गेला. त्याच अनुगुलला गांधीजींच्या तत्त्वांचा प्रसार कसा करतां येईल ह्याचा विचार करण्यासाठीं संमेलन भरलें आहे आणि मंत्र्यांपासून तों पोलिसांपर्यंत सगळेजण स्वतःच्या घरीं लग्न असावें त्याप्रमाणें पाहुण्यांच्या सुखसोयी पाहाण्यांत दंग झाले आहेत. काळाचा महिमा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रमांक

# सवरा नृत्य

## सुसंस्कृत जात

आज रात्रीं प्रार्थनेनंतर 'सवरा' पद्धतीचें सामूहिक लोकनृत्य पाहिलें. सवरा हें उत्कलमधील एका आदिवासी जातीचें नांव. हें बहुधा 'शबर' (म्हणजे भिल्ल अथवा जंगलांत राहाणारे लोक) ह्या शब्दावरून पडलें असावें. उत्कलमध्यें अनेक आदिवासी जाती आहेत. त्यांच्यापैकीं सवरा जात अधिक सुसंस्कृत आहे. उडीसांतील सवरा लोकांची संख्या सव्वातीन लाख आहे.

## लोकनृत्याचे विविध प्रकार

जयपूर काँग्रेसच्या वेळीं भिन्न भिन्न प्रांतांतील लोकनृत्यें पाहाण्याची संधि मला लाभली होती. त्यापूर्वींही वर्ध्यास असतांना हिंदुस्तानी तालीमी संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांत वेगवेगळीं लोकनृत्यें पाहायला मिळालीं होतीं. परंतु मी कांहीं नृत्याचा विद्यार्थी नव्हे, (जाणकार तर मुळींच नाहीं,) ह्यामुळें मनोरंजनाचा एक प्रकार ह्याच दृष्टीनें मीं त्यांच्याकडे पाहिलें होतें. एक गोष्ट मात्र खरी, कीं खानदानी अथवा शास्त्रोक्त संगीत समजणें अथवा त्यांत रस वाटणें हें मला जितकें कठीण जातें, तितकें नृत्य समजणें अथवा त्यापासून मनोरंजन प्राप्त करणें कठीण जात नाहीं. ह्यामुळें लोकनृत्यें आणि अभिजात नृत्यें पाहाण्याची संधि मी सहसा दवडत नाहीं. अर्थात् त्यांत शास्त्रीय चिकित्सेची दृष्टि फारच थोडी असते.

अभिजात नृत्य आणि लोकनृत्य ह्यांच्यांतील महत्त्वाचा फरक हा, कीं अभिजात नृत्यांत लालित्य, सूक्ष्मता, भावप्रदर्शन, विविधता आणि शास्त्रीयता हीं अधिक असतात. तर लोकनृत्यांत जोम अधिक असतो. अभिजात नृत्यांत प्रदर्शनाची दृष्टि अधिक असते. हीं नृत्यें पाहाणाऱ्यांना विशेष आनंद होतो. त्या मानानें नृत्यकाराचा

आनंद हा गौण असतो. परंतु लोकनृत्यांत प्रदर्शनाची भावना फार थोडी. आत्मानंदाची प्रेरणाच मुख्य असते. जीवनावश्यक कार्यें व कर्तव्यें उरकल्यानंतर उरलेल्या वेळांत निसर्गाशीं तद्रूप होऊन वैयक्तिक दुःखांचा विसर पाडण्यासाठीं किंवा अंतःकरणांत उचंबळणारा आनंद प्रकट करण्यासाठीं, त्या आनंदाला वाव देण्यासाठीं, ते नृत्य करीत असतात. ह्यामुळें ज्या योगें नृत्य करणाराला बाह्य जगाचा विसर पडेल अशा पद्धति उत्पन्न झाल्या.

नृत्याचे वैयक्तिक व सामूहिक असे दोन मुख्य भाग पाडले तर बहुतेक लोकनृत्यें सामूहिक स्वरूपाचीं असतात असें आढळून येईल. कारण एका व्यक्तीचें नृत्य पाहून आनंदित होण्याइतकें सुसंस्कृत किंवा शहरी मन त्यांना लाभलेलें नसतें. ढोलक्यावर टिपरी पडतांच त्यांचे अवयव फुरफुरूं लागतात आणि ते नाचण्याची तीव्र अभिलाषा रोखूं शकत नाहींत. ह्याला अनुरूप अशींच त्यांचीं वाद्यें असतात — तीव्र, कर्कश, रणवाद्यांसारखीं. वैयक्तिक नृत्यांतील कोमलता, मंजुळता त्यांत फार थोडी असते. सामूहिक नृत्यांचेही पुन्हा दोन प्रकार असतात. एक रासासारखा सर्वांना एकाच तालांत बद्ध करणारा, एकाच सूत्रांत गोवणारा. ह्या प्रकारांत व्यक्तिस्वातंत्र्य जवळ जवळ नसतेंच. एकाही व्यक्तीनें थोडी जरी चूक केली तरी सर्व लोकांचें नृत्य बिघडतें. ह्यामुळें हा प्रकार जास्त सुधारलेला, पुढारलेला आहे असें म्हणतां येईल. ह्याच्या उलट दुसऱ्या प्रकारांत पुष्कळ मर्यादेपर्यंत व्यक्तिस्वातंत्र्य असतें. त्यामुळें एखाद्या व्यक्तीचा ताल चुकला किंवा ठराविक चाकोरींतून ती बाहेर गेली, तरी इतरांच्या नृत्यांत विघ्न येत नाहीं.

## दुसऱ्या प्रकारचें 'सवरा' नृत्य

ह्या दोन प्रकारांपैकीं 'सवरा' नृत्य हें दुसऱ्या प्रकारांत बसतें. म्हणजे रासनृत्याप्रमाणें ह्यांतील क्रिया एकमेकांवर अवलंबून नसून प्रत्येक जण स्वतंत्र असतो. ह्यामुळें एखादा नृत्यकार चुकला किंवा दमल्यामुळें थांबला, तरी त्याचा इतरांवर कांहीं परिणाम होत नाहीं. प्रत्येकजण आपल्याच मस्तींत असतो. ह्या पद्धतींत संख्येचें कांहीं बंधन नसतें. आज आम्हीं पाहिलेल्या नृत्यांत सुमारें

पंचवीस पुरुष व वीस स्त्रिया ह्यांनीं भाग घेतला होता. त्यांत आठ-दहा वर्षांपासून चाळीस-पन्नास वर्षांपर्यंतचे आबालवृद्ध होते. हें नृत्य सवरा लोकांच्या नेहमींच्या पोशाखांत नव्हतें. त्यांच्या पोशाखावर शहरी पद्धतीचा परिणाम झालेला दिसत होता. पुरुषांचा पोषाख पुढीलप्रमाणें होता :

कमरेला लुंगीप्रमाणें गुंडाळलेला जाडाभरडा पंचा, त्यावर अर्ध्या बाह्यांचा साधा अंगरखा किंवा उपरण्यासारखा चापून चोपून घेतलेला पंचा अथवा उघडेंच अंग, आणि डोक्याला तीन-चार हात लांबीचें पांढरें शुभ्र मुंडासें. त्या मुंडाशांत टोकाला लाल रंगाचीं फुलें असलेले तुरे खोवलेले होते. ह्या तुऱ्यांचा आकार फुलें आलेल्या कांद्याच्या देठासारखा होता. काळ्या रंगावर पांढरें पागोटें आणि त्यावर लाल तुरे हा पोषाख आकर्षक दिसतो, ह्यांत मुळींच शंका नाहीं. परंतु राजस्थानी अथवा गुर्जर लोकनृत्याप्रमाणें त्यांत भडकपणा मात्र नाहीं. कांहीं कांहीं पुरुषांनीं पायांत चाळ बांधलेले होते.

स्त्रियांच्या पोषाखांत विशेष गोष्ट कांहीं नव्हती. बहुतेक स्त्रियांनीं व मुलींनीं पांच वारी साड्या आणि ब्लाऊझ घातलेले होते. एक म्हातारी मात्र अस्सल ‘सवरा’ पोषाखांत होती. तिनें अत्यंत अरुंद पन्ह्याचें लाल रंगाचें लुगडें नेसलेलें होतें. ह्या लुगड्याला वीत-वीत रुंदीचे कांठ होते. तिचें लुगडेंही गोल पद्धतीचेंच होतें. मात्र अत्यंत अरुंद असल्यामुळें तें गुडघ्यांपर्यंत आलेलें होतें. लुगड्याचा पदर तेवढाच छातीभोवतीं लपेटून घेतलेला होता. तिच्या पायांत तांब्याचे जाडजूड वाळे होते. हातांत चांदीसारख्या पांढऱ्या धातूच्या जाड पाटल्या होत्या. गळ्यांत लाल, पांढऱ्या, निळ्या रंगांच्या लहानमोठ्या मण्यांच्या माळा होत्या. आणि नाका-कानांतही तांब्या-पितळेचे चकचकीत दागिने होते. नाकांतील दागिना नथीप्रमाणें नाकपुडीच्या एका बाजूला नसून दोन्ही नाकपुड्यांच्या मधोमध वेसणीप्रमाणें लोंबत होता आणि शिवाय दोन्ही नाकपुड्यांत एक एक बुंद होता. तिचे केस विशिष्ट पद्धतीनें बांधलेले होते. आपल्याकडील जुन्या बायकांप्रमाणें प्रथम वेणी घालून नंतर त्याचें चक्र बांधलें होतें आणि तें डाव्या बाजूस केसांच्या खालीं खोचून बसविलें होतें. त्यामुळें झिरझिरीत कपड्यांत अथवा जाळींत

ठेवल्याप्रमाणें तें दिसत होतें. तिच्या एका हातांत मयूरपंखांची एक जाडजूड व लांब चवरी होती. ती वर धरून ती तालांत नाचत होती. दुसरा हात ती कधी कंबरेवर ठेवी तर कधीं त्याच्या साहाय्यानें वेगवेगळ्या मुद्रा करी. सबंध नृत्यकारांमध्यें ही म्हातारीच तेवढी बाह्य जगाला विसरून स्वतःच्या नादांतच नाचत होती. तिच्या चेहऱ्यावर भावाविष्करण फारसें नव्हतें, परंतु तिच्या हालचालींत गतिमानता होती, जिवंतपणा होता, आनंद होता, मस्ती होती. इतर लोक नाचतांना तोंडानें 'हैयाऽऽऽ है, हैया, हैय्या, हैयाऽऽऽ है,' अशा प्रकारचे वेगवेगळे आवाज काढीत होते, हसत-खिदळत होते, परंतु ही म्हातारी तोंडांतून मुळींच आवाज न काढतां आपल्या स्वतःच्याच हालचालींवर लक्ष केंद्रित करून नाचत होती. तिच्याकडे पाहून असें वाटत होतें, कीं ही बाई एखादें धार्मिक कृत्य समजूनच नाचत असावी. हिच्या मतें नृत्य हें भौतिक आनंदाचें साधन नसून ईश्वराशीं, परमात्म्याशीं तादाम्य प्राप्त करण्याचें माध्यम असावें आणि म्हणून तिच्या नृत्यांत उथळपणा, पांचटपणा किंवा उन्मत्तपणा मुळींच दिसत नव्हता. इतर स्त्रिया व मुली पुरुषांच्या मागील बाजूस चार-चार सहा-सहा जणांच्या टोळ्या बनवून नाचत होत्या. परंतु ही म्हातारी पुरुषांच्या मध्यभागींच नाचत होती आणि तिला आपण पुरुषांत नाचत आहोंत ह्याचें भानही नसावें, असें वाटत होतें.

## वाद्यांची साथ

ह्या नृत्यामध्यें वाद्यें कांहींशीं ओबडधोबड होतीं. आपल्याकडील खेड्यांतून व कांहीं कांहीं शहरांतूनही तासेवाजंत्रीं असतात. त्यांत सुमारें दीड फूट लांबीची एक पिपाणी असते, तशा प्रकारची पिपाणी येथें वाजत होती. तिच्यांतून एखाद्या संपूर्ण गाण्यांचे स्वर निघत नसून ठराविक ठेक्याचे सूर निघत होते. त्या सुरांच्या तालावर लहानशी हलगी किंवा मोठीशी टिमकी वाजत होती. असली हलगी ग्रामीण पद्धतीच्या लेझीमची साथ करीत असलेली आपल्यापैकीं पुष्कळांनीं पाहिली व ऐकली असेल. हिचा ठेका कांहींसा रणवाद्यासारखा होता. ह्यामुळें तो कानीं पडतांच हृदयांत एक प्रकारचें चैतन्य निर्माण होऊन त्या समूहामध्यें आपणही सामील व्हावें आणि मस्त होऊन नाचावें अशी इच्छा श्रोत्यांच्या मनांत उत्पन्न होत होती. कांहीं कांहीं

जणांच्या हातांत लहान-मोठ्या झांजाही होत्या. पुष्कळशा नृत्यांत आढळणारा मृदंग मात्र ह्यांत नव्हता. त्याच्याऐवजीं घागरीच्या आकाराचीं नवीनच वाद्यें दिसत होतीं. ह्या घागरींचा आकार लहानपणीं वाचलेल्या ‘ कोल्हा आणि करकोचा ’ ह्या गोष्टींतील चित्रांत पाहिलेल्या सुरईसारखा होता. म्हणजे घागरीच्या माना बऱ्याच उंच होत्या आणि त्यांच्या तोंडांवर कातडें लावलेलें होतें. ह्या घागरी गोंधळी लोकांच्या संबळा-प्रमाणें गळ्यांत अडकवलेल्या होत्या. त्यांवर ठेका धरला जात होता. ह्या घागरींतून निघणारा आवाज मात्र मधुर व मंजुळ होता. परंतु ज्यांनीं त्या घागरी गळ्यांत अडकविल्या होत्या, त्यांना नृत्यकाराबरोबर हालचाल करण्यांत त्रास होत असावा असें वाटत होतें. कारण सगळे वादक हे नृत्यकाराच्या टोळक्यांतच सामील होऊन त्यांच्याबरोबरच नाचत होते. ज्यांच्या हातांत कांहींच नव्हतें, ते तोंडांत बोट घालून मुंबईच्या बाल्ह लोकांच्या नाचांतल्याप्रमाणें किंवा तमाशाच्या प्रेक्षकांप्रमाणें अथवा शहरी मवाल्यांप्रमाणें शिव्या मारीत होते आणि कंबरेवर हात ठेवून अथवा हनुवटीखालीं उभें बोट धरून स्त्रियांच्या नृत्याची नकल करीत होते. ही नकल फारच अशिष्ट व कुरुचिपूर्ण भासत होती. हा भाग मूळ सवरा नृत्यांत होता, कीं तें शहरी नाचाचें भ्रष्ट अनुकरण होतें, हें समजणें कठीण आहे. एवढा भाग वगळल्यास सर्व नृत्य फारच सुरुचिपूर्ण होतें असें म्हटलें पाहिजे.

नृत्यांतील ह्या कुरुचिपूर्ण भागासंबंधीं विचार करीत असतां मनांत असा विचार आला, कीं माणसांना असल्या हावभावांत गोडी कां वाटत असावी ? किंवा अशिष्ट भाषा, संकेत, हावभाव ह्यांबद्दल बहुसंख्य लोकांना इतकें आकर्षण कां वाटत असावें ? ह्याचें कांहींतरी शास्त्रीय कारण असलें पाहिजे.

## इतर स्त्रियांचें सामान्य नृत्य

पुरुष आणि स्त्रिया गोलाकार नाचत होत्या. पुढें थोडे पुरुष नाचत होते. त्यांच्यांतच ती म्हातारी नाचत होती. त्यांच्या मागें हलगी, झांजा, घागरी, पिपाणी, वगैरे वाद्यें वाजविणारे होते आणि त्यांच्या मागें इतर स्त्रिया होत्या. ह्या स्त्रियांनीं आपल्या तीन-चार ओळी बनविल्या होत्या. प्रत्येक ओळींत चार-पांच स्त्रिया अथवा

ठेवल्याप्रमाणें तें दिसत होतें. तिच्या एका हातांत मयूरपंखांची एक जाडजूड व लांब चवरी होती. ती वर धरून ती तालांत नाचत होती. दुसरा हात ती कधी कंबरेवर ठेवी तर कधीं त्याच्या साहाय्यानें वेगवेगळ्या मुद्रा करी. सबंध नृत्यकारांमध्यें ही म्हातारीच तेवढी बाह्य जगाला विसरून स्वतःच्या नादांतच नाचत होती. तिच्या चेहऱ्यावर भावाविष्करण फारसें नव्हतें, परंतु तिच्या हालचालींत गतिमानता होती, जिवंतपणा होता, आनंद होता, मस्ती होती. इतर लोक नाचतांना तोंडानें 'हैयाऽऽऽ है, हैया, हैय्या, हैयाऽऽऽ है,' अशा प्रकारचे वेगवेगळे आवाज काढीत होते, हसत-खिदळत होते, परंतु ही म्हातारी तोंडांतून मुळींच आवाज न काढतां आपल्या स्वतःच्याच हालचालींवर लक्ष केंद्रित करून नाचत होती. तिच्याकडे पाहून असें वाटत होतें, कीं ही बाई एखादें धार्मिक कृत्य समजूनच नाचत असावी. हिच्या मतें नृत्य हें भौतिक आनंदाचें साधन नसून ईश्वराशीं, परमात्म्याशीं तादाम्य प्राप्त करण्याचें माध्यम असावें आणि म्हणून तिच्या नृत्यांत उथळपणा, पांचटपणा किंवा उन्मत्तपणा मुळींच दिसत नव्हता. इतर स्त्रिया व मुली पुरुषांच्या मागील बाजूस चार-चार सहा-सहा जणांच्या टोळ्या बनवून नाचत होत्या. परंतु ही म्हातारी पुरुषांच्या मध्यभागींच नाचत होती आणि तिला आपण पुरुषांत नाचत आहोंत ह्याचें भानही नसावें, असें वाटत होतें.

## वाद्यांची साथ

ह्या नृत्यामध्यें वाद्यें कांहींशीं ओबडधोबड होतीं. आपल्याकडील खेड्यांतून व कांहीं कांहीं शहरांतूनही तासेवाजंत्रीं असतात. त्यांत सुमारें दीड फूट लांबीची एक पिपाणी असते, तशा प्रकारची पिपाणी येथें वाजत होती. तिच्यांतून एखाद्या संपूर्ण गाण्यांचे स्वर निघत नसून ठराविक ठेक्याचे सूर निघत होते. त्या सुरांच्या तालावर लहानशी हलगी किंवा मोठीशी टिमकी वाजत होती. असली हलगी ग्रामीण पद्धतीच्या लेझीमची साथ करीत असलेली आपल्यापैकीं पुष्कळांनीं पाहिली व ऐकली असेल. हिचा ठेका कांहींसा रणवाद्यासारखा होता. ह्यामुळें तो कानीं पडतांच हृदयांत एक प्रकारचें चैतन्य निर्माण होऊन त्या समूहामध्यें आपणही सामील व्हावें आणि मस्त होऊन नाचावें अशी इच्छा श्रोत्यांच्या मनांत उत्पन्न होत होती. कांहीं कांहीं